# "SOCIAL AND POLITICAL THOUGHT OF DHIRENDRA MAJUMDAR : A CRITICAL STUDY"

**MINOR RESEARCH PROJECT**

**IN**

**POLITICAL SCIENCE**

**SUBMITTED TO**

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**

**WESTERN REGIONAL OFFICE (WRO),**

**PUNE-411007**

**BY**

**DR. KOTHAVALE SHRADDHA VINOD**
**M.A., Ph.D., SET**

**Principal Investigator**
**Assistant Prof. & Head**

**DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE**
**SAHAKARBHUSHAN S.K.PATIL COLLEGE,**
**KURUNDWAD, DIST: KOLHAPUR- 416106,**
**MAHARASHTRA**

**JUNE, 2022**

# DECLARATION

I hereby declared that the Minor Research Project entitled **"SOCIAL AND POLITICAL THOUGHT OF DHIRENDRA MAJUMDAR: A CRITICAL STUDY"** in the subject **POLITICAL SCIENCE (U.G.C.–WRO–Vide Email Letter – F. No. 23–1818/14 (WRO), Dated: 11/01/2017 & F. No.23–1818/14(SC)/211(WRO) XII Plan, Dated: 22/03/2017)** being submitted to University Grants Commission, Western Regional Office, Pune for the fulfillment of Minor Research Project is my original work and the conclusions drawn therein are based on the data and information collected by me. To the best of my knowledge and belief, this work has not formed earlier the basis for the award of any Degree or Diploma of similar title.

**Place: Kurundwad**

**Date:** 16/6/2022

**Dr. Kothavale Shraddha Vinod**
Principal Investigator (MRP)
Assistant Prof. & Head,
Dept. of Political Science
Sahakarbhushan S.K.Patil College,
Kurundwad

# प्रतिज्ञापत्र

मी डॉ. कोठावळे श्रध्दा विनोद, सहाय्यक प्राध्यापक आणि विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरूंदवाड, या प्रतिज्ञापत्रानुसार असे जाहीर करते की, **"धीरेंद्र मजुमदार यांचे सामाजिक आणि राजकीय विचार : एक चिकित्सक अभ्यास"** या **राज्यशास्त्र** विषयाच्या **(U.G.C.–WRO–Vide Email Letter – F. No. 23–1818/14 (WRO), Dated: 11/01/2017 & F. No.23–1818/14(SC)/211(WRO) XII Plan, Dated: 22/03/2017)** लघुशोध प्रकल्प प्रबंधातील सर्व संशोधन मूळ संशोधन असून यातील कुठलाही मजकूर इतरत्र प्रकाशित केलेला नाही. सदरचा लघुशोध प्रकल्प प्रबंध विद्यापीठ अनुदान आयोग – वेस्टर्न रिजनल ऑफिस, पुणे, मायनर रिसर्चसाठी सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरूंदवाड येथून सादर करीत आहे.

ठिकाण : कुरूंदवाड

दिनांक : 16/6/2022

**संशोधक**

**डॉ. कोठावळे श्रध्दा विनोद**

सहाय्यक प्राध्यापक,

विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग,

सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय,

कुरूंदवाड.

# CERTIFICATE

This is to certify that the Minor Research Project entitled **"SOCIAL AND POLITICAL THOUGHT OF DHIRENDRA MAJUMDAR: A CRITICAL STUDY"** in the subject of **POLITICAL SCIENCE** which is being submitted herewith for the fulfillment of Minor Research Project of University Grants Commission, Western Regional Office, Pune is the result of the original research work completed by **Dr. Kothavale Shraddha Vinod.**

**Place: Kurundwad**

**Date:** 16/6/2022

I/C PRINCIPAL
Sahakarbhushan S K Patil
College, Kurundwad

**Principal**
**Sahakarbhushan S. K. Patil College,**
**Kurundwad**

SAHAKARBHUSHAN S. K. PATIL COLLEGE KURUNDWAD
NIOE
MAH - 3584
KOL - 85

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, डॉ. **कोठावळे श्रध्दा विनोद**, सहाय्यक प्राध्यापक आणि विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरूंदवाड, यांनी, **"धीरेंद्र मजुमदार यांचे सामाजिक आणि राजकीय विचार : एक चिकित्सक अभ्यास"** या **राज्यशास्त्र** विषयाच्या लघुशोध प्रकल्प प्रबंधातील सर्व संशोधन स्वत: केलेले असून यातील कुठलाही मजकूर इतर प्रकाशित संशोधनातील घेतलेला नाही. तसेच सदरचे संशोधन विद्यापीठ अनुदान आयोग – वेस्टर्न रिजनल ऑफिस, पुणे, मायनर रिसर्च प्रोजेक्टसाठी सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरूंदवाड व्दारा सादर करीत आहेत.

ठिकाण : कुरूंदवाड

दिनांक : 16/6/2022

प्रभारी प्राचार्य
सहकारभूषण एस के पाटील
महाविद्यालय, कुरुंदवाड

प्राचार्य
सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय,
कुरूंदवाड.

S. K. PATIL COLLEGE, KURUNDWAD • SAHAKARBHUSHAN
NIOE MAH-3584 KOL-85

# ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनाचे काम पूर्ण करण्यास ज्यांनी मला सतत मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे आभार मानणे हे माझे कर्तव्य आहे. गुरूवर्य डॉ. अशोक चौसाळकरसर माजी विभाग प्रमुख राज्यशास्त्र विभाग,सामाजिक शास्त्रे माजी अधिष्ठाता आणि गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, धीरेंद्र मजुमदार यांच्या विचाराने प्रेरित झालेले विचारवंत कै. दत्ता शिंदे (काका), छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील गुरूवर्य डॉ. शिवाजी पाटील, राज्यशास्त्र विभाग प्रमुख तसेच शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागप्रमुख रविंद्र भणगे, डॉ. प्रकाश पवार,माजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. वासंती रासम,जेष्ठ विचारवंत श्री. किशोर बेडकिहाळ यांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे.

शिवाजी विद्यापीठ गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र विभागामधील संशोधक विद्यार्थी, कर्मचारी यांचेही आभार. शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल व इतर ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची मी आभारी आहे. बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी, सर्वसेवासंघ, राजघाट, वाराणसी, गांधी स्मारक केंद्र, केरळ, सेवाग्राम आश्रम, वर्धा व तेथील ग्रथांलय, पवनार आश्रम व तेथील ग्रंथालय, महात्मा गांधी विचार केंद्र, नागपूर, गाधीं स्मारकनिधी,श्री. कुमार सप्तर्षी,पुणे, आगाखान पॅलेस, पुणे, मणिभवन, मुंबई तसेच स.भू.एस.के. पाटील महाविद्यालयाचे ग्रंथपाल, सौ.एस.बी.पाटील, व ग्रंथालयातील कर्मचारी, शिवाजी कॉलेज येथील ग्रंथपाल व कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

धीरेंद्र मजुमदार यांचे स्वीय सहायक श्री. अमरनाथभाई सर्वसेवासंघ राजघाट.वारणसी तसेच महात्मा गांधी, विनोबा आणि धीरेंद्र मजुमदार यांचे जेष्ठ अभ्यासक श्री. सु. श्री. पांढरीपांडे, नागपूर यांनी मुलाखत देऊन केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांच्या ऋणात राहू इच्छिते.

नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशनचे चेअरमन तसेच कुरूंदवाडचे नगराध्यक्ष मा. श्री. जयरामबापू पाटील व श्री. विजयभाऊ पाटील तसेच सर्व संचालक मंडळ यांच्या प्रोत्साहनाबद्दल मी आभारी आहे. सहकारभूषण एस. के. पाटील कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. वाय.एम.चव्हाण, प्राचार्य डॉ. टी. के. जाधव यांचेही मी आभारी आहे. उपप्राचार्य आर. एस. कदम, उपप्राचार्य डॉ. सुनिल चव्हाण, राज्यशास्त्र विषयाचे माजी विभागप्रमुख डॉ. बी. जी. भोसले, तसेच महाविद्यालयामधील माझे सर्व सहकारी प्राध्यापक आणि ग्रंथालयीन व प्रशासकीय सेवक या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे. यड्रावकर शिक्षणसमूह, जयसिंगपूरचे संस्थापक व आरोग्य राज्यमंत्री श्री. राजेंद्रपाटील—यड्रावकर,आरोग्य राज्यमंत्री,महाराष्ट्र सौ. स्वरूपा पाटील—यड्रावकर यांचे मी आभारी आहे. प्रा.सौ.शोभा शेटे, श्री.संभाजी शेटे, डॉ. अमिता कणेगावकर, डॉ. मल्लिकार्जून बंदारे, डॉ. निलकंठ लोखंडे, प्रा. सुनिल गायकवाड, डॉ. सुर्यकांत गायकवाड, प्रा. प्रशांत प्रक्षाळे, प्रा. अक्षय काटकर सौ. किर्ती पाटील, अनुष्का, सम्राज्ञी यांचेही मी आभारी आहे.माझे नातेवाईक श्री. बाबासाहेब कवठेकर, सौ. अस्मिता व श्री.प्रसाद सावंत,श्रीमती यशोदा व रंजना सावंत आणि देवदास,श्रीमती वसुधा, कु. अनुराधा, कु. अस्मिता, अनय यांच्या प्रेरणेबद्दल मी आभारी आहे.

माझे सहचारी श्री. विनोद कोठावळे, मुख्याध्यापक, ज्ञानगंगा हायस्कूल, जयसिंगपूर यांची मी ऋणी आहे.श्री. प्रदिप लोंढे व श्री. दत्तात्रय कोरडे यांनी टायपींग व बायंडिंगचे काम अत्यंत चांगल्या प्रकारे केल्याबददल त्यांचे मी आभार मानते. याशिवाय संशोधन कार्यास ज्यांची प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मदत झाली त्यासर्वांची मी मनपूर्वक आभारी आहे.

**डॉ.सौ. कोठावळे श्रध्दा विनोद**

“धीरेंद्र मजुमदार यांचे सामाजिक आणि राजकीय विचार: एक चिकित्सक अभ्यास”

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ● | प्रतिज्ञापत्र (इंग्रजी) | I |
| ● | प्रतिज्ञापत्र (मराठी) | II |
| ● | प्रमाणपत्र (इंग्रजी) | III |
| ● | प्रमाणपत्र (मराठी) | IV |
| ● | ऋणनिर्देश | V-VI |
| ● | अनुक्रमणिका | VII |
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | धीरेंद्र मजुमदार यांचा जीवन परिचय | १९ |
| ३ | धीरेंद्र मजुमदार यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार | ३५ |
| ४ | धीरेंद्र मजुमदार यांचे राजकीय विचार | ५५ |
| ५ | धीरेंद्र मजुमदार यांचे रचनात्मक कार्य आणि गांधी विचारांचा केलेला विकास | ९१ |
| ६ | उपसंहार व निष्कर्ष | १२१ |
| ● | संदर्भ ग्रंथ सूची | १३२ |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

**प्रस्तावना :**

आज जगभर मान्यता आहे असे युगप्रवर्तक विचारवंत महात्मा गांधी यांनी आधुनिक भारताच्या सामाजिक व राजकीय जीवनात अत्यंत महत्वाचे कार्य केले आहे. महात्मा गांधींना संपूर्ण भारतात मोठया प्रमाणात अनुयायी मिळाले. विशेषत: महाराष्ट्रातून अनेक बुध्दिवादी विचारवंत व कार्यकर्ते त्यांना मिळाले. या अनुयायांनी महात्मा गांधीजींचे सिध्दांत आणि व्यवहार या दोन्हींही क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली आहे. गांधी विचारांचा नव्याने अन्वयार्थ लावण्याचे व त्याचा विकास करण्याची कामगिरी महाराष्ट्रातील तसेच भारतातील महात्मा गांधीजींच्या शिष्यांनी केली, त्यांनाच उत्तर गांधीवादी विचारवंत म्हणून ओळखले जाते. त्यांच्या विचाराच्या संदर्भात समकालीन समस्यांचा वेद घेण्याचा प्रयत्न या अभ्यासामध्ये केला आहे.

भारताला आणि महाराष्ट्राला प्रबोधन काळापासून विचारांचा मोठा वारसा आहे. यामध्ये प्रामुख्याने राजाराम मोहन रॉय, स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद सरस्वती, आचार्य बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, दादोबा पांडुरंग, महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक, न्यायमूर्ती रानडे व गोपाळ कृष्ण गोखले यांच्या विचारांची प्रदीर्घ अशी परंपरा भारतात आणि महाराष्ट्रात होती. त्यांनतर महात्मा गांधींच्या तत्वज्ञानावर विशेषत: भारतातील प्रबोधनकालीन विचारांचा प्रभाव पडलेला होता. महात्मा गांधी हे भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले गुरू मानीत होते. त्यानंतर महात्मा गांधींच्या विचारांचा वारसा पुढे चालविण्याचे कार्य भारतातील सर्वोदय विचार परंपरेतील आणि लोकशाही समाजवादी विचार परंपरेतील उत्तर गांधीवादी विचारवंतांनी केले. सर्वोदय विचारवंतामध्ये मुख्यत: आचार्य विनोबा भावे, आचार्य काकासाहेब कालेलकर, आचार्य दादा धर्माधिकारी, आप्पासाहेब पटवर्धन, जे. सी. कुमारआप्पा, किशोरीलाल मशुरूवाल, धीरेंद्र मजुमदार या गांधीवादी विचारवंताचा समावेश होतो. तर लोकशाही समाजवादी विचार परंपरेत

मुख्यत: आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर, आचार्य स. ज. भागवत, शंकरराव देव, डॉ. राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण, डॉ. झाकीर हुसेन, खान अब्दुल गफारखान, सी. राजगोपालचारी, प्रेमा कंठक आणि कांतीभाई शहा या उत्तर गांधीवाद्यांचा समावेश होतो. या दोन्ही विचार परंपरेतील उत्तर गांधीवाद्यांनी महात्मा गांधींजींच्या विचारांचा सर्जनशील असा विकास केला. या सर्वच विचारवतांचे महात्मा गांधींच्या विचारात आणि कार्यात योगदान महत्वाचे आहे. महात्मा गांधींच्या विचारांचा वारसा पुढे चालविण्याचा, नवा अर्थ लावण्याचा आणि त्याचा विकास करण्याचा प्रयत्न या विचारवतांनी केला. यातून महात्मा गांधीजींच्या विचारांच्या विकासाचे समग्र असे दर्शन घडले.

आचार्य विनोबा भावे हे महात्मा गांधींजीचे वैचारिक आणि अध्यात्मिक वारसदार होते. विनोबांनी सर्वच क्षेत्रात महात्मा गांधीजींच्या विचारांचा विकास केला. सर्वोदय, स्वराज्य आणि लोकनीती, भूदान, ग्रामदान आणि कांचनमुक्ती या विषयावरील त्यांचे विचार अनेकबाबतीत गांधी विचारांना पुढे नेतात.

सर्वोदय चळवळीमधील ज्येष्ठ विचारवंत व महात्मा गांधीच्या विचारांचे प्रत्यक्ष कृतीशील विचारवंत म्हणून धीरेंद्र मजुमदार परिचित आहेत. धीरेंद्र मजुमदार यांचा जन्म उत्तर प्रदेशमधील गोरखपूर येथे १० सप्टेंबर, १९०० मध्ये झाला. स्कॉटीश चर्च कॉलेजमधून त्यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी काशी येथील हिंदू विश्व विद्यालयामध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमासाठी १९२१ मध्ये प्रवेश घेतला, परंतु महात्मा गांधींच्या विचाराने प्रभावित होऊन असहकार चळवळीमध्ये इंजिनिअरिंग शिक्षणाचा त्याग करून सहभागी झाले. तसेच ते आजीवन ब्रह्मचारी राहिले व गांधीजींचा विचार आयुष्याच्या अखेरीपर्यंत कृतीमध्ये आणत राहिले. धीरेंद्र मजुमदार हे 'धीरेंदा' या नावाने सर्वोदय परिवारात प्रसिध्द होते आणि आहेत. महात्मा गांधीजींच्या तत्वज्ञानाचे भाष्यकार म्हणून धीरेंद्रांचे कार्य महत्वाचे आहे. आपल्या पत्ररूपी विचारातून आणि 'नई तालीम' या मुखपत्रातून महात्मा गांधीजींच्या विचाराला बदलत्या परिस्थितीमध्ये जुन्या व नव्या पिढीला विचारांचा कृतीशील आयाम दिला. जुन्या व नव्या पिढीमध्ये समन्वय साधून, प्रबोधनामधून

आणि लोकशिक्षणातून त्यांनी १९७१ मध्ये लोक—गंगा—यात्रा या कार्यक्रमाला सुरूवात केली आणि त्यासाठी त्यांनी बैलगाडीमधून आठ वर्षे खडतर प्रवास केला. अशा या कृतीशील विचारवंताचे देहावसन २१ नोव्हेंबर, १९७८ मध्ये झाले.

धीरेंद्र मजुमदार हे केवळ ग्रामदान चळवळीतील कार्यकर्ते नव्हते, तर स्वतंत्र विचारवंत होते. सामाजिक आणि राजकीय परिवर्तनासाठी ग्रामदानाची चळवळ कशी राबविता येईल, यासाठी ते आपले विचार व्यक्त करीत होते. धीरेंद्र मजुमदार हे आचार्य विनोबा भावे यांचे सहाय्यक होते. भूदान आणि ग्रामदान यानंतरच्या काळात आचार्य विनोबांचा अध्यात्मावर जास्त भर राहिला. धीरेंद्र मजुमदार यांनी अध्यात्मापेक्षा प्रत्यक्षात गांधीचे विचार आचरणात आणण्याकडे खऱ्या अर्थाने आपली दृष्टी वळविली. गांधीजींचे तत्वज्ञान नवयुग स्थापन करण्याचे साधन आहे असे त्यांचे मत होते. त्यांचा भर आचरणावर होता. कारण गांधीजींचे विचार नवा समाज, नवी पर्यायी राज्यव्यवस्था स्थापन करणारे होते. आचार आणि विचार या दोन्हींच्या संयुक्त प्रयत्नातुन खऱ्या अर्थाने समाजात महात्मा गांधीजींच्या विचारांचा विकास होईल असे धीरेंद्र मजुमदार प्रतिपादन करीत होते.

धीरेंद्र मजुमदार यांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांचा एक चिकित्सक अभ्यास प्रस्तुत संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

**उत्तर गांधीवादी :**

महात्मा गांधींच्या अनुयायांनी सिध्दांत व व्यवहार या उभय क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली आहे. गांधी विचारांचा नव्याने अन्वयार्थ लावण्याचा, त्यांच्या विचारांच्या संदर्भात समकालीन समस्यांचा वेध घेण्याचा गांधीवाद्यांनी प्रयत्न केला. त्यांना खऱ्या अर्थाने उत्तर गांधीवादी म्हणता येते. महात्मा गांधींच्या विचारांचा वारसा पुढे चालविण्याचे कार्य सर्वोदय व लोकशाही समाजवादी या दोन विचार परंपरेतील उत्तर गांधीवादी विचारवंतानी केले. यातून महात्मा गांधींच्या विचारांच्या विकासाचे समग्र दर्शन प्रतिबिंबित होते.

धीरेंद्र मजुमदार हे महात्मा गांधी आणि विनोबा या दोघांच्या विचारांचे आणि रचनात्मक कार्याचे वारसदार होते. धीरेंद्र मजुमदार हे गांधी—विनोबांच्या विचाराचे एक अतिशय प्रतिभाशाली भाष्यकार तर होतेच, परंतु त्याहीपेक्षा अधिक म्हणजे त्या विचारांच्या अनुषंगाने ग्रामीण समूहजीवनाला आकार देणारे, जीवनभर समर्पणभावनेने प्रयत्न करणारे एक महान रचनात्मक कार्य करणारे समाजशिल्पी होते. स्वराज्य, ग्रामस्वराज्य, चरखासंघ, नई तालीम व भूदान या विषयांवरील त्यांचे विवेचन अनेक बाबतीत गांधी—विनोबा विचारांना पुढे नेताना दिसतात.

प्रस्तुत संशोधनामध्ये धीरेंद्र मजुमदार यांच्या जीवन, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि रचनात्मक कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे. गांधी—विनोंबा विचारांचा धीरेंद्र मजुमदार यांनी ग्रामराज्य, रचनात्मक कार्य नई तालीम आणि त्यातून समाजपरिवर्तनाचा केलेला शोषणमुक्त, वर्गविहीन व शासनमुक्त असे राजकीय विचार यांचा कसा विकास केला याचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात करण्यात आला आहे.

**संशोधन समस्या विधान :**

धीरेंद्रांनी गांधीविचाराचा विकास केला. ते विनोबा भावे यांच्या भूदान ग्रामदान चळवळीमधील कार्यकर्ते होते व त्यांनी ही चळवळ अखेरपर्यंत राबविण्याचा प्रयत्न केला. गांधीजींच्या विचारांचा प्रचंड प्रभाव त्यांच्यावर होता. त्यांच्या मतानुसार गांधीजींचा विचार व त्याप्रमाणे आचार केला तर गांधी विचारांचा विकास होईल आणि त्यामधून नवीन प्रकारची समाज व्यवस्था स्थापन करता येईल.

धीरेंद्रांनी मुख्यतः देशाची सुरक्षितता, राष्ट्रीय विकास, स्वराज्य स्थापना, वर्ग आणि वर्णभेदासंबधी विचार चिकित्सक पध्दतीने मांडले. शोषणमुक्त व शासनमुक्त समाज निर्मिती करणे हा त्यांच्या विचारांचा मुख्य हेतू होता.

धीरेंद्रांनी सांगितलेल्या क्रांतीविषयक विचार, ग्रामसभेचे महत्व, शोषणमुक्त समाजरचना, शेतीचे महत्व, स्वावलंबी समाज इत्यादीबाबी

अभ्यासणे अत्यंत गरजेचे आहे. आज पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर विकेंद्रीकरण झाले आहे. ग्रामसभेला महत्व प्राप्त होत आहे. तंटामुक्त समाज निर्मितीसाठी मोहीमा राबविल्या जात आहेत. या दृष्टीकोनातून धीरेंद्रांचे विचार महत्त्वाचे आहेत. या सर्व विचारांचा अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात येणार आहे. उत्तर गाधींवादी विचारवंतामध्ये सर्वोदय विचारपरंपरेतील आचार्य विनोबा भावे, आचार्य काका कालेलकर, आचार्य दादा धर्माधिकारी आणि लोकशाही समाजवादी परंपरेतील आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर, डॉ. राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण इत्यादी विचारवंतांनी मांडलेल्या विचारांचा अभ्यास झाला आहे. परंतु धीरेंद्र मजुमदार यांच्या विचारावर सखोल असा अभ्यास झाला नाही. वास्तविक पाहता धीरेंद्रांनी आपल्या रचनात्मक व कृतीशील कार्यामधून आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यामुळे त्यांच्या विचारांचा आजच्या संदर्भात अभ्यास करणे महत्वाचे असल्याने प्रस्तुत संशोधनासाठी हा विषय निवडण्यात आला आहे.

**पूर्व अभ्यास अवलोकन :**

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी घेण्यात आलेल्या विषयावर विशेष असा अभ्यास झाला नाही. तरीही धीरेंदांच्या विचारांच्या अनुषंगाने व त्यांच्यावर इतर विचारवंताचा प्रभाव पडलेल्या काही निवडक अभ्यास साहित्याचे अवलोकन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**१) 'लोक–क्रांति–पाथेय' धीरेन्द्र मजुमदार स्मृति–ग्रन्थ – नरेन्द्रभाई (संपा.) : १९८१**

नरेन्द्रभाई यांनी संपादित केलेल्या 'लोक–क्रांति–पाथेय' या ग्रंथात धीरेंद्र मजुमदार यांचे जीवन प्रवाह, कर्तृव आणि मार्ग शोधण्याच्या दृष्टीकोनातून केलेली वैचारिक वाटचाल यांचा आढावा घेतला आहे. आपल्या मौलिक प्रतिभेमुळे तसेच पराक्रमशीलतेच्या कारणामुळे ते लोक–क्रांतीच्या पथिकांसाठी, त्यांच्या विचारांच्या, कार्यक्रमाच्या आणि प्रयोगाच्या बरोबर राहणारे श्री. नरेंद्रभाई यांनी धीरेंद्र एक समाज–शास्त्रज्ञांसारखे आहेत असे मत व्यक्त केले आहे.

धीरेंद्रांच्याद्वारा केलेल्या प्रयोगांवर, त्यांच्याकडून लिहिल्या गेलेल्या पुस्तकांचा, पत्रांचा तसेच त्यांच्या भाषणांचा आणि प्रयोगांमध्ये त्यांच्या बरोबर राहणाऱ्या साथीदारांच्या डायरीमधून विचारांचे संकलन केले आहे. घेतले गेले आहे. धीरेंद्र मजुमदारांच्या जीवन प्रवाहावरील 'लोक—क्रांति—पाथेय' या ग्रंथात जीवन यात्रा, लोक—गंगा—यात्रा आणि विचार यात्रा हे तीन भाग आहेत. या तिनही भागांमध्ये जीवन आणि विचार, ज्ञान आणि कर्म तसेच चिंतन आणि प्रक्रिया हे सर्व धीरेंद्र मजुमदारांना बरोबरीने घेऊन चालतात.धीरेंद्रांना जो काही अनुभव आला, तो या ग्रंथात त्यांच्या शब्दांमध्ये संपादक नरेंद्रभाई यांनी प्रस्तुत केला आहे.

**२) 'धीरेनदा' — मिश्र बजरंग दत्त (संपा.) :**

'धीरेनदा' या नावाने ग्रामस्वावलंबी विद्यालय, आचार्य नगर, फैजाबाद येथील सुवर्ण जयंतीच्या निमित्तांनी एक स्मरणिका बजरंग दत्त मिश्र यांनी संपादीत केली आहे. या स्मरणिकेत धीरेंद्र मजुमदारांचे गुरू, शिष्य, कार्यकर्ते, साथीदार तसेच धीरेंद्रांना मानणारे अनेक सर्वोदयी विचारवंत यांनी लेख लिहिले आहेत.

**३) 'धीरेन्द्र मजुमदार विशेषांक' — चोळकर पराग (संपा.) : २०००**

'साम्ययोग साधना' या मासिकाचे संपादक पराग चोळकर यांनी १६ सप्टेंबर, २००० सालचा अंक 'धीरेंद्र मजूमदार विशेषांक' म्हणून संपादित केला. या विशेषांकात सर्वोदयी कार्यकर्त्यांनी आणि विचारवंतांनी धीरेंद्र मजूमदार यांच्या कार्याचा आणि विचाराचा लेखा—जोखा मांडला आहे. प्रस्तुत अंकामध्ये धीरेंद्रांची जीवनयात्रा त्यांच्याच शब्दात मांडण्यात आलेली आहे. त्याचबरोबर भूदान—ग्रामदान आंदोलनाचे धीरेंद्रभाईनी १९६१ मध्ये एका पत्रात विस्ताराने मूल्यांकन केले होते. त्याचा काही भाग या अंकात संपादकांनी दिलेला आहे. इतक्या वर्षानंतरही हे मूल्यांकन विचारणीय आहे.

### ४) 'धीरेंद्र मजुमदार जीवन आणि कार्य' — पांढरीपांडे सु. श्री. : २००९

प्रस्तुत पुस्तिकेत सु. श्री. पांढरीपांडे यांनी धीरेंद्र मजुमदार यांच्या जीवन आणि कार्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. त्यांच्या मतानुसार धीरेंद्रा हे सर्वोदयाच्या चळवळीमध्ये, एक अत्यंत प्रतिभाशाली विचारवंत, रचनाकार आणि क्रांतिकारक होते. गांधी—विनोबांच्या विचाराचे एक अतिशय प्रतिभाशाली भाष्यकार होतेच, परंतु त्या विचाराच्या अनुषंगाने ग्रामीण समूहजीवनाला आकार देणारे, जीवनभर समर्पणभावनाने प्रयत्न करणारे एक महान रचनाकार व समाजशिल्पकार होते.

ग्रामराज्याची निर्मिती हेच क्रांतीचे उद्दिष्ट होय असे धीरेंद्रांनी मानले. त्यासाठी आवश्यक असलेल्या सत्तापरिर्वनाचे स्वरूप म्हणजे राज्यसत्तेपासून मुक्ती हेही त्यांनी मान्य केले असे पांढरीपांडे आपल्या छोटीखानी पुस्तिकेत प्रतिपादन करतात.

### ५) 'खेडयाचे बंड' — आचार्य राममुर्ती : २०१४

धीरेंद्र मजुमदारांचे सहकारी आणि शिष्य असणारे प्रो. राममुर्ती यांनी प्रस्तुत ग्रंथामध्ये ग्रामदान, क्रांती, गावाचे महत्त्व याविषयीचे विचार मांडले आहेत. गावामधील गावपण संपले असून येथे ग्रामभावना नाही, एकता नाही, प्रत्येक जण स्वार्थी बनला आहे त्यामुळे गावाचे बकालीकरण झाले आहे असे लेखकांनी निरीक्षण नोंदविले आहे. अशा गावात विकास योजना राबवून गावाचा विकास कसा करता येईल याचे चिंतन पुढे लेखकांनी केले आहे. सर्वोदय विचारसरणीमधून लोकांचे विचार परिवर्तन होऊ शकते. सर्वोदयामध्ये अभिनव सुलभ ग्रामदान, ग्रामभिमुख खादी व शांतिसेना या त्रिविध कार्यक्रमाचा समावेश आहे. प्रो. राममूर्तिच्यावर धीरेंदाच्या विचारांचा प्रचंड प्रभाव होता. ते धीरेंदाना गुरूस्थानी मानत होते. राममूर्तिनी धीरेंदांचा कृतिशील वैचारिकवारसा पुढे चालविला.

**६) स्वराज्य : दिशा आणि दर्शन (गांधीं—विनोबांच्या विचारांवरील चिकित्सक लेख): पांढरीपांडे सु. श्री. : २००७**

प्रा. सु. श्री. पांढरीपांडे यांनी आपल्या 'स्वराज्य: दिशा आणि दर्शन' या पुस्तकामध्ये महात्मा गांधीच्या 'हिंदस्वराज्य' आणि आचार्य विनोबा भावे यांच्या 'स्वराज्यशास्त्र' या पुस्तकांची मीमांसा केली असून त्यामध्ये सत्याग्रह कल्पनेचाही विचार केला आहे. 'स्वराज्य' हा महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा यांच्या विचारांचा गाभा आहे. प्रा. पांढरीपांडे यांच्या मतानुसार 'स्वातंत्र्य' आणि 'स्वराज्य' या दोन संकल्पनांमधील फरक गांधी—विनोबांच्या विचारांत सुरूवातीपासून दिसून येतो.

सत्याग्रही आणि आत्मसंयमी अशा व्रतस्थ, शासननिरपेक्ष व्यवस्थेचे गांधी—विनोबांनी रेखाटलेले चित्र प्रस्तुत ग्रंथांतून आपल्यासमोर प्रा. सु.श्री. पांढरीपांडे यांनी ठेवले आहे.

**७) 'हिंद स्वराज्य आणि आत्मबळाची प्राप्ती' — चौसाळकर अशोक : २००८**

प्रस्तुत पुस्तिकेमध्ये अशोक चौसाळकर यांनी महात्मा गांधींच्या हिंदस्वराज्य या पुस्तकात मांडण्यात आलेल्या दोन विषयांची चर्चा केली आहे. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या संदर्भात गांधींचे काय मत होते यांचा उहापोह केला आहे. त्याचप्रमाणे आत्मबलाची प्राप्ती करून आत्मबळ कसे वाढविता येईल याची ही चर्चा केली आहे.

गांधींच्या मते, बळ दोन प्रकारचे असते, एक शारीरिक बळ व दुसरे आत्मबळ होय. शारीरिक बळावर अन्यायाविरूध्द संघर्ष केला तर तो संघर्ष तुम्हाला अपेक्षित असणारे परिणाम साध्य करून देणार नाही कारण बळ असेपर्यंत मागण्या मान्य केल्या जातील पण ज्या दिवशी तुमचं बळ संपेल त्यादिवशी तुमच्या मागण्या मान्य केल्या जाणार नाहीत. कारण हे बळ भीतीवर आधारलेले आहे. खर जे आहे ते आत्मबळ आहे आणि गांधीचा हिंद—स्वराज्यचा मुख्य संदेश हा आहे की, तुम्ही आत्मबळ संपादन करा. धीरेंद्रानी गांधीचा आत्मबलाचा विचार आत्मसात केला होता व त्यांनी स्वतंत्र बुध्दीने व सद्सद् विवेकबुध्दीच्या आधारे आयुष्यभर रचनात्मक कार्य केले.[७] प्रा.

चौसाळकर यांनी गांधी, विनोबा यांच्या विचाराचे चिंतन या पुस्तकामध्ये केले आहे.

**८) 'महाराष्ट्रातील गांधीवादाचा विकास आणि अन्वयार्थ' — चौसाळकर अशोक (संपा.) : २००३**

या पुस्तकात महाराष्ट्रामध्ये महात्मा गांधींच्या विचारांचा विकास कशा प्रकारे झाला. गांधींजींच्या विचारांचा गांधीवाद्यांनी जो अन्वयार्थ लावला. याचे विवेचन करणारे निबंध डॉ.अशोक चौसाळकर यांनी संपादित केले आहेत.

'विनोबा आणि सर्वोदय विचारांची मांडणी' या अभ्यासपूर्ण लेखात वसंत पळशीकर यांनी विनोबांच्या सर्वोदय कल्पनेची सखोल अशी चिकित्सा केली आहे.

शंकरराव देव यांनी लोकमान्य टिळक व महात्मा गांधी या दोन राष्ट्रीय नेत्यांनी गीतेचा जो अर्थ लावला त्याबाबत सखोल असा विचार केला होता. महात्मा गांधींचा 'अनासक्तियोग' कशाप्रकारे टिळकांनी केलेल्या गीता विवेचनाला पुढे नेतो याचे शंकररावांनी प्रत्ययकारक विवेचन केले. प्रा. भारती पाटील यांनी त्यांच्या या विषयांवरील लेखात युध्द ही संस्था कायमची नष्ट करण्यासाठी माणसा—माणसांतील व्यवहार अहिंसा व प्रेम या मार्गाने झाले पाहिजेत या शंकरराव देवांच्या विचारांचे विवेचन केले आहे.

डॉ. राजेश्वरी देशपांडे यांनी जावडेकरांनी सत्याग्रही समाजवादाच्या संदर्भात गांधी व मार्क्स यांचे परस्पर प्रकाशातील पुनर्वाचन केले आहे.

**९) 'महात्मा गांधींची विचारसृष्टी काही अलक्षित पैलू' — सुमंत यशवंत :२०१६**

प्रा. यशवंत सुमंत यांनी आपल्या 'महात्मा गांधींची विचारसृष्टी काही अलक्षित पैलू' या प्रस्तुत लेखसंग्रहात १९९५ ते २०१० या कालखंडात त्यांचे विविध नियतकालिकातून व ग्रंथातून प्रसिध्द झालेले लेख प्रकाशित केले आहेत. या लेखसंग्रहात प्रा. सुमंत यांनी केलेली गांधीविचारांविषयी मांडणी आणि त्या मांडणीद्वारे काही अलक्षित पैलूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. सर्वोदयवाद्यांतील कर्मकांडवादी, आंबेडकरवाद्यातील पुणे करारात अडून बसलेले

प्रवाह आणि गांधीविचाराकडे प्रच्छन्न धुरीणत्ववादी म्हणून पाहणारे डावे आणि सबाल्टर्न प्रवाह या सर्वांना जे गांधी दिसले त्यातून गांधीविचाराचे समतावादी, परिवर्तनवादी आणि संघर्षशीलतेचे पैलू अलक्षित राहिले प्रा. सुमंत यांनी केलेल्या मांडणीतून गांधीविचारांच्या या पैलूंवर प्रकाश पडतो.[९]

**१०) 'आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर' — देशपांडे राजेश्वरी : २०१०**

प्रस्तुत ग्रंथाच्या लेखिका प्रा. राजेश्वरी देशपांडे यांनी आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर यांचे चरित्र लिहिले आहे.

सदरच्या ग्रंथामध्ये आचार्य जावडेकरांच्या वैचारिक जागृतीची अधिष्ठान असलेल्या 'आधुनिक भारत' या ग्रंथाबद्दल लेखिकेने या चरित्र ग्रंथात अंर्तभाव केला आहे. भांडवली विषमता आणि अन्याय यांच्या विरोधात सामाजिक क्रांती कशी घडवता येईल, हा आचार्यांच्या चिंतनाच्या मुख्य विषय राहिला. त्या संदर्भात गांधी आणि मार्क्स यांच्या विचारांचे परस्पर प्रकाशात पुनर्वाचन करून जावडेकर यांनी सत्याग्रही समाजवाद ही नवी विचारसरणी पुढे मांडली. या मांडणीतून गांधीवादाचा एक नवा अन्वयार्थ मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

**११) 'गांधीजी आणि त्यांचे टीकाकार' — द्वादशीवार सुरेश : २०१८**

लेखक सुरेश द्वादशीवार यांनी १५ ऑगस्ट, २०१७ ते २४ फेब्रुवारी, २०१८ या काळात साधना साप्ताहिकातून क्रमशः प्रसिध्द केलेले लेख संग्रहित करून ते 'गांधीजी आणि त्यांचे टीकाकार' या ग्रंथात साधना प्रकाशनाने प्रसिध्द केले. प्रस्तुत लेखसंग्रहात टीकाकारांनी केलेली टीका, त्या टिकेमागील त्यांच्या भूमिका, त्या टिकेमधील खरेखोटेपणा, ते सांगत असताना त्या टीकाकारांना कमी लेखण्याचे साहस न करता, त्यात गुंतलेल्या प्रत्येक प्रश्नाचे स्पष्ट स्वरूप तसेच त्याविषयी सर्व संबंधितांनी घेतलेल्या भूमिका पुढे याव्यात या दृष्टीकोनातून लेखकाने लेखन केले आहे.

**१२) 'मोहनमायाः गांधी आणि त्यांचा मित्र परिवार' — भटकळ रामदास : २०१०**

रामदास भटकळ यांनी स्वतःच्या मित्रांबद्दल लिहीताना 'स्टडी इन फ्रेंडशिप' चा प्रयत्न 'जिगसॉ' या आपल्या पहिल्या ग्रंथात केला होता. यामध्ये

त्यांनी मैत्रीचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. तेच सूत्र घेऊन किंवा तसाच प्रयत्न करून त्यांनी 'मोहनमाया: गांधी आणि त्यांचा मित्र परिवार' हा दुसरा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाचे वैशिष्टये म्हणजे मोहनदास गांधी ते महात्मा गांधी, गांधींच्या व्यक्तिमत्वातील माणूस ते महात्मा अशा परिवर्तनाची एक शोधप्रक्रिया आहे.

महात्मा गांधींच्या आणि त्यांच्या मित्र परिवाराच्या स्नेहबंधांच्या पार्श्वभूमीवरून घडत गेलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्वाचा असा व्यक्तित्व शोध रामदास भटकळ यांनी प्रस्तुत ग्रंथांत घेतलेला आहे.

**१३) Vinoba And this Mission (Being an account of the rise and growth of the Bhoodan yojna movement) : Suresh Ram : 1962**

विनोबांच्या भूदान चळवळीमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेणारे गांधीवादी विचारसरणीचा अंगीकार करणारे सुरेश राम यांनी विनोबांचे जीवन, कार्य आणि विचारसरणीवर या ग्रंथामधून प्रकाश टाकला आहे. या ग्रंथाला डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन तसेच जयप्रकाश नारायण यांची प्रस्तावना लाभली आहे. श्री.सुरेश राम यांनी चार विभागामध्ये विनोबांच्या जीवन व कार्याचा आढावा घेतला आहे. पहिल्या भागात विनोबांचे जीवन तर दुसऱ्या भागात भूदान चळवळीचा उदय व भूदानाच्या तेलंगणा ते गया यामधील प्रगतीचा आढावा घेतला आहे. तिसऱ्या भागात भूदानाचा दृष्टीकोन आणि भूदानाची तंत्रे तर चौथ्या भागात भूदान ते संपत्तीदान, लोकनीती व शेवटी सर्वोदय विचारसरणीचा तपशीलवार आढावा घेतला आहे. या ग्रंथात धीरेंद्र मजुमदार यांच्या भूदानामधील सहभागाची व विनोबांबरोबर केलेल्या कार्याची थोडक्यात माहीती दिली आहे. सुरेश राय हे भूदान चळवळीमधील सक्रीय कार्यकर्ते होते. तेसुध्दा विनोबांच्या बरोबर प्रत्येक खेडयामध्ये जात होते. महाराष्ट्र, गुजराथ, राजस्थान,पंजाब, काश्मीर, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, आसाम इ. राज्यामधील विनोबांच्या भूदान, ग्रामदान, संपत्तीदान चळवळीचा अतिशय सखोल आढावा लेखकाने घेतला आहे. विनोबांच्या शांतीसेनेची, ग्रामस्वराज्याची तसेच लोकनीती व सर्वोदय इ. ची सविस्तर चर्चा केली आहे.

**१४) 'Indian Theory of State and Politics : Critical Study (With Reference To Ideas of Gandhi, Vinoba and Jayprakash Narayan) – Patil Bharati : 2007**

भारती पाटील यांनी आपल्या या अप्रकाशित पीएच्.डी. शोधप्रबंधामध्ये महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण यांच्या राज्यविषयक विचारांचा परामर्श घेत, त्याची विस्तृत अशी चर्चा केली आहे. प्रस्तुत प्रबंधामध्ये गांधीवादी विचारवतांच्या राज्यविषयक सिध्दांतांचे मूल्यमापनही करण्यात आले आहे. राज्याचा उदारमतवादी लोकशाही सिध्दांत आणि राज्याचा मार्क्सवादी सिध्दांत या दोहोंमधील मर्यादा लक्षात आल्यामुळे एका पर्यायी राज्यविषयक सिध्दांताची आवश्यकता आहे असे डॉ. भारती पाटील यांना वाटते.

प्रस्तुत प्रबंधामध्ये महात्मा गांधी, विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण यांच्या राज्यविषयक सिध्दांताची मांडणी करण्यात आली आहे. त्यांच्या मांडणीतून असे स्पष्ट होते की, महात्मा गांधी आणि गांधीवाद्यांना एक असा समाज निर्माण करावयाचा होता की, ज्यामध्ये अंतिमत: राज्यच अस्तित्वात राहणार नाही. स्वराज्य, स्वदेशी आणि सत्याग्रह या त्रिसूत्रीच्या आधारे समाजामध्ये सातत्याने सुधारणा करणे आणि प्रस्थापित राज्य व्यवस्थेतही सुधारणा करणे, हे त्यांच्या दृष्टीने अंतिम ध्येय होते.

**१५) 'Social and Political Thought of Acharya Jawadekar' – Pawar S. D. : 1994**

प्रस्तुत अप्रकाशित पीएच.डी शोधप्रबंधात शिरीष डी. पवार यांनी आचार्य जावडेकर यांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांचा अभ्यास केला आहे. आचार्य जावडेकर यांच्यावर महात्मा गांधींनी मांडलेल्या तत्त्वज्ञानाचा आणि मार्क्सने मांडलेल्या समाजवादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. या दोघांच्या समन्वयातून आचार्य जावडेकरांनी मांडलेल्या सत्याग्रही समाजवादी विचारांचा परामर्श सदरच्या शोध प्रबंधात घेतला आहे.

**१६)'भूदान चळवळ : एक चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ महाराष्ट्र' — राऊत गणेश दत्तात्रय : २०११**

पीएच. डी. संशोधन प्रबंधात डॉ. गणेश राऊत यांनी भूदान चळवळीचा ऐतिहासिक आणि चिकित्सक अभ्यास केला आहे. स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासातील 'भूदान चळवळ' ही पहिलीच व्यापक पातळीवरील अहिंसक चळवळ होती. महात्मा गांधीजींचे अध्यात्मिक वारसदार असणाऱ्या विनोबा भावे यांच्या विचार चिंतनातून स्फूरलेली ही एक कल्पना होती. आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी विनोबा भारतभर १८ वर्षे पदयात्रा करीत राहिले. प्रस्तुत शोधप्रबंधाच्या अभ्यासात भूदान चळवळीच्या यशापयशाची चर्चा न करता त्याची ऐतिहासिक मांडणी करून भूदान चळवळीचे २१ व्या शतकात पुरूज्जीवन करता येईल, या कल्पनेवर अभ्यास करण्यात आला आहे. आजच्या युगात या चळवळीचे महत्व कमी झालेले नाही आणि कायद्याच्या चौकटीत ही चळवळ पुन्हा एकदा सुरू करता येईल याचे उदाहरणासहित स्पष्टीकरण अभ्यासकाने केले आहे.

**१७) 'काकासाहेब कालेलकर यांचे सामाजिक आणि राजकीय विचार' — बंदारे मल्लिकार्जुन : २००९**

प्रस्तुत अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंधामध्ये मल्लिकार्जुन बंदारे यांनी काकासाहेब कालेलकर यांचे सामाजिक आणि राजकीय विचारांचे विस्तृत असे विश्लेषण केले आहे. हे विश्लेषण करीत असताना त्यांनी आचार्य काका कालेलकर यांच्या सत्याग्रह विचारांची मीमांसा केली आहे.

आचार्य काकासाहेब कालेलकरांनी गांधीवादाचा नवा अर्थ लावण्याचा आणि विशेषत: प्रबोधनाचे, लोकशिक्षणाचे, लोकजागरणाचे कार्य केले. काका कालेलकरांनी केलेली गीतामीमांसा, सत्याग्रह, समन्वय संस्कृती आणि भारतीय राष्ट्रवाद, भाषा आणि राष्ट्रीय एकीकरणाचा प्रश्न, मागासवर्गीयाचा विकास, शिक्षण या क्षेत्रात गांधीविचारांना पुढे नेण्याचा आणि ते समृध्द करण्याचा जो प्रयत्न त्यांनी केला त्याचे विस्तृत असे विश्लेषण बंदारे यांनी केले आहे.

**१८) 'उत्तर गांधीवादी अहिंसात्मक राजकीय प्रतिकाराचा सिंध्दांत' —लोखंडे निलकंठ : २०१४**

निलकंठ लोखंडे यांनी 'उत्तर गांधीवादी अहिंसात्मक राजकीय प्रतिकाराचा सिध्दांत' या त्यांच्या अप्रकाशित पीएच. डी. प्रबंधात गांधीनंतरच्या गांधीवाद्यांच्या अहिंसात्मक राजकीय प्रतिकाराच्या सिध्दांताचा आणि त्यांनी केलेल्या विकासाचा चिकित्सक अभ्यास केला आहे. प्रस्तुत प्रबंधात उत्त्तर गांधीवाद्यामध्ये सर्वोदय विचार परंपरा आणि लोकशाही समाजवादी विचार परंपरा अशा दोन गांधीवादी परंपरांचा अभ्यास केला आहे.

वरील लेखन साहित्याचे पुनर्विलोकन केले असता असे लक्षात येते की, धीरेंद्रांच्या जीवन व कार्याचा तसेच विचारांचा आणि त्यांनी केलेल्या रचनात्मक कार्यक्रमाचा सखोल संशोधनात्मक अभ्यास व लेखन झालेले नाही. हा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. धीरेंद्र मजुमदार यांच्या जीवन व कार्याचा अभ्यास करणे.
२. धीरेंद्र मजुमदार यांच्या सामाजिक व शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.
३. धीरेंद्र मजुमदार यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करणे.
४. धीरेंद्र मजुमदार यांच्या रचनात्मक कार्याचा अभ्यास करणे.
५. धीरेंद्र मजुमदार यांनी गांधी विचारांचा केलेला विकास अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके :**

१. धीरेंद्र मजुमदार यांनी ग्रामीण आणि साधी जीवनपध्दती स्वीकारून ग्रामीण भागात कार्य केले.
२. धीरेंद्र मजुमदार यांनी अहिंसाधिष्ठित समाजरचनेचा आणि श्रमाधारीत शिक्षण व्यवस्थेचा विचार मांडला.
३. धीरेंद्र मजुमदार यांनी वर्गविरहित, राज्यविरहीत समाज स्थापन करण्याचा विचार मांडला.
४. धीरेंद्र मजुमदार यांनी प्रत्यक्ष रचनात्मक कार्य केले.

५. धीरेंद्र मजुमदार यांनी गांधी विचारांचा विकास केला.

**संशोधनाची उणीव :**

आजपर्यंत गांधीवादी विचारवंत असणारे आचार्य विनोबा भावे, आचार्य दादा धर्माधिकारी, आचार्य काकासाहेब कालेलकर, जयप्रकाश नारायण, आचार्य श. द. जावडेकर यांच्या संबंधी अभ्यास झालेला आहे. परंतु जेष्ठ गांधीवादी आणि कृतीशील रचनाकार धीरेंद्र मजुमदार हे दुर्लक्षित राहिलेले आहेत. धीरेंद्र महाराष्ट्रामधील वर्धा येथे काही दिवस राहिले. परंतु त्यांची कर्मभूमी ही उत्तर प्रदेश, बिहार राज्यात प्रत्यक्षपणे गांधीवादी विचारावर आधारित कार्य करण्यात राहिली. महात्मा गांधींनी स्वातंत्र्य लढयाबरोबर जी रचनात्मक कार्याची जोड दिली होती, त्याचे ते प्रत्यक्ष कृतीशील रचनात्मक कार्यकर्ते होते. मात्र त्यांनी केलेल्या भूदान, ग्रामदान असे रचनात्मक कार्य आणि रचनात्मक कार्यकर्त्यांना घडविणारे, तसेच सामाजिक आणि राजकीय विचारांच्या विषयी विश्लेषणात्मक व समकालीन स्वरूपात संशोधन झालेले नाही. सदरच्या संशोधनामध्ये हा प्रयत्न केला आहे.

**संशोधन विषयाचे महत्त्व :**

धीरेंद्रांनी गांधी विचाराचा विकास करीत असताना उतर प्रदेश आणि बिहार या ठिकाणी प्रत्यक्ष अनुभवातून रचनात्मक कार्य केले. धीरेंद्रांनी सांगितलेल्या ग्रामसभा, ग्रामपंचायत यामधून गावाचा विकास साधणे शक्य आहे. त्यांनी भांडवलशाही, नोकरशाही यामधील धोके सांगितले व शोषणहीन आणि शासन मुक्त समाजाची मांडणी केली. अहिंसक पध्दतीने समाज परिर्वतन घडवून रिॲप्रोचमेंट द्वारे नव समाज निर्मिती सांगितली. आज जमातवाद, जातीवाद यामुळे सामाजिक ऐक्य धोक्यात आले आहे. वाढत्या शहरीकरणामुळे खेडी ओस पडत आहेत. यापार्श्वभूमीवर शाश्वत विकासासाठी खेडयांचा विकास होणे आवश्यक आहे. यासाठी धीरेंद्रांनी सांगितलेल्या विचारांचा अभ्यास करणे अत्यंत महत्वाचे आहे.

**संशोधन विषयाची व्याप्ती :**

सदरचे संशोधन हे धीरेंद्र मजुमदार यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक विचार व रचनात्मक कार्य आणि त्यांनी केलेल्या गांधीविचाराच्या विकासाशी संबंधित आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधप्रबंधात ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये उपलब्ध ग्रंथसामग्री, कागदपत्रे, ऐतिहासिक दस्तऐवज यांचे विश्लेषण केले आहे. ऐतिहासिक दस्तऐवज व साधनांचा वापर करून संकलित करण्यात आलेली माहिती आणि विचार यांचा सुसंगत तटस्थपणे अभ्यास करण्यावर भर देण्यात आला आहे.

**माहीती संकलन पध्दती :**

धीरेंद्र मजुमदार यांच्या राजकीय विचारांचे अध्ययन मुख्यत: प्राथमिक आणि दुय्यम साधनांच्या आधारे करण्यात आले आहे. धीरेंद्र मजुमदारांनी लेखन केलेल्या उपलब्ध साहित्याचा आढावा प्राधान्यांने घेण्यात आला आहे. धीरेंद्र मजुमदार यांची मूळ ग्रंथ संपदा, त्यांचे सामाजिक व राजकीय योगदान आणि त्याबाबतची ग्रंथसंपदा, कागदपत्रे, लेख, मुलाखती इत्यादी प्राथमिक साधनाचा वापर केला आहे. तसेच धीरेंद्र मजुमदार यांच्या सामाजिक व राजकीय विचारावर लिहिलेल्या इतर लेखकांचे ग्रंथ तत्कालीन मासिके, लेख, पत्रव्यवहार इत्यादी दुय्यम साधनाचाही वापर करण्यात आला आहे.

**माहीतीचे विश्लेषण :**

भारतामधील ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेल्या धीरेंद्र मजुमदारांशी संबधीत साहित्याच्या आधारे माहितीचे संकलन व त्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. संकलित माहितीच्या आधारे ऐतिहासिक क्रमवारीचा अवलंब करून प्रकरण निहाय मांडणी करण्यात आली आहे. धीरेंद्र मजुमदार यांच्या सामाजिक व राजकीय विचारांच्या चिकित्सक अभ्यासावर भर देणात आला आहे.

**प्रकरण योजना :**

**प्रकरण पहिले : प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाची प्रस्तावना, प्रस्तुत विषयाची निवड का केली, प्रस्तुत विषयासंदर्भात आजपर्यंत झालेला अभ्यास, प्रस्तुत संशोधनातील उणीवा, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधन पध्दती इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

**प्रकरण दुसरे : धीरेंद्र मजुमदार यांचा जीवन परिचय**

प्रस्तुत प्रकरणात धीरेंद्र मजुमदार यांचा कौटुंबिक परिचय, त्यांनी घेतलेले शिक्षण, धीरेंद्र मजुमदार यांच्यावर पडलेला प्रभाव, तसेच धीरेंद्र मजुमदार यांनी केलेले कार्य यांचे विवेचन केले आहे.

**प्रकरण तिसरे: धीरेंद्र मजुमदार यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार**

प्रस्तुत प्रकरणात धीरेंद्र मजुमदार यांनी गांधी—विनोबा यांच्या सामाजिक विचाराला आपल्या परिप्रेक्षेतून रचनात्मक आणि अहिंसकमूलक कार्य आणि विचारांचा तसेच त्यांनी गांधीच्या नई तालिमच्या विकसित रूपाचा उहापोह केला आहे.

**प्रकरण चौथे: धीरेंद्र मजुमदार यांचे राजकीय विचार**

प्रस्तुत प्रकरणात धीरेंद्र मजूमदार यांनी मांडलेला शासन निरपेक्ष समाज शासन मुक्त समाज, वर्गविहीन समाजव्यवस्था आणि अहिंसात्मक साधनांचे विस्तृत विवेचन केले आहे.

**प्रकरण पाचवे: धीरेंद्र मजुमदार यांचे रचनात्मक कार्य आणि गांधीविचारांचा केलेला विकास**

प्रस्तुत प्रकरणात धीरेंद्र मजुमदार यांनी केलेल्या ग्रामसेवा, ग्रामभारती, खादीग्राम, लोकगंगा यात्रा इ. रचनात्मक कार्याचा अभ्यास केला आहे. धीरेंद्र मजुमदार यांनी महात्मा गांधींजींच्या विचाराचा आणि आचार्य विनोबा भावे यांच्या विचाराचा अनेक बाबतीत विकास केला आहे. या गांधी—विनोबांच्या

विचारांचा विकास आणि रचनात्मक कार्यक्रम यांचा प्रस्तुत प्रकरणात अभ्यास करण्यात आलेला आहे.

**उपसंहार व निष्कर्ष**

प्रस्तुत प्रकरणात प्रबंधातील सर्व प्रकरणांचा थोडक्यात आढावा घेऊन संशोधनाचे निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. तसेच धीरेंद्रांच्या विचाराचे औचित्य व महत्व अधोरेखित केले आहे.

***********

# प्रकरण दुसरे

# धीरेंद्र मजुमदार: जीवन परिचय

**प्रस्तावना :**

धीरेंद्र मजुमदार हे महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांचे सर्वोत्तम कृतीशील शिष्य होते. एक थोर विचारवंत, प्रतिभाशाली रचनात्मक कार्यकर्ते आणि वैराग्यसंपन्न अशा समर्पित सर्वोदय परिवारात धीरेंद्र मजुमदार यांना 'धीरेंदा' हया नावाने सन्मानपूर्वक आणि श्रध्दापूर्वक ओळखले जाते. मात्र सर्वोदय परिवाराच्या बाहेर त्यांची ख्याती फारशी पसरली नाही. महाराष्ट्रातील सर्वोदयाच्या चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांना वगळता धीरेंद्रांचे नाव फारसे कुणाला माहीत नाही. कारण उत्तरप्रदेशमधील गोरखपूर ही त्यांची जन्मभूमी आणि उत्तर प्रदेश व बिहार ही त्यांची कर्मभूमी होती. भारतीय स्वातंत्र्य लढयातील त्यांच्या कर्तृत्वाचे क्षेत्रही मुख्यत: उत्तरप्रदेश आणि बिहार याच भागात राहिले आणि भूदान—ग्रामदान आंदोलन सुरू झाल्यानंतरच्या काळातील त्यांचे मूलगामी रचनात्मक कार्यही स्वाभाविकपणे त्याच क्षेत्रात पसरले. या क्षेत्रीय मर्यादांच्या बरोबरच धीरेंद्रांच्या स्वभावातील अभिजात विनयशीलता, प्रसिध्दपराङ्.मुखता आणि आत्मविलापीवृत्ती या सर्व कारणांमुळे धीरेंद्रांचे मौलिक असे रचनात्मक कर्तृत्व आणि त्यांचे मूलगामी विचारधन कधीही प्रसिध्दीच्या झोतात आले नाही. प्रस्तुत प्रकरणात धीरेंद्र मजुमदार यांचा जीवन परिचय, शिक्षण, धीरेंद्र मजुमदार यांच्यावर पडलेला प्रभाव, धीरेंद्रांचे लेखन तसेच धीरेंद्र मजुमदार यांनी केलेले कार्य यांचे विवेचन केले आहे.

**धीरेंद्र मजुमदार यांचा जीवन परिचय :**

धीरेंद्रांचे वडील गोरखपूला असताना धीरेंद्र मजुमदार यांचा जन्म १० सप्टेंबर, १९०० रोजी झाला.(अग्रवाल, २०००:४५) धीरेंद्रांच्या वडिलांची बदली रेल्वे लाइनच्या सेवेसाठी सतत व्हायची आणि ती सर्व ठिकाणं खेडया—पाडयात असत. त्याकाळी खेडयापाडयात शिक्षणांसाठी शाळा उपलब्ध नव्हत्या. धीरेंद्रांच्या आईचे शिक्षणही जेमतेमच झाले होते. सुरूवातीला

आईजवळ बसून स्वयंपाकखोलीत धीरेंद्र आणि त्यांचे भाऊ—बहीण शिकत होते.

धीरेंद्र मजुमदार यांचे मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण लहेरियासराय येथे झाले.

**असहकार आंदोलन आणि धीरेंद्र मजुमदार:**

मॅट्रीक झाल्यानंतर धीरेंद्र कलकत्ता येथील स्कॉटिश चर्च कॉलेजातून इंटरसायन्स पास झाले. नंतर बनारस हिंदू विश्वविद्यालयात मेकॅनिकल इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रेवश घेतला. (पांढरीपांडे,२००३:९) कॉलेज सुरू होऊन पाच महिनेच झाले असतील तोपर्यंत १९२० चे महात्मा गांधीचे असहकार आंदोलन सुरू झाले. धीरेंद्र मजुमदारही त्या असहकार आंदोलनाच्या प्रवाहात सहभागी झाले आणि या असहकार आंदोलनाचा त्यांच्या मनावर खूप मोठा प्रभाव पडला.

याच काळात धीरेंद्रांच्या एका मावसबहीणीचे लग्न होते. आंदोलनामुळे कॉलेजमधील वर्गही होत नव्हते. तेव्हा लग्नासाठी सुट्टी घ्यावी असे त्यांनी ठरवले. सुट्टीसाठी अर्ज लिहायला घेतला आणि त्यांनी 'टू द प्रिंसिपल' (मा. प्राचार्य) असा मायना लिहिला आणि पुढे काय लिहायचे याचा विचार करीत होते, तर हातांनी एकाएकी लिहिले— 'इन रिस्पॉन्स टू द नेशन्स कॉल, आय डू नॉट वॉन्ट टु कन्टिन्यू इन गव्हर्नमेन्ट—चार्टर्ड अँड एडेड इन्स्टिटयूशन. काइन्डली, देअरफोर, स्ट्राइक ऑफ माय नेम फ्रॉम द कॉलेज रजिस्टर.' ('राष्ट्राच्या आवाहनानुसार, सरकारच्या अनुमतीने आणि मदतीवर चालणाऱ्या संस्थेत राहण्याची माझी इच्छा नाही. कृपया माझे नाव कॉलेज रजिस्टरमधून काढून टाकावे.') हे लिहून खाली त्यांनी सही केली. त्यांनी काय लिहिले हे त्यांनी स्वतःच वाचले, तेव्हा ते अचंबित झाले. त्यांच्याकडून कोणीतरी हे लिहून घेतले की काय? असे त्यांना वाटू लागले. काही सुचत नव्हते म्हणून अर्ज कचऱ्याच्या टोपलीत फेकून दिला. त्यांना वाटू लागले की, ही निश्चितच ईश्वरी प्रेरणा आहे. दुसऱ्या दिवशी प्राचार्यासमोर तो अर्ज ठेवला. तेव्हा ते तो अर्ज वाचून स्तब्धच झाले. मग आश्चर्याने त्यांनी विचारले की, मजुमदार अर्ज शुध्दीवर असताना लिहिलेला आहे ना? त्यावर धीरेंद्रांनी उत्तर दिले की, होय सर. काही वेळ धीरेंद्रांना प्राचार्यांनी समजावून सांगितले. परंतु धीरेंद्रांनी पुढे

कॉलेजमध्ये शिकण्याचा नकार दिला म्हणून रजिस्टर मागवून धीरेंद्रांचे नाव प्राचार्यांनी काढून टाकले. कॉलेजचे प्राचार्य आयरिश होते आणि त्यांचा देशही स्वातंत्र्याची लढाई लढत होता. (नरेंद्रभाई,(संपा), ,१९८१:८) म्हणून धीरेंद्रांना कॉलेज सोडून जाताना त्यांनी शुभेच्छा आणि आशीर्वादही दिला. अशा प्रकारे धीरेंद्रांनी १९२१ मध्ये कॉलेज सोडून स्वातंत्र्य चळवळ व समाजकारणामध्ये सहभाग घेतला.

**आचार्य कृपलानींच्या गांधी आश्रमात प्रवेश :**

आचार्य कृपलानीं, धीरेंदा आणि त्यांच्या मित्रांची चौकशी केली आणि आश्रमात राहण्याची परवानगी दिली. त्यांनी धीरेंद्र आणि त्यांच्या मित्रांचे मनापासून आश्रमात स्वागत केले. त्यांच्या प्रवचनाचा खूप प्रभाव त्यांच्या मनावर पडला आणि धीरेंद्रांनी ठरवून टाकले आणि मित्रांनाही सांगितले की, 'माणूस बनायचे असेल तर आचार्य कृपलांनींना सोडू नका. येथेच आश्रमात रहा. आता सी. आर. दास यांच्याकडेही जाण्याची काहीच गरज नाही. '(नरेंद्रभाई,(संपा),१९८१:९—१०) अशा रीतीने गांधी आश्रमात धीरेंद्र आणि त्यांचे दोन मित्र दाखल झाले आणि खऱ्या अर्थाने गांधी विचाराचा प्रभाव त्यांच्या मनावर पडण्यास सुरूवात झाली.

धीरेंद्रांचे हे नवे जीवन एक वर्षभर गेले. धीरेंद्र एक शहरी मनोवृत्तीचे शिक्षित तरूण होते. खेडयांबद्दल त्यांना काही माहिती नव्हती. पण महात्मा गांधीजी व अन्य पुढाऱ्यांच्या लेख—भाषणांतून एवढी खूणगाठ मनात बांधली गेली होती की भारत खेडयात राहतो. या कालखंडात खेडयात महात्मा गांधींजींच्या रचनात्मक कार्यक्रमानुसार चरख्याद्वारे ग्रामसंघटन करण्याचा प्रयत्न सुरू झाला होता. याच काळात धीरेंद्रांनी त्यांची राहणी खूप साधी केली होती. यासुमारास दिनेशचंद्र चक्रवर्ती नावाच्या तरूणाने बनारसमध्ये अस्पृश्यांमध्ये काम करणे सुरू केले होते. धीरेंद्रही त्यांच्यासोबत अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊ लागले. धीरेंद्रांच्या मनात त्यामुळे एका नव्या प्रेरणेने जन्म घेतला आणि त्यांच्यातही परिवर्तन होऊ लागले. त्यानंतर त्यांना वाटू लागले की, आश्रमातील लोक त्यांना कधी खेडयात पाठवतील.

सन १९२३ मध्ये फैजाबाद जिल्हयातील अकबरपूरच्या खादी केंद्रात येण्याचे निमंत्रण मिळताच धीरेंद्र तिथे गेले. अकबरपूरला धीरेंद्र मुख्यत: औषधे देण्याचे काम करीत होते. तत्पूर्वी धीरेंद्रांनी होमिओपॅथीचा अभ्यास याच दृष्टीने केला होता की, खेडयात जेव्हा त्यांना जावे लागेल, तेव्हा या ज्ञानाचा उपयोग होईल. हळूहळू धीरेंद्र खेडयांतील लोकांसोबत समरस होऊ लागले. याकाळात धीरेंद्रांची उच्चत्वाची भावना जवळपास समाप्त झाली होती.

**धीरेंद्रांची पदयात्रा सुरूवात :**

एकदा आश्रमातील काही लोक पायी भ्रमण करण्याचे ठरवित होते. धीरेंद्रांनीही त्यांच्या सोबत जाण्याचे ठरविले. धीरेंद्राच्या प्रवासाचा हेतू हा होता की, देशाचा अभ्यास करणे. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि गुजराथच्या अनेक गावांना आणि शहरांना भेटी देत, सुमारे ९०० मैलांची (१५०० किलोमीटर) यात्रा करून धीरेंद्र अहमदाबाला पोचले. या प्रवासात धीरेंद्र लोकांकडे मागून जेवत असत आणि संध्याकाळी कुठेतरी अंग टाकत असत. या यात्रेत धीरेंद्रांनी श्रीमंतांची घरे पाहिली, गरीबांची घरे पाहिली, कधीकधी आदिवासींच्या घरीही राहिले. या प्रवासामध्ये असे दिसले की, मनुष्य जसजसा उच्च श्रेणीत पोचतो, तसतसा समाज त्याला शिक्षित आणि सभ्य म्हणू लागतो, तसतशी गरीब आणि जनसामान्यांबद्दल त्यांच्या मनात तिरस्काराची भावना वाढू लागते(नरेंद्रभाई,(संपा),१९८१:१५) अशी धीरेंद्रांची या यात्रेतून धारणा झाली.

**ग्रामसेवा योजना:**

धीरेंद्रांनी एक मोठी ग्रामसेवा योजना आखली होती. ती पुढीलप्रमाणे:

१. अनेक गावांच्या केंद्रस्थानी आश्रम स्थापन करून खेडयांतील तरूणांना सूत कताई व कापड विणण्याचे शिकविणे आणि त्यांच्याद्वारे खेडयांमध्ये काम करणे.
२. वस्त्रस्वावलंबनाचे काम प्रमुख मानणे. मात्र सोबतच ग्रामसफाई, प्रौढ शिक्षण, ग्रामसेवक दलाचे संघटन, पंचायतींची स्थापना आणि स्त्रीशिक्षण इत्यादी खेडयांच्या सर्वांगीण सुधारणेचे कार्यक्रमही हाती घेणे.

३. खेडयांतील लोकांना सर्व प्रकारचे शिक्षण आणि मार्गदर्शन देणे. (नरेंद्रभाई,(संपा),१९८१:१६)

या योजनेसाठी धीरेंद्र आणि त्यांच्या सहकार्यांनी रासना गाव निवडले. जेव्हा ही योजना लोकांना धीरेंद्रांनी नीट पटवून दिली. तेव्हा कताई—विणण्याचे काम सुरू झाले. रात्रशाळा आणि स्त्रियांसाठी विद्यालयही सुरू केले. रासना येथे कामाची धीरेंद्र जुळवाजुळव करीतच होते, तेवढयात १९३० चे कायदेभंगाचे आंदोलन सुरू झाले. याकाळात खादीची मागणी इतकी वाढली की, खादी—उत्पत्ती कार्यातच धीरेंद्रांना बुडून जावे लागले. पुढे या कामासाठी बंगालमध्ये धीरेंद्रांना जावे लागले.

१९३०—३२ आणि १९३३—३४ या काळात धीरेंद्रांनी इतके काम केले की, शरीर ते सहन करू शकले नाही. याकाळात धीरेंद्र अत्यंत अशक्त झाले. विश्रांतीसाठी रणीवां हे फैजाबाद जिल्हयाच्या मध्यभागी असलेले अगदी लहानसे गाव निवडले. धीरेंद्रांनी ग्रामसंघटनेचा सर्वांगीण कार्यक्रमच हाती घेतला होता. (पांढरीपांडे सु.श्री.,२००३:१४) अशारितीने रणीवां येथे आश्रमातर्फे ग्रामसेवा केंद्र सुरू झाले.

रणीवांमध्ये धीरेंद्र आणि त्यांच्या सहकार्यांनी ग्रामसेवेचे एक वर्ष पूर्ण केले होते. या एका वर्षात त्यांचा ग्रामसेवेचा कार्यक्रम ६—७ गावांमध्ये पसरला होता आणि त्यापेक्षाही दूरच्या गावकऱ्यांशीही परिचय झाला होता. महात्मा गांधीजींना हे जेव्हा कळले की, धीरेंद्र आणि त्यांचे सहकारी अनेक गावात काम करीत आहेत. तेव्हा त्यांनी धीरेंद्रांना सेवाग्रामला बोलावून घेतले. त्यावेळेस महात्मा गांधींनी धीरेंद्रांना असे सांगितले की, ‘ग्रामसेवेचे काम एका गावापुरतेच मर्यादित ठेवावे, नाहीतर कार्यशक्ती विभागली जाऊन कुठेच यश मिळणार नाही.’ परंतु धीरेंद्रांचा अनुभव मात्र वेगळा होता. त्यांच्या मते, ‘ग्रामीण लोकांमध्ये एका निश्चित गतीनेच परिवर्तन होऊ शकते, कितीही प्रयत्न केला तर तो वेग वाढवता येत नाही. म्हणून एका गावात बसले काय किंवा अनेक गावांशी संपर्क ठेवला काय, काळ तेवढाच लागणार, अनेक गावांशी संपर्क केल्याने वेगवेगळया कार्यक्रमांत वेगवेगळी रूची असलेले लोक सामील होतील.

त्यांच्या आधाराने ग्रामसेवेचे काम पुढे नेता येईल आणि याला वेळ तेवढाच लागेल जेवढा एका गावात काम करायला लागेल. अनेक कार्यक्रमांसाठी वातावरण तयार व्हावे लागते. एखाद्या क्षेत्रात असे वातावरण तयार होऊन लोकांना एकमेकांचा आधार मिळू शकतो.'(पांढरीपांडे सु.श्री.,२००३:१४) धीरेंद्रांच्या विचाराचा परिणाम असा झाला की, 'रणीवां गावात जास्त वेळ घालवला, परंतु सर्वात कमी संपर्क असलेल्या चतुरीपट्‌टी गावात सर्वात जास्त चरखे चालू लागले आणि आश्रमाला लागून असलेल्या केवाडी गावात एकही चरखा चालू होऊ शकला नाही.' हा अनुभव धीरेंद्रांचा होता म्हणून ते आपल्या मतावर ठाम होते. गांधीजींशी त्यांची तीन दिवस या विषयावर चर्चा चालली. परंतु दोघांमध्ये एकमत होवू शकले नाही.

नंतरच्या कालखंडात रणीवांला धीरेंद्र आणि त्याचे दोन सहकारी आले. सहकार्याची संख्या हळूहळू वाढू लागली म्हणून स्वतंत्र आश्रम बांधण्याचे ठरले. जवळच्या जंगलातला एक भाग धीरेंद्रांना पसंत पडला. जंगल साफ करण्याच्या आणि जागा समतल करण्याचे काम पूर्ण करून आश्रम स्थापन केला. आश्रमाचा प्रभाव थोडयाच काळात या भागावर वाढला. (नरेंद्रभाई,(संपा),१९८१:११)

**ग्रामसंघटन योजना :**

१९४० मध्ये धीरेंद्रांनी ग्रामसंघटन योजनेचे पुढचे पाऊल टाकले आणि थोडया शिकलेल्या तरूणांना कागद उद्योगाचे प्रशिक्षण देऊन उद्योग केंद्र सुरू केले. एप्रिल १९४० मध्ये धीरेंद्रांना अटक झाली आणि त्यानंतर १० महिन्यांनी तुरूंगातून सुटका झाल्यावर त्यांनी पाहिले की, ग्रामसंघटन योजनेची २३ केंद्रे उभी राहिली होती. त्या तरूणांचे यश पाहून आसपासच्या लोकांमध्ये आशा आणि विश्वासाचा संचार होऊ लागला होता. या उद्योगांचा एक संघ बनवण्याचा धीरेंद्रांनी प्रयत्न केला आणि त्याला अन्य कामांचीही जोड दिली. पुढे थोडयाच दिवसात १९४२ची चळवळ सुरू झाली. आश्रम जप्त झाला. धीरेंद्रांना अटक झाली. सगळे कार्यकर्ते तुरूंगात गेले. या काळात सरकारने धीरेंद्रांनी उभ्या केलेल्या सगळया रचनात्मक कामाची पाळेमुळे खणून काढण्याचा प्रयत्न केला. १९४५ मध्ये धीरेंद्र तुरूंगातून सुटले आणि त्यांनी पाहिले की,

आश्रम जप्त झाला तरी तरूणांनी स्वावलंबीदृष्टी ठेवल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि आत्मनिर्भरतेची वृत्ती वाढली. (नरेंद्रभाई,(संपा),१९८१:१२)

१५ ऑगस्ट, १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. धीरेंद्रांनी स्वातंत्र्योत्तर काळातील परिस्थितीचा अभ्यास करून आपले असे एक ठाम मत बनविले होते की, 'हे स्वराज्य जनतेचे राज्य न होता एका गटाचे राज्य होऊ लागले आहे आणि तो गट हुकूमशाही प्रस्थापित करू लागला आहे.' याकाळात भांडवलदार व शोषकांचे संघटन मजबूत होऊ लागले होते. त्यामुळे धीरेंद्रांना डिसेंबर, १९४७ मध्ये असे वाटले की, 'लोकांसमोर ही परिस्थिती मांडली पाहिजे.' म्हणून त्यांनी जिल्हाभर तुफानी दौरे करून सुमारे ८० सार्वजनिक सभा घेतल्या. प्रत्येक सभेत तीन ते पाच हजार लोक असत. यात धीरेंद्रांनी 'केवळ इंग्रज जाण्याने स्वराज्य मिळाणार नाही तर एक चतुर्भुज राक्षसाची कल्पना मांडून, त्यामाध्यमातून गरीब जनतेचे स्वकीय सरकार कसे शोषण करेल असे स्पष्ट मत जनतेपुढे मांडले होते. परंतु या दौऱ्यांचा स्थायी परिणाम मात्र झाला नाही.'[१९] पुढे महिनाभरात ३० जानेवारी, १९४८ रोजी महात्मा गांधींजींची हत्या झाली. धीरेंद्रांच्या मते गांधींच्या तत्वा प्रमाणे रचनात्मक कार्याला पुढे नेले पाहिजे.' (नरेंद्रभाई,(संपा),१९८१:१३)

महात्मा गांधींच्या निधनानंतर राजकीय परिस्थितीबरोबरच एकूण देशातील परिस्थितीचा विचार करण्यासाठी देशातील प्रमुख राजकीय आणि रचनात्मक कार्यकर्त्यांची एक परिषद ११ मार्च ते १४ मार्च, १९४८ या काळात सेवाग्राम येथे बोलावण्यात आली होती. डॉ. राजेंद्रप्रसाद या परिषदेचे अध्यक्ष होते. पंडीत नेहरू, अब्दुल कलाम आझाद, आचार्य कृपलानी, विनोबा भावे, शंकरराव देव, काकासाहेब कालेलकर, जयप्रकाश नारायण, देवदास गांधी, किशोरीलाल मश्रुवाला, धीरेंद्र मजुमदार, रंगनाथ दिवाकर, राजकुमारी अमृत कौर आदी महनीय व्यक्ती यावेळी हजर होत्या. या संमेलनात सगळयांचे डोळे विनोबांकडे लागले होते. विनोबांनी या संमेलनात साधनशुचितेवर भर दिला आणि साधन हे साध्याप्रमाणेच शुध्द असावे असे मत मांडले. १४ मार्च, १९४८ रोजी विनोबांनी

परिषदेत ‘सर्वोदयी समाज’ या संघटनेची स्थापना केली. या संघटनेचा उद्देश सत्य आणि अहिंसेवर आधारित समाज निर्मितीचा प्रयत्न करणे हा होता. या समितीत धीरेंद्र मजुमदार यांच्यासह इतर मान्यवरांचा समावेश होता. सर्वोदय समाजाची मौलिक व समयानुकूल कल्पना विनोबांनी मांडली. विनोबांची सूचना धीरेंद्रांनाही पसंत पडली. दुसऱ्या दिवशी चरखा संघाच्या विश्वस्त मंडळाची बैठक झाली. गांधीजींनंतर चरखा संघाच्या अध्यक्षतेचे पद धीरेंद्रांकडे देण्यात आले आणि त्यांनी या अध्यक्षपदाचा सर्वांच्या आग्रहाखातर स्वीकार केला. (चोपडे किसन,२०१०:४८)

१८ एप्रिल, १९५१ ला विनोबांना पहिले भूदान मिळाले. त्यानंतर काही दिवसांनी नेहरूंना भेटण्यासाठी ते दिल्लीकडे निघाले आणि भूदानयात्रा सुरू झाली. धीरेंद्रांना त्यात क्रांतीचे दर्शन झाले आणि त्यांना वाटले की, या क्रांतीमध्ये भाग घेण्यासाठी आलेल्या तरूणांसाठी एखादे प्रशिक्षण केंद्र असावे. धीरेंद्रांनी त्याची जबाबदारी स्वीकारली. २६ फेब्रुवारी, १९५२ साली बिहारमध्ये जमुईजवळची जंगलाने घेरलेल्या ओसाड जमिनीवर ‘समग्र ग्रामसेवा विद्यालय’ या नावाने प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली. या केंद्रामध्ये धीरेंद्राचा एका बाजूला श्रमाचा अभ्यास सुरू होता. तर दुसरीकडे सहकाऱ्यांसोबत वर्ग—परिर्वनाबद्दल चर्चा होत असे. वर्गपरिर्वतन केवळ श्रम—साधनेद्वारा होऊ शकत नाही, तर स्वावलंबनाच्या पायावरच होऊ शकते (चोपडे किसन,२०१०:५१) हे कसे साधणार याची चिंता धीरेंद्रांना सतत होती.

याच सुमारास विनोबांची पदयात्रा मुंगेर जिल्हयात आली. खादीग्रामला ते चार दिवस थांबले होते. प्रादेशिक भूदान समितीच्या कार्यकर्त्यांचे संमेलन तेथे झाले. विनोबांनी धीरेंद्रांच्या सहकाऱ्यांशीही विचारविनिमय केला आणि त्यांनी सांगितले की, ‘अभ्यास मुख्य वस्तू नाही, विचार मुख्य वस्तू आहे. विचार पक्का असेल तर तो कोणत्या—ना—कोणत्या प्रकारे अभ्यासाद्वारे शक्तिशाली बनतोच.’ सर्वांना या चर्चेने खूप प्रेरणा मिळाली. (चोपडे किसन,२०१०:५१) विनोबा गेल्यानंतर खादीग्राम परिवारासाठी धीरेंद्रांनी दोन गोष्टी सुचवल्या. एक म्हणजे सर्वांची मजुरी समान असावी. दुसरी गोष्ट म्हणजे शरीरश्रम व बौध्दिक

श्रमाचे मूल्य समान असावे. (चोळकर पराग,(संपा), अग्रवाल गंगाप्रसाद, २०००:१४)

याच सुमारास जवळच्या पेंगही गावात जमीनदारांनी दलितांना जमिनीवरून बेदखल करण्याचे प्रकरण घडले होते. बेदखलीच्या घटना अनेक ठिकाणी घडत होत्या. या काळात धीरेंद्रानीही या संदर्भात बिहारमध्ये अनेक ठिकाणी जाऊन आंदोलने केली होती. त्याचा परिणाम चांगला झाला. बिहारमध्ये अनेक ठिकाणी भूदान कार्यक्रत्यांनी बेदखलीविरूध्द आंदोलन केले.

धीरेंद्रांनी सन १९६० मध्ये वयाची ६० वर्षे पूर्ण केली होती. यावेळेस संस्थागत जबाबदाऱ्यांमधून मुक्त होऊन, संस्थांच्या मर्यादित चौकटी ओलांडून सर्वजनाधाराचा प्रयोग करण्याचा धीरेंद्रांनी निर्णय घेतला. ६ एप्रिल, १९६० रोजी बलिया जि. पूर्णिया, बिहार गावात धीरेंद्रांनी प्रवेश केला.

पुढे सन १९६१ ला उत्तरप्रदेशमधील बरनपूर येथे धीरेंद्रांनी ग्रामभारती केंद्र सुरू केले. बरनपुर अत्यंत मागासलेले क्षेत्र होते. १० मार्च ते ५ एप्रिल, १९६२ या काळात काटाई—यात्रा करण्यात आली. यातून जनाधाराचा मार्ग मोकळा झाला. जून १९६२ पासून पाच नव्या सहकाऱ्यांनी स्वावलंबनाच्या साधनेचा श्रीगणेशा केला. लोकांनी दान दिलेल्या जमिनीवर धीरेंद्र त्यांच्या सहकार्याने शेती करू लागले. शेतीचा कोणताही अनुभव नसताना उभे पीक पाहून मात्र लोकांचे मत बदलले. आधी धीरेंद्र आणि त्यांच्या सहकार्यांना हसणारे शेतकरी येऊन चर्चा करू लागले.(चोळकर पराग,(संपा. ),२०००:१५)धीरेंद्रांचा हा स्वावलंबनाचा प्रयत्न अशा रीतीने व्यापक लोकशिक्षणाचे माध्यम बनला. लोकांशी परिचय आणि संपर्क हळूहळू वाढू लागला. दोन वर्षात लोकांना सर्वोदय—विचाराचा चांगला परिचय झाला.

बरनपूर जिल्हा सर्वोदय मंडळातर्फे एक शिबीर घेण्यात आले आणि त्यामध्ये अनेक चर्चा व विचारविनिमय झाले. त्यातून भूमिसेना—दल स्थापन करण्याचे ठरले.

फेब्रुवारी १९६७ मध्ये बिहारमध्ये दरभंगा जिल्हयाचे जिल्हादान झाले आणि एक नवी संभावना धीरेंद्रांच्या माध्यमातून प्रकट झाली. विनोबांजींनी आदेश दिला की, धीरेंद्रांनी पूर्ण वेळ दरभंगामध्ये काम करावे. त्यानुसार धीरेंद्रांनी मधुबनी केंद्रात कार्यकर्ता—स्वावलंबन व कृषिग्रामोद्योगाच्या प्रयोगांद्वारा कार्यकर्ता—प्रशिक्षण व लोकशिक्षणाचे काम सुरू केले. विनोबाजींची ग्रामदान—तुफान यात्रा पुढे बरनपुरमध्येही सुरू केली. (चोळकर पराग,(संपा.), २०००:१७) शेवटी सप्टेंबर १९६८ मध्ये बरनपुरचे काम गांधी निधीवर सोपवून धीरेंद्र मुक्त झाले.

बिहारमधील सहरसा जिल्हयाची ग्रामदान—पुष्टीच्या सघन कार्यासाठी निवड झाली. अनेक कार्यकर्ते तेथे गेले. त्यांच्या आग्रहाने धीरेंद्रांनी विनोबा आश्रम, सहरसा येथे राहण्याचे मान्य केले. तेथे राहून कार्यकर्त्यांना चर्चा—संवादाद्वारे ते उद्‌बोधित करीत राहिले. मात्र फार काळ एका जागी बसणे धीरेंद्रांच्या स्वभावातच नव्हते. म्हणून त्यांनी बैलगाडीद्वारे सतत यात्रा सुरू केली. ३ डिसेंबर, १९७१ रोजी सुरू झालेल्या या यात्रेला त्यांनी ‘लोकगंगा यात्रा’ असे नाव दिले. १९७१ ते १९७८ पर्यंत ही यात्रा सुरू राहिली. १९७४ मध्ये बिहार आंदोलन सुरू झाले. जिल्हाभर, खेडयांमध्येही कलम १४४ लागू झाले होते. सभा—बैठकी करणे आवश्यक झाले. धीरेंद्र सहरसा सोडून आझमगढला आले. आझमगढ जिल्हयात एका ठिकाणी बसून त्या जागेला ‘लोकगंगाधाम’ असे नाव दिले. धीरेंद्रांचे या यात्रेतून समाजातला शेवटचा वर्ग सर्वहारा मजूर कसा उठून उभा राहील आणि सर्वोदय क्रांतीत कसा सहभागी होईल याचे चिंतन सुरू होते. मजूर वस्त्यांत धीरेंद्र आवर्जून जात असत व मजूरांशी संवाद करत. त्यांच्याशी जवळीक साधण्यासाठी त्यांनी मजुरांच्या झोपडयांमध्येच राहण्यास सुरू केली. अंतिम मनुष्याशी एकाकार होण्याची साधना धीरेंद्रांनी या यात्रेतून साधली होती. (चोळकर पराग,(संपा.), २०००:१७) ही धीरेंद्रांच्या आयुष्यातील मोठी साधना मानावी लागेल.

जून १९७५ मध्ये देशात आणीबाणीची घोषणा झाली. लोक इतके आकंतिक झाले की, धीरेंद्रांच्या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी गावात जाणाऱ्यांशी

बोलायलाही घाबरू लागले. धीरेंद्रांनी अशा स्थितीत यात्रा स्थगित करणेच ठीक मानले. (नरेंद्रभाई,(संपा.), १९८१:२१) नोव्हेंबर १९७६ पासून यात्रा पुन्हा सुरू केली. जाहीर सभा होऊ शकत नव्हत्या. चर्चा—बैठकी होत होत्या. आतंक हळूहळू कमी होत होता. याकाळात धीरेंद्रांची प्रकृती बरी रहात नसल्याने यात्रेत खंड पडत होता. पण यात्रा चालू होती. शेवटी सतत प्रकृती बिघडत राहिल्याने, याला ईश्वराचा संकेत मानून मार्च, १९७८ मध्ये लोकगंगा यात्रा बंद केली. मार्च १९७८ नंतर प्रकृती अधिकाधिक बिघडतच गेली. शेवटी २१ नोव्हेंबर, १९७८ मध्ये संध्याकाळी धीरेंद्र मजुमदार यांनी आपला देहत्याग केला. आपल्या मौलिक चिंतनातून आणि मार्गशोधाच्या अनुभावातून पुढील पिढयांना मागदर्शन करणारी अमोल शिदोरी ठेवून धीरेंद्र कालवश झाले. (नरेंद्रभाई,(संपा.), १९८१:२१)

गांधीजींनी ग्रामस्वराज्याची जी कल्पना जगापुढे ठेवली होती, तिच्या स्वरूपाचे दर्शन विनोबांनी करविले. तिला परिपूर्ण परिभाषा प्रदान करण्याचे काम धीरेंद्रांनी केले. भूदान—ग्रामदान आंदोलनाच्या कार्यपध्दतीसंबंधी अनेकदा गांधी, विनोबा आणि धीरेंद्र यांच्यात मतभेद झाले. धीरेंद्र आपले मत सतत मांडत असत परंतु शेवटी गांधी—विनोबांच्या निर्देशानुसार काम करीत असत. असे असले तरी धीरेंद्राचा मार्गशोध स्वतंत्रपणे सतत चालू राहिला. मार्गशोधाच्या अनुभवाच्या आधारावर धीरेंद्र एवढेच म्हणत होते की, दंडनिरपेक्ष, शासनमुक्त समाजरचनेचा विचार जगात आम्हा लोकांमार्फतच प्रकट झाला. केवळ प्रकटच झाला नाही, तर ग्रामदानाच्या रूपाने त्यातील संभावनांचे दर्शनही झाले.

**धीरेंद्र मजुमदार यांच्यावरील प्रभाव :**

धीरेंद्रांच्यावर कार्ल मार्क्स, रिकार्डो, म.गांधी, विनोबा भावे यांचा प्रभाव पडला होता त्यामधून त्यांचे व्यक्तीमत्व घडत होते. त्यांच्यावर पडलेल्या प्रभावाची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे घेता येते.

**१) ब्राम्हो समाजाचा प्रभाव :**

धीरेंद्र मजुमदार यांचे आजोबा दिनानाथ मजुमदार बंगालमध्ये रहात होते. त्यावेळेस ब्राम्हो समाजाची चळवळ ऐन भरात होते. त्यावेळी दिनानाथ मजुमदार हे, या ब्राम्हो समाजाच्या चळवळीत सामील झाले आणि ब्राम्हो समाजाच्या विचाराचा प्रभाव त्यांच्यावर पडला. यामध्ये ब्राम्हो समाजाची निराकाराची उपासना, प्रपंचास परमार्थरूप मानून चालणे, सामुदायिक ध्यानसाधना, प्रेम आणि लोकसेवा, बंधुत्व ही तत्वे होती. या समाजाच्या प्रभावातून धीरेंद्र मजुमदार यांनी आपले जीवन व्यतीत केले आणि त्याचा प्रभाव धीरेंद्र मजुमदार यांच्यावर पडला होता.

**२) आचार्य कृपलानी यांचा प्रभाव :**

धीरेंद्र मजुमदार जेव्हा कॉलेज सोडून स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्यासाठी कॉलेजमधून बाहेर पडले, तेव्हा ते आचार्य जे. बी. कृपलानी यांच्या गांधी आश्रमात दाखल झाले. खऱ्या अर्थाने धीरेंद्र मजुमदार गांधीवादी कार्यकर्ते म्हणून घडण्यासाठी आणि त्याप्रमाणे जीवन व्यतीत करण्यासाठी जे. बी. कृपलानी आणि बनारस गांधी आश्रमाचा फार मोठा प्रभाव होता.

ग्रामसेवेचे स्वरूप काय असावे हे समजून घेण्याकरिता धीरेंद्रांनी आपले जीवन जितके खेडयातील माणसासारखे करता येईल तेवढे केले आणि पुढे ग्रामसेवा व ग्रामसंघटनेचा विचार यातुनच पुढे आला. अशारितीने जे. बी. कृपलानींच्या आश्रमामध्ये धीरेंद्र मजुमदार यांच्यावर प्रभाव पडत गेला.

**३) महात्मा गांधी यांचा प्रभावः**

धीरेंद्र मजुमदार यांनी बनारस हिंदु विश्वविद्यालयात मेकॅनिकल इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता. तेव्हा गांधीप्रणित अहिंसात्मक असहकार चळवळीच्या कार्यक्रमाने भारतातील राजकारणात अन्यायाविरूध्द सामुदायिक प्रतिकाराच्या चळवळीला प्रारंभ केला होता. या असहकार चळवळीमध्ये सरकारी पदव्या वा मानमरातब, शासकीय समारंभ, शिक्षणसंस्था, न्यायालये, कायदेकौन्सिले आणि परेदशी वस्तू इत्यादी कार्यक्रम मर्यादित

ठेवण्यात आले होते. धीरेंद्र मजुमदार या काळात शिक्षण घेत होते. या असहकार चळवळीचा त्यांच्यावर प्रभाव पडला आणि त्यांनी आपले शिक्षण सोडून पुढील संपूर्ण आयुष्य गांधी कार्यात वाहून घेतले. या असहकार चळवळीच्या सत्याग्रहाच्या लढयात बहिष्कारापासून ते करबंदीपर्यंत अनेक कार्यक्रमांचा तत्वत: अंतर्भाव करण्यात आलेला होता. याचा प्रभाव धीरेंद्रावर पडला होता.

त्यातूनच धीरेंद्र गांधी—विनोबांच्या ग्रामस्वराज्याचे कृतीशील कार्यकर्ते म्हणून पुढे आयुष्यभर काम करीत राहिले. अशारीतीने गांधींच्या विचाराचा प्रभाव धीरेंद्र मजुमदार यांच्यावर पडला.

**४) आचार्य विनोबा भावे यांचा प्रभाव:**

महात्मा गांधीजींनी ग्रामस्वराज्याची जी कल्पना जगापुढे ठेवली होती, तिच्या स्वरूपाचे दर्शन विनोबांनी घडविले. भूदान, ग्रामदान, ग्रामस्वराज्य इत्यादी संकल्पनांच्या समुच्चयालाच विनोबांनी साम्ययोग असे नाव दिले होते. गांधींजींचा वैचारिक वारसा खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तरकाळात भूदानमूलक अहिंसक क्रांतीची चळवळ हाच होय. या भूदान, ग्रामदान, ग्रामराज्य इ. आंदोलनातील अहिंसक मूलगामी क्रांतिकारी संकेतांचे आणि आशयाचे अतिशय सूक्ष्म, मार्मिक आणि ऐतिहासिक भाव व प्रभाव धीरेंद्र मजुमदार यांच्यावर होता. त्यांनी आपले आयुष्य शासनमुक्त आणि शोषणरहित समाजाची स्थापना करण्यामध्ये व्यतीत केले. याबाबतीत विनोबांचा प्रभाव धीरेंद्र मजुमदार यांच्यावर असलेला दिसून येतो.

**धीरेंद्र मजुमदार यांचे लेखन :**

धीरेंदानी आपले अनुभव पत्राव्दारे व्यक्त केले आहेत. ही लिखित पत्रांची श्रृंखला सेन्ट्रल जेल आगरा येथून १ जून, १९४१ साली सुरू होऊन ती अंतिम वेळेपर्यंत चालू राहिली. धीरेंद्रांचे विशेषत: हेच लेखन साहित्य आहे. या पत्रांमध्ये खेडूतांच्या सेवेच्या वेळेस गावांचा केलेला अभ्यास आणि त्यांना आलेल्या अनुभवाचे विस्तृत विवेचन केले होते. या पत्राचेच पुढे सर्व सेवा

संघाने 'समग्र ग्राम सेवा की ओर' भाग १,२ व ३ या ग्रंथामध्ये प्रकाशित झाली. तसेच 'ग्रामस्वराज्य क्यो और कैसे', 'यह स्वराज्य कैसा?', 'शासन निरपेक्ष समाज', 'शासन मुक्त समाज की ओर', 'जमाने की माँग', 'क्रान्ति की बुनयाद', 'शिक्षा में क्रांती' आणि 'क्रांती यात्रा' इत्यादी छोटया मोठया ग्रंथांचे लेखन धीरेंद्रांनी केले आहे.

**धीरेंद्र मजुमदार यांनी केलेले कार्य :**

धीरेंद्र मजुमदार हे अतिशय प्रतिभाशाली विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्याबरोबर ते प्रतिभाशाली रचनाकारही होते आणि तितकेच ते मूलगामी क्रांतीकारकही होते. तेव्हा विचारवंत, रचनाकार, क्रांतीकारक या तीनही नात्यांनी त्यांनी रचनात्मक कार्य केले. ग्रामराज्याची निर्मिती हेच धीरेंद्रांचे क्रांतीचे उद्दिष्ट होते. तसेच धीरेंद्र मजुमदार यांनी महात्मा गांधींजींच्या विचाराचा आणि आचार्य विनोबा भावे यांच्या विचाराचा अनेक बाबतीत विकास केला आहे.

**१) सेवापुरीची स्थापना :**

महात्मा गांधींनी समग्र ग्रामसेवेसाठी युवकांना आवाहन केल्यावर या दिशेने पुढच्या प्रयोगांसाठी धीरेंद्र मजुमदार यांनी उत्तरप्रदेशात वाराणसीजवळ सेवापुरीची स्थापना केली. उत्पादक रचनेचे सर्व प्रकारचे कार्यक्रम तिथे जिवंतपणाने उभे केले. श्रमाधारे स्वावलंबी कसे होता येईल हे ठरविण्याचे जणू एक तीर्थक्षेत्रच त्यांनी उभे केले होते. (चोळकर पराग,(संपा.), २०००:११—१२) सेवापुरीची स्थापना हा धीरेंद्राच्या रचनात्मक कार्याचा महत्वाचा भाग आहे.

**२. चरखा संघाच्या नवसंस्करणाचे प्रयत्न :**

स्वातंत्र्योत्तर काळात खादीने आपल्या कामाची दिशा केवळ रोजगारी एवढीच न ठेवता ती श्रमनिष्ठ स्वावलंबनाकडे वळवावी म्हणून धीरेंद्र मजुमदार यांनी जोराचे प्रयत्न केले, पण त्याच वेळी भूदानयज्ञाचे वादळ आले. ते या संस्कारांशी मिळते—जुळतेच होते. नवसंस्कारणाची ही तयारी भूदानयज्ञाच्या कार्यक्रमाला उपयोगी पडली. १९४८ साली धीरेंद्र चरखा संघाचे अध्यक्ष बनले.

(चोळकर पराग,(संपा.),२०००:२३) चरखा संघाला धीरेंद्रांनी श्रमशाळा आणि स्वावलंबनांची जोड दिली.

### ३) सर्व सेवा संघाची निर्मिती :

गांधींजींच्या विचाराशी एकरूप झालेल्या रचनात्मक संस्थांनी एकत्र येऊन काम करावे यासाठी गांधींजी कार्यकर्त्यांना तयार करीत होते, पण ती प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच त्यांची हत्या झाली. यानंतरच्या एकत्रिकरणाच्या कामात धीरेंद्रांचा फार मोठा सहभाग होता. एकत्रिकरणानंतर त्या संस्थांचा सर्व सेवा संघ झाला. १९५४ साली सर्व सेवा संघांचे अध्यक्ष बनण्याचा मानही त्यांना प्राप्त झाला. सेवापुरी व दुसऱ्या एका सर्वोदय संमेलनाचे अध्यक्षही ते होते. (नरेंद्रभाई,(संपा.),१९८१:९४—९८) धीरेंद्रांनी सर्वसेवा संघाच्या अध्यक्ष पदाच्या माध्यमातून भारतभर शासन निरपेक्ष स्वावलंबी आणि श्रमनिष्ठ शिक्षण व्यवस्था असणारी ग्रामस्वराज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता.

### ४) श्रमभारती, खादीग्रामची स्थापना :

भूदान आंदोलन आणि अहिंसक समाज रचनेसाठी समर्पित कार्यकर्ते तयार व्हावेत म्हणून २६ फेंब्रुवारी, १९५२ मध्ये धीरेंद्रांनी बिहारमध्ये जमुई येथे श्रमभारती (खादीग्राम) ची स्थापना केली. खादीग्राम केंद्र सुरू झाले. खादीग्रामचे केंद्र कृषिमूलक केले आणि पाण्याची व्यवस्था केली. या केंद्राचे नाव धीरेंद्रानी ‘समग्र ग्रामसेवा विद्यालय’ असे ठेवले. या विद्यालयात एका बाजूला श्रमाचा अभ्यास सुरू होता. दुसरीकडे सहकाऱ्यांसोबत वर्ग—परिवर्तनाबद्दल चर्चा होत असे. वर्गपरिवर्तन केवळ श्रम—साधनेद्वारा होऊ शकत नाही. स्वावलंबनाच्या पायावरच होऊ शकते. या दृष्टीने धीरेंद्र आणि त्यांचे सहकारी प्रयत्न—प्रयोग करू लागले. यातून समाज परिवर्तनाचे साधन निर्माण झाले.(नरेंद्रभाई,(संपा.), १९८१:१०२) खादीग्राम कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण केंद्र बनले आणि त्यातून धीरेंद्रांनी एक नवी दिशा ग्रामस्वराज्याला दिली.

### ५) ग्रामभारतीची स्थापना :

वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यावर धीरेंद्रांनी सर्व संस्थांतून मुक्त होण्याचा

निर्णय घेतला. 'लोकगंगा प्रवेश' ही अभिनव कल्पना त्यांनी मांडली. बिहारच्या पूर्णिया जिल्हयातील एका गावात लोकजीवनात सामान्य नागरिकाची भूमिका स्वीकारून जीवनसाधनेचा नवीन अध्याय सुरू केला. ग्रामस्वराज्याच्या संदर्भात श्रमाधारित स्वावलंबी जीवनाचे प्रयोग करता करता खेडेगावात सेवा, शिक्षण व संघटन यांच्याद्वारा ग्रामस्वराज्याचा पाया रचण्याचे प्रयत्न व्हावेत, म्हणून सन १९६० च्या एप्रिलमध्ये ग्रामदानी गाव बरनपूर, अलाहाबाद, उत्तरप्रदेश येथे ग्रामभारती या संस्थेची स्थापना केली. (नरेंद्रभाई,(संपा.), १९८१:१६४)

**समारोप :**

धीरेंद्र मजुमदार यांच्या व्यक्तिमत्वात क्रांतिद्रष्टा, आचार्य आणि समाज वैज्ञानिक अशा त्रिविध विशेषणांचे एक सामंजस्यपूर्ण समायोजन झाले होते. या कारणांमुळे त्यांचे व्यक्तित्व अराज्यवादी प्रिंन्स क्रोपोटकिन, मानवतावादी महात्मा गांधी व शेतकरी जनवादी माओत्से तुंग या तिन्ही इतिहासकारांच्या विशेषतांचे एक प्रासंगिक स्वरूप जागवणारे होते. धीरेंद्र मजुमदार आजच्या अशिक्षित लोकांच्या समुदायाला शासन, शोषण आणि वर्ग—विषमतेच्या निराकरणाद्वारे मुक्त समाजाच्या परिवर्तित करण्याच्या मानवीय साध्याला सुगम बनविण्यासाठी संकल्पित, समर्पित होते. लोकनिष्ठा, लोकचेतना आणि लोकशक्ती हे धीरेंद्र मजुमदार यांचे त्रिविध क्रांतिसूत्र होते. ज्याचे त्यांनी आजीवन पालन केले. समग्र ग्रामसेवेचे प्रयोगी स्थळ रणीवां, श्रम—भारती, खादीग्राम, ग्रामभारती बरनपुर, सर्वजनाधार बलिया आणि लोकगंगा यात्रा ही धीरेंद्र मजुमदार यांच्या रचनात्मक कार्याची पाच क्षेत्र राहिली. ही त्यांची प्रयोगशील कार्याची नवोपक्रमाची जाज्वल उदाहरणे आहेत.

खऱ्या अर्थाने या देशाची ग्रामीण पुनर्रचना आपल्याला कशी करता येईल हाच ध्यास आयुष्यभर धीरेंद्रांनी बाळगला. धीरेंद्रांनी आपले जीवन हे गांधी—विनोबांच्या विचाराला समर्पित केले होते.

***********

# प्रकरण तिसरे

# धीरेंद्र मजुमदार यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार

**प्रस्तावना :**

स्वराज्य हे महात्मा गांधींना अभिप्रेत असलेल्या अहिंसक क्रांतिकारी समाजव्यवस्थेचे नाव होते, ज्यामध्ये स्वावलंबन आणि अहिंसक समाजाची निर्मीती या दोन गोष्टींनी धीरेंद्र मजुमदार यांनी भूदान व ग्रामस्वराज्य या क्षेत्रामध्ये महत्त्वाचे काम केले. शांततामय मार्गाने मूलगामी समाज परिवर्तन कशाप्रकारे घडवून आणता येईल आणि हे समाज परिवर्तन घडवून आणताना लोकांच्या उपक्रमशीलतेला कसा वाव देता येईल आणि स्वावलंबी आणि श्रमावर आधारित शिक्षण पध्दती कशी निर्माण करता येईल याचे अतिशय सम्यक विवेचन धीरेंद्र मजुमदार यांनी केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात धीरेंद्र मजुमदार यांनी मांडलेल्या सामाजिक तसेच शैक्षणिक विचारांचा अभ्यास करण्यात आला आहे. धीरेंदाचे सामाजिक विचार अभ्यासण्यापूर्वी म.गांधी व विनोबा भावे यांचे यासंबंधीचे विचार थोडक्यात पहाणे आवश्यक आहे.

**महात्मा गांधींजींचे सामाजिक विचार :**

आधुनिक पाश्चात्त्य जीवनदृष्टी हिंसेवर आधारलेली आहे असे गांधी म्हणत. या विचारसरणीची प्रेरक तत्त्वे म्हणून ज्यांचा उल्लेख करावा लागेल अशी संग्रहवृत्ती, आक्रमकता, स्पर्धा, स्वामित्व गाजविण्याची मनोवृत्ती, दुसऱ्यावर प्रभुत्व मिळविण्याची आकांक्षा, निसर्गावर विजय प्राप्त करण्याचा हव्यास व त्यालाच प्रगतीचे गमक मानण्याची वृत्ती, ताबा, कब्जा, नियंत्रण यांच्या कक्षेत विकासाची व्याख्या करण्याची प्रथा, पुरूषप्रधानता आणि विचारातील द्वंद्वात्मकता हे सगळे गुणधर्म महात्मा गांधीजींना 'हिंसा' या एकाच संकल्पनेतून व्यक्त करावयाचे होते. आसक्ती, लोभ, हव्यास यांच्या पायावर उभी असलेली ही आधुनिक पाश्चात्य सभ्यता एक 'रोग' आहे, 'अधर्म' आहे असे गांधींचे मत

होते. (पांढरीपांडे सु.श्री.,१९९५:१२६—१२७) गांधींच्या सामाजिक समीक्षेचा आधार 'हिंसा' ही संकल्पना होती.

महात्मा गांधींच्या मते, सत्ता हा हिंसेचाचा एक आविष्कार आहे. आधुनिक हिंसाधिष्ठित समाजरचनेला एका अगदी भिन्न अशा अहिंसाधिष्ठित जीवनदृष्टीचा आणि जीवनशैलीचा पर्याय देण्याचा आहे. 'हिंदस्वराज्य' गांधीजींचे हे पुस्तक म्हणजे मानवतेसमोरील या आव्हानाला महात्मा गांधींजींनी दिलेला प्रतिसाद होय. व्यवहार आणि सिध्दांत, दृष्टी आणि शैली, मूल्ये आणि संदर्भ, विचार आणि आचार या सगळयाच स्तरांवर एक सर्वस्वी नवी, क्रांतिकारी अशी समाजरचना निर्माण करणे हे महात्मा गांधींजींचे मुख्य लक्ष होते. इतर सर्वबाबी त्याला अनुलक्षून आणि आनुषंगिक होत्या. म्हणूनच त्यांच्या दृष्टीने अहिंसक समाजरचनेची निर्मिती आणि जडणघडण हे त्यांच्यासमोरचे मुख्य आव्हान होते. त्या आव्हानाला गांधींजींचा कृतीशील भाष्यकार म्हणून धीरेंद्र मजुमदार यांनी आपल्या कृतीमधून स्पष्ट केले.

**आचार्य विनोबा भावे यांचा सामाजिक विचार :**

'हिंदस्वराज्य'मधील या वैचारिक प्राणबीजाचा विकास आणि विस्तार आपल्याला स्वातंत्र्योत्तर काळात विनोबाजींच्या 'भूदानमूलक अहिंसक क्रांती'च्या महान अभियानातून झालेला दिसतो. भूदान, ग्रामदान, ग्रामस्वराज्य इत्यादी संकल्पनांच्या समुच्चयालाच विनोबांनी 'साम्ययोग' असे नाव दिले. अहिंसक समाजाच्या निर्मितीचे ते साधन, साध्य, आकार आणि आशयही आहे.

हिंसाशक्तीच्या विरोधी आणि समाजसंमत अशा दंडशक्तीहून वेगळी अशी जी अहिंसक लोकशक्ती विनोबांनी संकल्पिली आहे, तिलाच त्यांनी 'तिसरी शक्ती' असेही म्हटले. ज्यांनी गांधीविचाराचा समाजपरिवर्तनाचा एक सिध्दांत या नात्याने आणि एक नवे सभ्यतादर्शन या नात्याने निष्ठापूर्वक स्वीकार केला अशा कार्यकर्त्यांच्या दृष्टीने या अहिंसक लोकशक्तीची निर्मिती हा 'स्वधर्म' आहे असेही विनोबांनी आवर्जून सांगितले आहे. (चोळकर पराग,(संपा.), पांढरीपांडे सु.श्री.,२०००:३५—३६)

अहिंसक साधनांनी रचनागत हिंसेच्या निराकरणाच्या प्रक्रियेतच नव्या अहिंसक समाजाच्या उदयाची बीजे दडलेली आहेत. या दृष्टीने विचार केल्यास विनोबांचे भूदान आंदोलन आणि त्याला आनुषंगिक असलेली, पूरक आणि पोषक ठरणारी आणि सुदृढ करणारी संपत्तीदान, ग्रामदान, ग्रामस्वराज्य इ. आंदोलने म्हणजे या अहिंसक समाजनिर्मितीच्या दिशेने टाकलेले स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वांत प्रभावी असे पाऊल होते असेच म्हणवे लागेल.

**धीरेंद्र मजुमदार यांचे सामाजिक विचार :**

महात्मा गांधींजींचा 'अहिंसाधिष्ठित समाजरचनेचा' वैचारिक वारसा खऱ्या अर्थाने जर स्वातंत्र्योत्तरकालीन कोणत्या चळवळीत साकार झाला असेल तर ती चळवळ म्हणजे भूदानाची अहिंसक क्रांतीची चळवळ होय. त्यानंतर गांधी—विनोबा यांना अपेक्षित असणारी प्रत्यक्ष कृतीतून अहिंसक समाज रचनेची चौकट धीरेंद्र मजुमदार यांनी उभी केली. म्हणूनच ते गांधी—विनोबा विचारांचे कृ तीशील भाष्यकार होते. या कृतीतून धीरेंद्र मजुमदार यांनी आपले सामाजिक विचार मांडले.

**हिंसारहित समाज व्यवस्था :**

गांधी—विचाराची मूलगामिता आणि क्रांतिकारिता धीरेंदांनी अतिशय मार्मिक पध्दतीने स्पष्ट केली आहे. धीरेंद्र मजुमदार यांच्या मते, ''अहिंसक समाज म्हणजे हिंसारहित समाज, म्हणून आपण समाजातून मूलतः हिंसा कशी नष्ट होईल याचा विचार केला पाहिजे. पण हिंसा नावाची स्वतंत्र अशी वस्तू नाही, शोषणवृत्तीचा तो परिणाम आहे. एका व्यक्तीची दुसऱ्या व्यक्तीचे शोषण करण्याची इच्छा आहे आणि तिला जर कोणत्याही अडचणीशिवाय शोषण करणे शक्य झाले तर ती उगाचच हिंसा करणार नाही. एका देशाला दुसऱ्या देशाचे शोषण करावयाचे आहे आणि त्यात जर कसलीच बाधा आली नाही तर विनाकरण तो देश युध्द छेडणार नाही. ज्यावेळी शोषित शोषणाचा विरोध करील तेव्हाच हिंसा होईल. अशारितीने शोषणाच्या वृत्तीतूनच हिंसेची सुरूवात होते असे धीरेंद्र मजुमदार यांचे मत आहे (मजुमदार धीरेंद्र,१९५४:५—१२). शोषण हीच हिंसा आहे व म्हणून अहिंसक समाजाच्या निर्मितीचा लढा हा

पर्यायाने शोषणाच्या निराकरणाचाच संघर्ष होय ही गोष्ट धीरेंद्र मजुमदार यांनी स्पष्ट केली आहे.

**शासनमुक्त समाज :**

रचनागत शोषण हे सूक्ष्म शोषणाचे केवळ एक रूप आहे आणि या सूक्ष्म शोषणाची इतरही रूपे असू शकतात व असतात याचेही अतिशय तरल असे भान त्यांना होते. म्हणूनच आदर्श समाज हा केवळ शोषणहीन असून पुरेसे नाही, तो शासनमुक्त किंवा शासननिरपेक्ष असणेही तितकेच अनिवार्य आहे असे ते मानीत. शासनमुक्ती हे सुध्दा अहिंसक समाजरचनेच्या निर्मितीच्या पुरूषार्थाचेच एक अंग आहे. धीरेंदांच्या मते अहिंसक समाजाच्या स्थापनेसाठी सर्वप्रथम या गोष्टीची आवश्यकता आहे की जगात दंडमुक्त, म्हणजेच अहिंसक, समाज या नात्याने शोषणहीन व शासनमुक्त समाजरचना प्रस्थापित व्हायला हवी.''(मजुमदार धीरेंद्र, १९५४:३२—३९) तेव्हा शोषण आणि शासन यांच्यापासून मुक्ती हे अहिंसक समाजरचनेचे व्यवच्छेदक लक्षण मानले पाहिजे.

**क्रांतीची नवी परीभाषा :**

खरे म्हणजे मूल्यपरिवर्तन हे क्रांतिचे प्राणतत्व आहे. त्यामुळे केवळ परिस्थिती पालटली आणि मूल्यव्यवस्था तीच राहिली तर नवी रचना म्हणजे तथाकथित क्रांतिचे निष्प्राण कलेवर ठरेल धीरेंद्र म्हणतात, ''क्रांतीचा अर्थ मान्यता—परिवर्तन, मूल्यपरिवर्तन हा आहे. मान्यता अथवा मूल्यपरिवर्तन म्हणजे काय हे समजणे आवश्यक आहे. राजकीय क्षेत्रापुरतेच बोलायचे झाल्यास, साम्यवाद असो, फॅसिझम असो, संसदीय लोकतंत्र असो अथवा सैनिक एकाधिकारशाही असो, सर्वांची ही धारणा आहे की सैनिक—शक्तीच्या सहाय्याने सरकार समाजाचे नियंत्रण करील. एक सरकार असेल, त्याच्याजवळ सैन्यशक्ती असेल आणि ते सरकार दंडशक्तीच्या सहय्याने समाज नियंत्रित करील. हे सगळे बदलून जर समाजाने आपल्या स्वत:च्या सहकार्यशक्तीच्या सहाय्याने सर्व व्यवस्थेचे नियंत्रण केले तर त्याला राजकीय क्रांती असे म्हणता येईल.

सर्व सामाजिक मान्यता आज जातिमूलक आहेत. मग आमच्या देशातील ब्राहमण—क्षत्रियवादी जातिव्यवस्था असो किंवा अमेरिकेसारखी काळया—गोऱ्यांची असो, या सर्वांमध्ये जातीय मूल्ये प्रधान असतात. वस्तुत: मानवी संबंधाचा आधार मानवीय मूल्ये असावयास हवा. धर्माचा अर्थ तरी काय आहे? हा इस्लाम धर्म, हा ख्रिश्चन धर्म, हा हिंदू धर्म असे मानण्याऐवजी अध्यात्म हाच धर्म असे मानले गेले तरच क्रांती होईल. मानवाच्या समग्र जीवनात ज्यावेळी मूल्यपरिवर्तनाला प्रारंभ होईल त्याचवेळी समग्र क्रांती सुरू झाली असे म्हणता येईल.''(मजुमदार धीरेंद्र,१९५४:४२—५४)

धीरेंद्रांनी क्रांतीबद्दल सखोल चिंतन केले होते. क्रांती आणि युध्द यामध्ये ते फरक करतात. धीरेंद्रानी युध्दापेक्षा क्रांतीला जास्त महत्व दिले. त्यांच्या मते क्रांतीमध्ये सर्व प्रकारचे मूल्य परिवर्तन होत असते तर युध्दामध्ये केवळ सत्ता बदल होतो. धीरेंद्रांनी भारत, रशिया, फ्रान्स इ. देशामधील क्रांती व युध्दाचा अभ्यास करून याविषयी आपले विचार व्यक्त केल आहेत. गांधीजी आणि पुढे विनोबा यांनी राजनीतीचे रूपांतर करून लोकनीती करणे हा जो विचार मांडला. तो क्रांतीचा विचार आहे असे धीरेंद्राचे म्हणणे होते.

१९४२ च्या क्रांतीच्या नावाने जे चालले ते खरेतर युध्दच होते, क्रांती नव्हे. त्याच प्रमाणे फ्रान्सच्या राज्यक्रांतीतसुध्दा क्रांतीच्या नावे राजतंत्राच्या विरोधात एक विद्रोह व विरोध होता आणि एका वर्गाच्या हातून दुसऱ्या वर्गाच्या हाती सोपविण्याचे सत्ता हस्तांतरणाचे युध्दच होते. रशियामध्ये पण तेच झाले, रशियन राज्यक्रांतीच्या नावे जे आंदोलन झाले ते शेवटी काय होते? तर झारशाहीच्या अन्याय व अत्याचाराचा विरोध. म्हणजेच भांडवलदार वर्गाच्या हातून जन समूहाच्या हाती सत्ता हस्तांतरणाचे आंदोलन. खरेतर चिंतनशील व्यक्तीच्या लेखी ही बाब अगदी स्पष्ट होती की हया आंदोलनात मार्क्सचा क्रांतीकारी विचार म्हणजेच भांडवलशाहीच्या जागी समजावादाच्या स्थापनेची प्रेरणा अंतर्निहीत होती.(देवघरे रविंद्र (अनु.),२०१०:१५७—१५८)

धीरेंद्रा वरील प्रमाणे क्रांती व युध्दामध्ये फरक करतात व शेवटी विनोबांच लोकनीती हीच खरी अहिंसक क्रांती आहे असे मत मांडतात. धीरेंद्रा

म्हणतात, ''या सर्वाच्या तुलनेत विनोबांच्या ग्रामस्वराज्याचे आंदोलन मात्र या प्रकारच्या तात्कालिन व स्थानिक परिस्थिती बदलण्यापुरते सीमित नाही.तर स्पष्टपणे राजनीतीच्या जागी लोकनीतीच्या स्थापनेविषयीच्या गांधी विचारांना साकार करण्याचे हे एक क्रांतीकारी  आंदोलन आहे. विनोबांसाठी हे अत्यंत स्वाभाविक होते की ते यासाठी क्रांतीच्याच पध्दतीचा अवलंब करतील. विरोध, विद्रोह, युध्द इ. च्या पध्दतीचा नव्हे. (देवघरे रविंद्र (अनु),२०१०:१५८)

थोडक्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय मूल्यपरिवर्तन घडवून आणणे तसेच परंपरागत पध्दतीमध्ये, संस्थामध्ये, मान्यतामध्ये देखील बदल घडवून आणणे म्हणजे क्रांती होणे असा महत्वाचा विचार धीरेंद्रांनी मांडला.

**शास्त्री आणि मिस्त्री :**

धीरेद्रांचे क्रांतीदर्शन किती मूलगामी, सुस्पष्ट आणि सर्वस्पर्शी होते याची यावरून कल्पना येते. परंतु धीरेंद्रा केवळ दार्शनिक अथवा सैध्दांतिक नव्हते. व्यवहार हीच सिध्दांताच्या जिवंतपणाची खरी आणि अखेरची कसोटी होय असे ते मानीत. त्यामुळेच कृतिशीलता हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि जीवनाचा एक अत्यंत महत्वाचा आणि मौलिक असा पैलू होता. ते योगी होते, तसेच ते प्रयोगीही होते. त्यांची चिंतनशीलता कृतीपरायण होती. ते जसे सैध्दातिंक होते तसेच रचनाकारही होते. ते शास्त्रकारही होते आणि शिल्पकाराही होते. त्यांच्या व्यक्तित्वातील अकृत्रिम आणि अभिजात विनयशीलतेमुळे ते स्वत:ला साधक 'मिस्त्री' म्हणवून घेत! मात्र या शिल्पकाराच्या प्रतिभेला अत्यंत सूक्ष्म, तरल आणि मर्मग्राही अशा दार्शनिक प्रज्ञेची डूब होती यात शंकाच नाही. (चोळकर पराग(संपा.),२०००:२३—२४)

धीरेंदांनी त्यांचे सगळे जीवन अहिंसक समाजरचनेच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या तंत्राच्या, साधनांच्या, प्रक्रियांच्या आणि कार्यक्रमांच्या अन्वेषणाला आणि अनुसंधानाला वाहिलेले होते.

**भारतीय समाजमीमांसा व मार्क्सवादाची चिकीत्सा :**

धीरेंद्रांनी भारताच्या समाजाची मीमांसा अत्यंत सखोल पध्दतीने केलेला आहे. एका उदाहरणाने हा मुद्दा थोडा अधिक स्पष्ट करता येईल. भारतीय समाजाची सर्वंकष गुंतागुंत लक्षात घेता, मार्क्सप्रणीत वर्गमीमांसा व त्याअनुषंगाने येणारा वर्गसंघर्ष या दोन्ही गोष्टी भारताला कशा गैरलागू आहेत याचे अत्यंत मार्मिक असे विश्लेषण धीरेंद्रांनी केले आहे, आणि त्याआधारे क्रांतीच्या नव्या तंत्राची अथवा साधनाची गरज पटवून दिली आहे. धीरेंद्र म्हणतात, ''केवळ भांडवलदार आणि मजूर असे परस्परविरोधी दोन वर्ग भारतात नाहीत. एका बाजूला खेडयापाडयातून राहणारे ग्रामीण लोक आहेत. त्यांच्याजवळ अपुरी जमीन आहे आणि काही भूमिहीन शेतमजूर आहेत आणि दुसऱ्या बाजूला सगळी जनता आहे. भारतातील शेतमजूराचा विचार केल्यास येथील संघटित मजूरवर्ग हा सुध्दा शोषकांचा वर्ग ठरतो. कारखान्यांतून काम करणाऱ्या मजूरांच्या मानाने खेडयातील भूमिहीन शेतमजूरास एक तृतीयांश किंवा एक चतुर्थांश सुध्दा मजूरी मिळत नाही.'' (चोळकर पराग (संपा.),२०००:४८—४९)

धीरेंद्रांनी विषमतेच्या निर्मूलनासाठी सामूहिक समंजसपणा आवश्यक असून ग्रामसभा हे क्रांतीचे महत्वाचे साधन आहे याविषयी ते म्हणतात, ''आर्थिक विषमतेच्या उच्चाटनासाठी आजची आर्थिक रचनाच आमूलाग्र बदलावी लागेल. यासाठी सार्वजनिक जागृतीची गरज आहे. संपूर्ण समाजाची जागृत समूहशक्ती हेच आज क्रांतीचे साधन राहील. त्याद्वारेच आजच्या समाजाची घडी बदलण्याचा संघर्ष होईल. समाजाच्या या जागृत मानसिकतेचे व सहकारशक्तीचे मूर्त रूप ग्रामपरिवार आणि ग्रामसभा यातून व्यक्त होईल. वस्तुत: खेडयातील सर्व समूहांचे समान प्रतिनिधित्व असलेली ही ग्रामसभाच नव्या क्रांतीचे अवजार होईल आणि हीच ग्रामसभा राज्यसंस्थेचा पर्याय या नात्याने काम करील.''(चोळकर पराग (संपा.),२०००:५१)

**कार्यकर्ता, कार्यक्रम, कार्यशैली याबद्दलचे विचार :**

धीरेंद्रांनी कार्यकर्ता, कार्यक्रम व कार्यशैली याबाबतीत सविस्तर विवेचन केलेले आहे. भारतीय समाजरचनेचे हे विश्लेषण किती सूक्ष्म, सर्वस्पर्शी,

मूलग्राही आणि मार्मिक आहे. १९६० मध्ये त्यांनी आपल्या ग्रामपरिवार—प्रवेश या कार्यक्रमाचा बलिया या बिहारमधील पूर्णिया जिल्हयातील गावापासून आरंभ केला. कोणताही नियोजित कार्यक्रम घेऊन कार्यकर्त्यांनी गावात जाऊ नये. आपल्या जीवनशैलीतून आपोआपच कार्यक्रम निर्माण होईल आणि त्या कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सहकार्य मिळण्याचा संभव अधिक राहील अशी त्यांची अटकळ होती. कार्यक्रमासाठी कार्यकर्त्यांने आतूर होण्याची गरज नाही. कार्यक्रमाची निर्मिती ही एक स्वाभाविक प्रक्रिया व्हावयास हवी. गावाला आपले प्रेमक्षेत्र मानून त्याचा विस्तार आणि खोली वृध्दिंगत करणे आणि श्रमनिष्ठ जीवन व्यतीत करणे हेही परिवर्तनाचेच काम आहे. कार्यकर्ता, कार्यक्रम आणि कार्यशैली या तिन्ही घटकांच्या संदर्भात धीरेंद्रांची ही भूमिका जितकी नावीन्यपूर्ण होती तितकीच ती मौलिकही होती. समाजक्रांती हा कोणत्याही अर्थाने कार्यकर्त्यांचा व्यवसाय होऊ शकत नाही, ती एक स्वाभाविक प्रक्रिया असली पाहिजे, हे या विचारातील नावीन्य होते, आणि कार्यकर्ता हा ग्रामीण जीवनाशी समरस झाला पाहिजे, ग्रामस्थांचा जीवनसंघर्ष हा त्याचाही जीवनसंघर्ष असला पाहिजे. (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:२१—२८)

धीरेंद्रांचे हे विचार म्हणजे कोणताही कार्यक्रम जनचळवळ झाली पाहिजे याच धर्तीवर आधारित आहे.

**चुली जोड चळवळ :**

धीरेंद्र मजुमदार यांनी बलियातील 'चुली जोड' आंदोलन केले. ६ एप्रिल, १९६० रोजी धीरेंद्र मजुमदार यांनी जीवनाच्या नव्या अध्यायात सर्वजनाधाराच्या माध्यमातून बलिया या गावी पाऊल ठेवले. धीरेंद्रांनी आपल्या सर्वजनाधाराचा उद्देश स्पष्टपणे सांगितला. मानवाचा एक परिवार असतो, जो स्त्री केंद्रीत असतो. कारण की, तीच परिवारची मुख्य संघटक असते. म्हणूनच धीरेंद्र स्त्रियांना समाजाचा कणा मानतात. शेवटी धीरेंद्रांनी गावकऱ्यांना सांगितले की, सगळयात पहिल्यांदा त्यांना गावातील सुनांना भेटायचे आहे. धीरेंद्रांना आपला विचार त्यांच्यासमोर ठेवावयाचा होता. कारण की त्या समाजाचा कणा आहेत आणि भावी संतानाची आदिगुरू आहेत. तसेच गावाच्या मातृ—शक्ती

आहेत आणि ती मातृ—शक्ती अनुकूल झाली तर भावी पिढी संस्कारवान बनवायला सोपे होईल असे धीरेंद्र मजुमदार यांचे मत होते. (नरेंद्रभाई(संपा. ),१९८१:११०)

क्रांतीच्या तेज:पुंज संकेतांनी भारलेले कार्यक्रम देखील कधीकधी किती सहजपणे हाती येतात याचे एक अतिशय प्रभावी उदारहरण म्हणजे बलियामधील 'चुली जोडण्या'चा कार्यक्रम होय. गावातील एका सधन कुटुंबातील सर्व लोक एकत्र राहत असतानाही चुली मात्र दोन वेगवेळया असल्याचे धीरेंद्रांच्या लक्षात आले त्या परिवारातील दोन्ही भावांच्या पत्नींना त्यांनी विचारले, 'तुम्हा स्त्रियांना मने जोडायची आहेत की तोडायची?' 'अर्थात जोडायची' त्या म्हणाल्या. 'पण मग चुली जोडल्याखेरीज मनं कशी जुळतील?' धीरेंद्रांचे म्हणणे त्यांना पटले असावे, कारण चुली जोडण्याचे आश्वासन मिळाले. त्यानंतर घरा—घरातून हाच कार्यक्रम घेण्यात आला. बलियामधील अस्पृश्य स्त्रिया या कार्यक्रमाच्या निमित्ताने घराच्या बाहेर पडल्या. जणू नव्या सूर्याचे त्यांनी दर्शन घेतले. एकातून दुसरा असे कार्यक्रम निघत गेले. स्त्रीशिक्षणाची नवी योजना तयार झाली. शिकलेल्या स्त्रियांनी अशिक्षितांना शिकवावे, कार्यकर्त्यांनी शिक्षित स्त्रियांना पुढचे शिक्षण दयावे. यातून परिवारप्रवेश आणि त्याद्वारे प्रेमक्षेत्राच्या विस्ताराची एक अपूर्व संधी आयती चालून आली. या आगळयावेगळया कार्यक्रमाची गावोगाव चर्चा होऊ लागली. चुली जोडण्याची जणू एक मोहीमच सुरू झाली. धीरेंद्रांना वाटले, जणू 'ईश्वराने जनाधाराची प्रक्रिया सुरू करून दिली आहे. '(नरेंद्रभाई(संपा),१९८१:१११) चुली जोड कार्यक्रमातून हृदय जोडणे हाच धीरेंदांचा मुख्य उददेश होता.

**स्वाधार आणि जनाधार :**

लोकाभिक्रम, लोकसहभाग आणि लोकपुरूषार्थ हे ज्या क्रांती—प्रक्रियेचे घटक आहेत. त्या प्रक्रियेत कार्यकर्त्यांची भूमिका आणि स्थान कशा स्वरूपाचे असेल? कार्यकर्ते संस्थाधारित असता कामा नये. ग्रामजीवनाशी जर त्याने एकरूप व्हायचे असेल तर त्याच्या चरितार्थाचे साधन त्याला इतर

ग्रामवासियांप्रमाणेच स्वावलंबनानेच निर्माण करायला पाहिजे. त्यानेच त्याची ग्रामीण परिवाराशी समरसता वाढेल व गावाच्या गरजा आणि समस्या त्याच्याही गरजा आणि समस्या होतील. त्यातून परिवर्तनात त्याची आस्था दृढ होईल आणि त्याची तीव्रता वाढेल. अशारीतीने स्वाधार आणि जनाधार यांच्या विणीने त्याचे जीवन संपन्न होईल. त्याची क्रांतिनिष्ठा, प्रेममय व्यवहार आणि नि:स्पृह जीवनशैली या गुणांमुळे त्याच्या व्यक्तित्वाची प्रेरकशक्ती व त्याचे प्रभावक्षेत्र विस्तृत होईल. या दृष्टीने बरनपुर—मधुबनी क्षेत्रात धीरेंद्रांनी स्वावलंबी लोकसेवक निर्मितीचे जे प्रयोग केले ते अत्यंत प्रेरणादायी आणि पथप्रदर्शक ठरले यात शंकाच नाही.

**समारोप :**

धीरेंद्र हे एक क्रांतीदर्शी समाजशिल्पी होते. त्या नात्याने आयुष्यभर समाजपरिवर्तनाचे आणि नवरचनेचे अत्यंत क्रांतीकारी प्रयोग त्यांनी केले. कार्यकर्ता, कार्यक्रम आणि कार्यशैली या तिन्ही घटकांच्या संदर्भात धीरेंद्राची ही भूमिका जितकी नाविन्यपूर्ण होती तितकीच ती मौलिकही होती. समाजक्रांती हा कोणत्याही अर्थाने कार्यकर्त्यांचा व्यवसाय होवू शकत नाही. ती एक स्वाभाविक प्रक्रिया असली पाहिजे, हे या विचारातील नावीन्य होते, महात्मा गांधींजी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या सामाजिक विचारांच्या पुढे जावून धीरेंद्र मजुमदार यांनी आपले समाजाविषयीचे विचार मांडले आहेत. अहिंसक समाज म्हणजे हिंसारहित समाज असे विचार धीरेंद्र मजुमदार मांडतात. चुली जोड चळवळ, आईला शिक्षण देणे इ. महत्वाच्या बाबीमधून समाज परिवर्तनाचा विचार त्यांनी मांडला आहे.

## धीरेंद्र मजुमदार यांचे शिक्षणविषयक विचार

महात्मा गांधींचा शिक्षणविषयक विचार म्हणजे नई तालीम, मूलोद्योग, साक्षरता—प्रसार, प्रौढ शिक्षण, व्यवसाय—शिक्षण हे होय. शिक्षण आणि चारित्र्य, शिक्षण आणि नैतिकता, शिक्षण आणि संस्कार यातील अन्योन्य संबंध महात्मा गांधींनी सांगितला होता. 'नई तालीम' हे गांधींच्या एकूण शिक्षणविषयक

चिंतनाचे केवळ अंशात्मक दर्शन होते. नई तालीमचा प्रयोग सुचवताना गांधी कोणती दृष्टी देत होते, त्याचाच विकास धीरेंद्र मजुमदार यांनी मांडलेल्या शिक्षण विषयक विचारातून होताना दिसतो.

धीरेंद्रांनी अत्यंत मूलगामी स्वरूपाचे शिक्षण विषयक विचार मांडले आहेत. महात्मा गांधींजीनी ऑक्टोबर, १९३७ मध्ये वर्धा येथे बोलाविलेल्या राष्ट्रीय शिक्षा संमेलनाला सर्व प्रातांतील शिक्षण मंत्री आणि शिक्षण तज्ज्ञ यांना आमंत्रण दिले होते. त्या संमेलनामध्ये सगळयांसमोर महात्मा गांधीजीनी बुनियादी तालीमची (मूलउद्योगी शिक्षणाची) संकल्पना मांडली आणि या मूलउदयोगाच्या माध्यमातून शिक्षण देणे हे सर्वांनी स्वीकारले व मान्यता दिली. परंतु गांधींजींचे एवढयावर समाधान झाले नाही. त्यांना केवळ उदयोग नाही तर स्वावलंबन अपेक्षित होते. (मजुमदार धीरेंद्र,१९८२:८—९) परंतु संमेलनातील सहभागी व्यक्तींनी स्वावलंबनाला विरोध केला. कारण स्वावलंबी विचारामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर दबाव पडेल असे सगळयांना वाटत होते.

**शिक्षणशास्त्राचा क्रमिक विकास :**

धीरेंद्र मजुमदार यांच्या मते,'शिक्षणाचा विकल्प शोधण्यासाठी शिक्षणशास्त्राच्या विकासाचा इतिहास अभ्यासणे गरजेचा आहे'. काही काळात फक्त भारतातच नव्हे तर साऱ्या सभ्य जगामध्ये शिक्षणाची प्रारंभिक प्रक्रिया दर्शनशास्त्राच्या आवृत्ती पर्यंतच सीमित होती. सर्व शास्त्रांची आवृत्ती त्यांना समजण्यापेक्षा ही अधिक श्रेष्ठ होती. भारतामध्ये गुरूकुल, युरोपमध्ये मोनास्ट्रीज व पश्चिम आशियामध्ये मकतबमध्ये दिले जाणारे शिक्षण श्रेष्ठ होते. जसजसा मुनष्याचा बौध्दिक स्तर वाढत गेला तसतसे ज्ञानाची आकांक्षा वाढत गेली. त्या काळातील मनुष्य असे समजायला लागला की, या प्रक्रियेमधून शास्त्रांची माहिती मिळते, परंतु बौध्दिक विकास होत नाही. (मजुमदार धीरेंद्र,१९८२:७७—७८) यानुसार देशभर शिक्षणाचा विस्तार झाला. गुरूकुलाशिवाय वेगवेगळया संस्थांनीही शाळांची स्थापना केली. वेगवेगळया विषयावर पुस्तके लिहिली. त्यामुळे समाजातील असंख्य विद्यार्थी शिक्षण घेऊ शकले.

धीरेंद्रांच्या मते, मनुष्याची बुध्दी स्थिर राहत नाही ती कायमस्वरूपी बदल होत जाते. ज्ञान विज्ञानाच्या प्रगतीबरोबर शिक्षणशास्त्राची प्रगती होऊ लागली. पुस्तकाच्या माध्यमातून होणारा बौध्दिक विकास पर्याप्त नाही हे पण लक्षात आले. चित्राच्या साहयाने शिक्षणाची पध्दती सुरू झाली. लहान मुलांच्या पुस्तकामध्ये वेगवेगळया प्रकारची चित्रे निर्माण झाली व छापली जाऊ लागली. चित्राच्या सहाय्याने शिक्षणासाठी वेगवेगळे चार्ट निर्माण झाले. हळूहळू ही पध्दती जगामध्ये प्रसिध्द झाली. त्यांच्यापुढे मॉडेल निर्माण करून शिक्षण दिले जाऊ लागले. त्यामध्ये फळे, झाडे, पशू, पक्षी, डोंगर आणि नदी यासारखे चित्र व मॉडेल तयार करून शिक्षण दिले जाऊ लागले. (मजुमदार धीरेंद्र,१९८२:१८) एकूणच शिक्षणाची प्राचीन ते आधुनिक अवस्था धीरेंद्र स्पष्ट करताना दिसतात.

**नई तालीम :**

वर्धाच्या १९३७ च्या शिक्षणसंमेलनामध्ये गांधीच्या म्हणण्यानुसार डॉ. झाकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. त्या समितीवर शिक्षण योजना निर्माण करण्याची जबाबदारी दिली.

धीरेंद्रांच्या मते, प्राचीन काळामध्ये जेव्हा विज्ञानाचा स्तर खाली होता, तेव्हा काळप्रवाहाची गती हळू होती. त्यावेळी सामाजिक प्रथा बदलण्यासाठी जास्त वेळ लागत होता. परंतु आज असे होऊ शकत नाही. विज्ञानाच्या प्रगतीमुळे मनुष्याचे विकासासंबंधीच्या आकांशा मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. वैज्ञानिक साधनांच्या उपलब्धतेमुळे आकांक्षांची गरज पूर्ण होणे सोपे झाले आहे. त्यामुळे आजच्या युगामध्ये एका पिढीमधील समाजामध्ये उत्पादनाच्या साधनामधील बदल आश्चर्यकारक नाही. (पानसे रमेश,२००७:७—८) असे विचार धीरेंद्र आजच्या शिक्षण पध्दती बद्दल मांडतात. शेवटी आजच्या शिक्षकांना कायमस्वरूपी बदलाला स्वीकारावे लागेल. बदलणाऱ्या कल्पनानुसार भावी नागरीक बनविण्याची जबाबदारी शिक्षकावर असेल. त्यामुळे नवीन समाजात नई तालीमचे स्वरूप ठरविणे हा समितीपुढील महत्वाचा प्रश्न होता.

या समिती संदर्भात धीरेंद्र मजुमदार यांना असे वाटत होते की, लक्ष्य जेवढे स्पष्ट होते तेवढे शिक्षण तज्ञ भविष्य दृढ करू इच्छित होते. समाजातील

सामान्य माणसाला लक्ष्याच्या दृष्टीने नेण्यासाठी पहिले पाऊल हया स्थितीतून उठविले पाहिजे.

धीरेंद्रांच्या मते, नई तालीमच्या योजनेनुसार जीवनातील विविध कार्यही शिक्षणातील विषय असावेत. शेती, उद्योग, सामाजिक व्यवस्था हे विषय असावेत. या विषयाचे सखोल ज्ञान मिळण्यासाठी वैज्ञानिक आणि सामाजिक माहीती असणे आवश्यक आहे. ती तेवढी प्राप्त करणे गरजेचे आहे. उत्पादन आणि समाज व्यवस्थेतील कामासाठी वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, प्राणीशास्त्र, कीटाणुशास्त्र, नागरिकशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल या विषयांच्या विविध घटकांची माहिती असणे आवश्यक असते. यासाठी हे नई तालीमचे विषय मानले जाणार नाहीत. परंतु विद्यार्थ्याला शेतीचे वैज्ञानिक ज्ञान मिळविण्यासाठी खतातील रासायनिक तत्वांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे ते जमिनीचे तत्व, कीटाणू तत्वाचा अभ्यास करतील. हे सर्व विषय पदार्थविज्ञान विषयात येत होते. विद्यार्थ्यांना विचारल्यानंतर हा विषय पदार्थविज्ञान येतो असे सांगत असत. परंतु आता नई तालीममध्ये कृषीचा अभ्यास करणारे विद्यार्थी कृषी विषय सांगतील. जुन्या तालमीमध्ये पहिल्यांदा विज्ञान हा विषय शिकविला जात असे नंतर विज्ञानाचा उपयोग म्हणून विषय शिकविला जात असे. त्याला 'अप्लाइड साइन्स' म्हणतात. नई तालीममध्ये विज्ञान हे न 'प्युअर' आहे न 'अप्लाइड' आहे. याला आपण आवश्यक विज्ञान असे म्हणतो. उपयुक्त सिध्दांताचा विचार करता अभ्यासक्रम बनविला तर त्यात गणित, इतिहास, भूगोल या विषयाचा उल्लेख न करता कृषी, बागवानी, वस्त्रोदयोग, हस्तकला, चर्म उद्योग यांचा उल्लेख केला जाईल. परंतु डॉ. झाकिर हुसेन समितीच्या रिपोर्टमध्ये जुन्या अभ्यासक्रमानुसार समाजविज्ञान आणि सामान्य विज्ञान वेगवेगळे अभ्यासक्रम बनविले आहेत असे धीरेंद्रांनी मत मांडले. (मजुमदार धीरेंद्र,१९८२:२२—२३) अशाप्रकारे सन १९४२ च्या आदोलनांच्या पूर्वी काही प्रांतामध्ये नई तालीमचा सुनिश्चित आकार निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

नई तालीमच्या पहिल्या भागात श्री. आर्यनायकजी आणि आशादेवी यांच्या नेतृत्वाखाली देशामध्ये जागोजागी नई तालीमचे प्रयोग चालू होते. त्यासाठी गांधीजींचे सतत मार्गदर्शन होते.

**ग्रामीण विद्यापीठ स्थापनेचा विचार :**

संपूर्ण समाज हीच शिक्षण संस्था बनावी असा विचार आल्यावर ग्रामीण भागाकडे लक्ष्य जाते. कारण भारतीय समाजाचा स्वाभाविक पर्याय ग्रामीण भाग आहे. विद्यापीठ, ग्राम भारती व स्वावलंबी विद्यालय शहरातील विद्यालयाच्या शाखा ग्रामीण भागात काढून किंवा आहे त्यातच ग्रामीण भागातील कृषीसारखे विषय जोडून ग्रामीण विद्यापीठ होणार नाही. सर्व शिक्षण संस्थांनी संपूर्ण समाजाला शिक्षण देण्यासाठी काम करावे अशी धीरेंद्रांची धारणा होती. धीरेंद्र मजुमदार यांच्या मते, संस्थांनी चार भिंतीच्या बाहेर येऊन स्वतः समाजासाठी नई तालमीचे माध्यम बनावे. या दृष्टीने हिंन्दुस्तानी तालीम संघाने संपूर्ण गावाला शिक्षण देण्याचा प्रस्ताव स्वीकारला होता. नई तालीम व्यापक बनविण्यासाठी आधी गावांमध्ये भौगोलिक विचार न करता सामाजिक विचार निर्माण व्हावा. ग्रामदान, भूदान आंदोलनामुळे ग्रामीण भागात समाज परिवर्तनाला सुरूवात झाली. त्यामुळे नई तालीममधील गंगोत्रीचे दर्शन झाले आणि हिंदुस्तानी तालीम संघाची नवीन प्रस्ताव स्वीकारण्याची हिंमत झाली.(मजुमदार धीरेंद्र,१९८२:२६—२७) असे विश्लेषण तत्कालीन परिस्थितीवरून धीरेंद्र मजुमदार यांनी केले आहे.

**अभ्यासक्रमाचा शोध आणि शोषणमुक्त अहिंसक समाजरचना :**

सन १९४५ मध्ये महात्मा गांधींनी ग्रामीण विद्यापीठाच्या संदर्भात नई तालीमचा नवीन अध्याय कुठून सुरू करावयाचा, त्यांच्या अभ्यासक्रम काय ठेवायाचा यावर विचार मांडले होते. त्यांनी पहिली गोष्ट अशी सांगितली की, देशामध्ये ७ लाख गावे आहेत त्यामुळे कमीत कमी ७ लाख लोक सेवक पाहिजेत. जे गावामध्ये राहून गावातील लोकांमध्ये मिसळले पाहिजेत. वैकल्पिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा शोध या सेवकांपर्यंत होऊ शकतो.

हे सेवक गावामध्ये जाऊन शोषणमुक्त अहिंसक समाज रचना निर्माण करण्यासाठी कार्यक्रम चालवतील. गावांचा अभ्यास केल्यानंतर गाव वर्ण आणि वर्गामध्ये विभागले आहे का हे लक्षात येईल ते विभागले असेल तर सर्व प्रथम आपणाला गावातील वर्ण अणि वर्ग नष्ट करून गाव एकत्र केले पाहिजे. त्यासाठी पहिला कार्यक्रम वर्ण व वर्ग निराकरण कार्यक्रम राबवावा लागेल. त्यामुळे शिक्षणाला सामाजिक संदर्भ मिळेल. ही महात्मा गांधीजींची नई तालीमची कल्पना होती.(मजुमदार धीरेंद्र,१९५५:५३) असे धीरेंद्र मजुमदार मानतात आणि आपले नई तालीम विषयक विचार मांडतात.

**श्रमप्रतिष्ठेला महत्व :**

शिक्षणामध्ये श्रमप्रतिष्ठेला महत्व असले पाहिजे. उत्पादक श्रम शिक्षणाचे माध्यम असावे. शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांबरोबर उत्पादक श्रम करतात. परंतु विद्यार्थी ज्या समाजामध्ये राहतात त्या समाजामध्ये श्रमाला प्रतिष्ठा नाही. मुले शेतामध्ये जात असतील तर आईची प्रतिष्ठा जाते आणि वडीलांचे नाक कापले जाते. अशा परिस्थितीत मुलांला श्रमाची आवड कशी लागणार, बिन आवडीचे केलेले काम शिक्षणाचे माध्यम होऊ शकते का? असा प्रश्न धीरेंद्र मजुमदार उपस्थित करतात. धीरेंद्रांच्या मते, श्रमाबाबत तिरस्कार मोठया वर्गातच नाही तर सर्व प्रकारच्या वर्गामध्ये आहे. आज सर्वात खालच्या वर्गातील लोक काम करतात ते उत्पादन श्रम आहे. परंतु ते आवडीने करत नाहीत तर नाईलाजाने करतात. आवड तर श्रम टाळण्यामध्ये पण आहे. उत्पादक श्रम करण्याची भारतातील कोणत्याच समाजात आवड नाही तर त्यांची मुले आवडीने उत्पादक श्रम करतील ही कसली आशा आहे. शिक्षकाला पण ही गोष्ट लागू पडते. ज्या गोष्टीला सामाजिक प्रतिष्ठा नाही त्याला शिक्षक पण काय करणार? शेवटी प्रतिष्ठा सर्वांना आवडते.(मजुमदार धीरेंद्र,१९५५:५३)

**शिक्षकाचे जीवनमान व सेवकाची कार्ये :**

धीरेंद्र म्हणतात की शिक्षक ज्ञानाबराबर प्रात्यक्षिकाचे धडेही देतील. गावातील सर्व कार्ये नई तालीमच्या माध्यमातून केली जातात. त्यामुळे सेवकाला त्या पध्दतीने गावाचे अध्ययन करावे लागते. त्यामध्ये कोणत्या समस्या आहेत

आणि शिक्षणाच्या दृष्टीने काही घटक कमी असतील तर ते पूर्ण करण्याचे प्रयत्न करावे लागतात (मजुमदार धीरेंद्र,२०११:१६४—१६६) धीरेंदा म्हणतात की, आजच्या बुनयादी शाळामध्ये उदयोग, सरंजाम आणि कलेची दुरूस्ती ही नई तालीमची अंगे आहेत. संपूर्ण गावाला तालमीच्या माध्यमातून तयार करणे ही नई तालीमची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत सेवकाला काही पावले पूर्ण करावी लागतील. ही पावले क्रमशः पुढीलप्रमाणे आहेत. १) ग्रामीण भावना २) ग्रामीण सहकार ३) ग्रामीण संघटन ४) ग्रामीण शक्ती ५) ग्रामीण संकल्प ६) ग्रामीण दान ७) ग्रामीण भारती ८) ग्रामीण स्वराज्य

अशा प्रकारे ग्रामीण प्रवेशापासून गावाची विविध पावले नई तालीमच्या अभ्यासामध्ये येतात.

**शिक्षणाची संपूर्ण योजना :**

धीरेंद्र मजुमदार यांनी शिक्षणाविषयी स्थूल योजना निर्माण केली होती. पूर्व बुनियादी, बुनियादी, उत्तर बुनियादी आणि उत्तम बुनियादी वर्ग असे नवीन शिक्षणाचे विभाग पाडले होते. त्यांचे पाठयक्रम निर्माण केले होते. यातूनच 'नई तालीम' शिक्षण पध्दतीचा विकास धीरेंद्र मजुमदार करतात. त्यांनी नई तालीमच्या माध्यमातून बुनियादी शिक्षणाचे खालीलप्रमाणे टप्पे पाडले आहेत.

**आईचे शिक्षण :**

धीरेंद्रांच्या मते, नई तालीम शिक्षण पध्दतीचे क्षेत्र जन्म ते मृत्युपर्यंत आहे. जन्मजात शिशुची शिक्षक त्याची आई असते. जन्मानंतर मुलांचे पालनपोषण करायचे हे त्यांच्या आईच्या हाती असते. एवढेच नाही गर्भकालावधीमध्ये आईची मानसिक स्थिती, चितंन, वृत्ती आणि कृती भावी मुलाच्या चरित्रावर प्रभाव पाडते. त्यामुळे मुलाच्या शिक्षणाचा पहिला घटक आईचे शिक्षण आहे. आईचे शिक्षण हे विद्यालयामध्येच होते. त्यांना स्वाभाविक कार्यक्रमातूनच शिक्षण दिले जाते. ते ग्रामविकासाच्या क्रमिक कार्यक्रमातून आईला बरेच शिक्षण मिळते. तसेच ग्रामभारतीतूनही आईला शिक्षण मिळते. तरीपण ग्रामीण स्त्रिया शिक्षणापासून लांब राहिल्या असतील तर त्यांना शिक्षण

देण्याची स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. काही स्त्रियांना विशेष केंद्रामध्ये पाठवून त्यांना शिक्षित करणे गरजेचे आहे. ही प्रक्रिया एक—दोन पिढीपर्यंत चालण्याची प्रक्रिया आहे. त्यानंतर नई तालीमचे मूळ सिध्दांतानुसार गांव शिक्षण केंद्र बनेल. काहीपण झालेतर मुलांच्या शिक्षणासाठी आईचे शिक्षण महत्त्वाचे आहे. शिशुपालन कार्यक्रम सुरू करणे गरजेचे आहेत. यासाठी गावा—गावात शिशुपालन कार्यक्रमाचे संघटन आवश्यक आहे.(मजुमदार धीरेंद्र,१९८२:४१) धीरेंद्र मजुमदार यांनी मुलांच्या आधी आईच्या शिक्षणाला महत्व दिले आहे.

**पूर्व बुनियादी वर्ग :**

धीरेंद्रांच्या मते, मुलांचा जन्म झाल्यापासून सहा वर्षापर्यंतचे शिक्षण पूर्व बुनियादी वर्ग म्हणून ओळखले जाते. त्यामध्ये शिशू विहार आणि बाल मंदिर यांचा समावेश होतो. जन्मापासून अडीच वर्षापर्यंत शिशू विहार आणि अडीच वर्षापासून सहा वर्षापर्यंत बालमंदिर यामध्ये शिक्षण दिले जाते.(मजुमदार धीरेंद्र,१९८२:४१)

**शिशु विहार :**

शिशू विहारामध्ये मुलांना हळूहळू निसर्ग समजला पाहिजे यासाठी शिशू विहार रिकाम्या जागेत असावा. त्यासाठी एक छोटेसे घर असावे. जास्त वेळ मुलांना मोकळी हवा, मातीमध्ये सोडावे. शिशू विहारामध्ये मुलांना आवडणारे कार्यक्रम घ्यावेत त्यामध्ये संगीत असावे. शिशू विहाराच्या अंगणामध्ये कला आणि उद्योगाच्या सामग्रीचे छोटे छोटे नमूने ठेवावे की जे मुले बघू शकतील आणि हातात घेऊन खेळतील. अशा प्रकारे शिशू विहारातील वातावरणामध्ये संगीत, कला आणि उद्योग यांचा समन्वय असावा, ज्यामुळे मुलांवर संस्कार होतील.

शिशू विहारामधील शिक्षिकेने मुलांच्या पोषणावर जास्त लक्ष दयावे. मुलांना कोणत्या वेळी काय खावे, त्यांचा पोशाख कसा असावा, मालिश आणि स्नान करण्याची पध्दती काय असावी यांची संपूर्ण व्यवस्था इत्यादीची माहिती शिक्षिकेला असली पाहिजे. शिशू विहाराच्या शिक्षणामध्ये आईला

महत्वाचे स्थान असावे. (मजुमदार धीरेंद्र,१९८२:४१) असे शिशू विहारासंबंधात धीरेंद्र सांगताना दिसतात.

**बाल मंदिर :**

धीरेंद्र मजुमदार बुनियादी शिक्षणाचा पुढचा टप्पा सांगताना असे म्हणतात की, अडीच वर्ष ते सहा वर्षापर्यंत वय असणाऱ्या मुलांसाठी बाल मंदिर आहे. या अवस्थेतील मुलाचा स्वाभाविक कार्यक्रम खेळ असतो. शेवटी बालमंदीराच्या शिक्षणाचे मुख्य माध्यम खेळ आहे. या वयात लहान मुलांची जिज्ञासावृत्ती अत्यंत प्रखर असते. बालमंदीर वर्गामध्ये मुलांची जिज्ञासूवृत्ती ओळखून तशा प्रकारचे ज्ञान देण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे असे धीरेंद्रांना वाटते.

**बुनियादी वर्ग (वय ७ ते १५ वर्षे) :**

बाल मंदिरानंतर बुनियादी वर्ग येतात. सात वर्ष ते पंधरा वर्ष वयोगटातील मुले बुनियादी वर्गामध्ये येतात. नवीन समाज निर्माण करण्याच्या भूमिकेमध्ये नवीन बुनियादी तालीमचा विचार करताना ६ वर्ष हे वय ज्ञान विकासाची प्रारंभिक अवस्था मानले आहे.(मजुमदार धीरेंद्र,१९८२:४१) सन १९३७ ते १९५० पर्यंतचा कालावधी हा नई तालीमचा प्रारंभीचा कालावधी मानला जातो. या कालावधीत नई तालीमचे जे प्रयोग झाले ते अत्यंत क्रांतिकारक होते. शरीर श्रम आणि उद्योगाच्या माध्यमातून शिक्षण दिले पाहिजे हे विचार सर्वमान्य झाले.

ग्रामीण शाळामध्ये तिन्ही प्रकारच्या मुलांना सामील करावे. त्यामुळे ग्रामयोजनेमध्ये बालसभेचे कार्यक्रम विभिन्न भागामध्ये करावेत. खेळ, संगीत, नाटक आणि शिक्षण यासारखे वेगवेगळे कार्यक्रम घ्यावे असे प्रतिपादन धीरेंद्र मजुमदार करतात.(मजुमदार धीरेंद्र,१९५९:८—९) अशा प्रकारे धीरेंदा बुनियादी वर्गाच्या टप्प्याबाबत विस्ताराने आपले विचार मांडतात.

**उत्तर बुनियादी वर्ग :**

धीरेंद्र मजुमदार यांच्या मते चौदा—पंधरा वर्षे पूर्ण झालेली मुले बुनियादी अवस्था पूर्ण करून उत्तर बुनियादी अवस्थेमध्ये प्रवेश करतील. बुनियादी अवस्था समाप्त केल्यामुळे मुलांना सामाजिक जीवनाची माहिती मिळते. मुले

कृषी क्षेत्रातील कामाची चांगल्या प्रकारे माहिती घेतात. काही मुले चरखा, शेती, अवजारे, पंपसेट, डिझेल इंजिन आणि इतर यंत्राची पण चांगली माहिती घेतात. अशाप्रकारे प्रत्येक मुलगा आपल्या आवडीनुसार क्षेत्र निवडेल. उत्तर बुनियादीमध्ये मुले बागवानी, सफाई, स्वावलंबन, हातमाग आणि काही भौतिक विषयांच्या अभ्यासाबरोबर एक विषय आपल्या शिक्षणाचा निवडतील. त्यामध्ये कृषी उद्योग, सरंजामउद्योग, वस्त्रोउद्योग, चर्मोउद्योग, तेलउद्योग व जंगल उद्योग यांचा समावेश होतो.

**उच्च शिक्षण :**

नई तालीमच्या सेवकांना उच्च शिक्षणासाठी तपशीलवार अभ्यासक्रम बनवावा लागेल असे धीरेंद्रांना वाटत होते. धीरेंद्र असे मत मांडतात की, आज लगेच यांचा विषय, अभ्यासक्रम बनू शकणार नाही. जेव्हा अनुभवाच्या आधारावर शिक्षणक्रमाचा विकास होत जाईल. तेव्हा सेवकांच्या समोर उच्च शिक्षणाच्या योजनेची धारणा स्पष्ट झाली पाहिजे. कारण निरंतर त्याच दिशेने चिंतन चालु शकते आणि स्पष्ट विवेचनातून देशातील विचारवंतांचे समाधान केले जाऊ शकते. धीरेंद्राच्या मते, उच्च शिक्षणात साधारणतः पुढील गोष्टी असल्या पाहिजे.

१. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सामाजिक व्यवहाराचे कार्य २. कृषी आणि ग्रामीण उद्योगाचे संशोधनाचे कार्य ३. मोटर, रेल्वे, जलवाहतूक आणि हवाई वाहतूक यांच्या साधनांची निर्मिती आणि संचालन ४. लोह धातूचे कारखाने निर्माण करणे आणि चालविणे ५. खनिज पदार्थांचे संशोधन ६. रासायनिक उदयोगाची निर्मिती आणि संचालन ७. धरणे आणि वीज कारखान्यांची निर्मिती आणि संचालन ८.साधनसंपत्तीचे मानवाच्या वापरासाठी प्रशिक्षण ९. अशा प्रकारे अनेक भरीव आणि व्यापक कार्यक्रम १०. वरील कार्यक्रमासाठी भौतिक आणि सामाजिक विज्ञानाचे संशोधन(मजुमदार धीरेंद्र,१९५९:८—९)

अशाप्रकारे तत्कालीन शिक्षणाला पर्यायी रूपात धीरेंद्रांनी विचार मांडले आहेत. धीरेंद्र मजुमदार असे म्हणतात की, ‘‘परत एकदा असे म्हणावे वाटत

की, आज शिक्षण व्यवस्थेत क्रांतीकारी परिवर्तन करून नई तालीम सारख्या शिक्षणात नवे व्यक्तित्व आणि नव्या समाजासाठी उपयोगी आणि कार्यक्षम बनू शकतात.''(मजुमदार धीरेंद्र,१९८२:४२—४४) त्यासाठी धीरेंद्र मुजमदार यांनी आयुष्यभर प्रयत्न केले.

**समारोप :**

मान्यता परिवर्तन, मूल्यपरिवर्तन, हदयपरिवर्तन आणि व्यवस्थापरिवर्तन हा जर अहिंसक समाजक्रांतीचा मार्ग असेल तर या संपूर्ण प्रक्रियेमध्ये शिक्षणाच्या प्रक्रियेला अत्यंत महत्वाचे स्थान देतात. समाजव्यवस्थेचे सातत्य मोठया प्रमाणात शिक्षणव्यवस्थेवरच निर्भर असते.नव्या शिक्षणव्यवस्थेत नवी मूल्ये आणि नव्या मान्यता रूजविण्याची शक्ती आहे. नव्या समाजरचनेला आधारभूत असणाऱ्या नव्या मूल्यांची निर्मिती या शिक्षणव्यवस्थेकडून अपेक्षित असते, म्हणूनच गांधींची 'नई तालीम' ची संकल्पना या ठिकाणी औचित्यपूर्ण व प्रासंगिक ठरते असे धीरेंद्र मजुमदारांना वाटते.

धीरेंद्राच्या विचारात या शिक्षणप्रक्रियेला अत्यंत मध्यवर्ती असे स्थान होते. त्या दृष्टीने आपल्या कार्यक्षेत्रात त्यांनी नई तालीमचे अनेक प्रयोग केले. संपूर्ण समाज हीच शिक्षणसंस्था व्हायला हवी आणि समाजाचा विचार, भारताच्या विशिष्ट संदर्भात, ग्रामीण समाजाचाच विचार असल्याने वस्तुत: सगळे गांव हेच विश्वविद्यालय कसे होईल याचा विचार त्यांनी अग्रक्रमाने केला. अशा रीतीने जीवन आणि शिक्षण यातील आजची दरी कशी बुजविता येईल हा त्यांच्या चिंतनाचा गाभा राहिला आहे. आजच्या काळात श्रमप्रतिष्ठेवर आधारीत शिक्षण मागे पडत आहे परंतु अनेक विकसित देशात उदा. अमेरिका, युरोप इ., श्रमावर आधारीत शिक्षण व जीवनाला पुन्हा महत्व येताना दिसत आहे. एकूणच धीरेंदांनी शिक्षणासंबंधी अत्यंत सखोल चिंतन करून प्रयोगशील तसेच कृतीवर आधारीत विचार मांडले आहेत.

***********

# प्रकरण चौथे
# धीरेंद्र मजुमदार यांचे राजकीय विचार

**प्रस्तावना:**

धीरेंदानी गांधी आणि विनोबांनी अहिंसात्मक समाज व्यवस्थेचा आणि सर्वोदय समाजाचा जो विचार मांडला, त्याचा विकास धीरेंद्रांनी आपल्या शोषणहिन आणि शासनमुक्त समाजाच्या रूपात ग्रामस्वरूपाच्या स्थापनेतून मांडला. या प्रकरणात धीरेंद्र मजुमदार यांनी मांडलेल्या राजकीय विचारामधील शासन निरपेक्ष समाज, शासनमुक्त समाज, वर्गविहीन समाजव्यवस्था, अहिंसात्मक साधने व समाज तसेच राजनीती ऐवजी लोकनीती यांचे विवेचन केले आहे.

**शासनमुक्त समाजाची अनिवार्यता :**

बोधगयाच्या सर्वोदया संमेलनाच्या वेळी अखिल भारतीय सर्व—सेवा—संघाने एका प्रस्तावाद्वारे अशी घोषणा केली होती की, भूदान यज्ञासारखे अहिंसक क्रांतीचे ध्येय शासनमुक्त आणि शोषणहिन समाजाची स्थापना करणे हे आहे. धीरेंदांना शासनमुक्त समाजाची आवश्यकता वाटत होती.

**सर्वोदय समाजाचा उद्देश :**

धीरेंद्रांच्या म्हणण्यानुसार समाजातील प्रत्येक व्यक्ती असे मानते की, सर्वोदय समाजाचा उद्देश हिंसा मुक्ती आहे. गांधींजींच्या मतानुसार अहिंसा केवळ परम धर्म नाही तर तो 'नित्य धर्म' आहे. गांधीजींच्या मतानुसार कोणत्याही परिस्थितीत समाजात हिंसेला मान्यता मिळू नये. जेव्हा अशा अहिंसक समाजाची निर्मिती व्हायची असेल तर मानवाच्या हृदयापासून हिंसेचे संपूर्ण निराकरण करण्याची आवश्यकता आहे.(मजुमदार धीरेंद्र,१९५४:६)

**हिंसा मुक्तीसाठी शासनमुक्ती अनिवार्य :**

धीरेंद्रांच्या मते, आज तर मनुष्यांच्या हृदयात नित्य हिंसा उत्पन्न होत असते. अशा परिस्थितीमध्ये समाजशिक्षण आणि दिक्षेच्याद्वारे, अहिंसात्मक प्रक्रियाचे प्रयोग आणि त्या अनुकूल सांस्कृतिक विकासाद्वारे अहिंसात्मक मनोभावना निर्माण करण्यासाठी पाहिजे तितका प्रयत्न केला तरी, मानवी हृदयातून हिंसेचे निराकरण होऊ शकत नाही. शेवटी हे आवश्यक आहे की, ज्या प्रतिष्ठांनामुळे आणि संस्थांमुळे मनुष्याच्या हृदयात हिंसा उद्भवते त्यांचे विघटन केले जावे. शासनाचा आधार दंड शक्ती आहे. सर्व मानवसमाजाची मान्यता प्राप्त झाली तरी शासनाची शक्ती हिंसात्मकच असते. हिंसेचा आघात मनुष्यांवर सतत होत असतो. स्वाभाविक आघाताने प्रतिघात जन्माला येतो. अशाप्रकारे शासनसंस्थेच्या फलस्वरूप मानव हृदयात हिंसा—प्रतिहिंसेचा घात—प्रतिघात अदृश्य रूपाने सतत चालत असतो. अहिंसक समाजाची स्थापना करण्यासाठी हिंसेची मुक्ती आवश्यक आहे. तेव्हा शासन मुक्तीसाठी ही हिंसेची मुक्ती अनिवार्य आहे.(मजुमदार धीरेंद्र,१९५४:७)

**सर्वोदय क्रांती :**

महात्मा गांधीच्या मृत्यूनंतर उत्तर गांधीवादी विचारवंतानी एकत्र येऊन विनोबांच्या नेतृत्वाखाली सर्वोदयाचा विचार मांडला व सर्वोदय क्रांतीसाठी प्रयत्न सुरू केले. सर्वोदयातील क्रांती सर्जनात्मक क्रांती आहे व ती केवळ शासनावरच आघात करत नाही, तर ती शासनाच्या आवश्यकतेचे निराकरण करते. धीरेंद्रांच्या मते, अहिंसक प्रक्रियेत समाजाचे संघटन हे अशाप्रकारे करायला पाहिजे की, शासन अनावश्यक होऊन जाईल. सुरूवातीला युरोपात अराजकतावादी ही गोष्ट समजत नव्हते. त्यामुळे ते शासनावर प्रत्यक्ष आघात करण्यासाठी बोलत होते. (मजुमदार धीरेंद्र,१९५५:२३)

**इतिहासाची तीन युगे :**

धीरेंद्र मजुमदार इतिहासाच्या तीन युगाबाबत असे सांगतात की, ही भीती फक्त अराजकता शब्दामुळे नाही तर आजच्या प्रचलित 'शासनहीन' शब्दामुळे

पण आहे. हे आवश्यक आहे की शासनहीन समाज आणि शासनमुक्त समाजाचे वेगळेपण समजावयाला हवे. धीरेंद्र मजुमदार इतिहासाची तीन टप्यात मांडणी करतात.

१.शासनहीनता म्हणजे उत्कर्षाचे युग २. शासनमुक्त समाजाचे युग

३.शासन मुक्त म्हणजे स्वावलंबनाचे युग (मजुमदार धीरेंद्र,१९५५:२४)

धीरेंद्राच्या मते, सगळयात अगोदर शासनहीनतेचे युग येते. त्यामध्ये उत्कर्ष असतो. यानंतर शासनहीन समाजाला व्यवस्थित करण्यासाठी शासन पध्दतीचा आविष्कार होतो आणि त्याच्या संघटनांचे अर्थात शासनमुक्त समाजाचे युग येते. जेव्हा आपण शासनहीन समाजाबद्दल बोलतो, तेव्हा मानवी इतिहासामध्ये प्राचीन युगात जाणे पसंत करतो, परंतु शासन मुक्त समाजामध्ये आपण स्वतंत्र जनशक्तीचे संघटन करून शासन पध्दतीच्या आवश्यकतेचे विघटन करणे, तसेच स्वयं प्रेरित स्वावलंबी समाजाचे अधिष्ठान निर्माण करू इच्छितो. यामध्ये स्वतंत्र जनशक्तीच्या प्रेरणेने एक निश्चित प्रकारच्या समाजाची सृजन कल्पना आहे. परंतु जे अस्तित्वात असणारे राज्य आहे ते मात्र विघटीत आहे. याचे कारण असे आहे की, आपण असे ही म्हणू शकत नाही की, अमुक एका प्रकारच्या परिस्थितीमुळे राज्य स्वत:हून नष्ट होईल. असे न होता जनशक्ती आपल्या संघटन आणि सक्रियतेद्वारा शासनाच्या अत्याचारापासून स्वत:ला मुक्त करून घेईल. इतिहासात अशी दोन उदाहरणे आहेत. ज्यांच्यापासून आपण हे समजून घेऊ शकू. एक म्हणजे रोमन साम्राज्याद्वारे इंग्लंडवरचा कारभार सोडून देणे आणि दुसरा म्हणजे अमेरिकन जनतेद्वारा इंग्रजांच्या ताब्यातून स्वत:ला मुक्त करून घेणे. (मजुमदार धीरेंद्र,१९५४:८—१२)

### शासनमुक्त समाजाचे रूप :

वास्तविक पाहता संपूर्ण शासनमुक्त स्थिती ही एक आदर्श स्थिती आहे. मनुष्याला ही अवस्था तेंव्हाच प्राप्त होईल जेंव्हा तो विकासाच्या आदर्श अवस्थेपर्यंत पोहोचेल. खरे पाहता अशी स्थिती ही शेवटचीच स्थिती असते आणि या शेवटच्या स्थितीची प्राप्ती ही असीम काळाच्या शेवटी येते. म्हणूनच

महात्मा गांधी म्हणतात की, समाजाच्या सुयोग्य संतुलनासाठी आवश्यक इतकेच शासन आवश्यक असेल. फुलांची तीच माळ सुंदर मानली जाते ज्यामध्ये धागा दिसत नाही. अगदी त्याचप्रमाणे ज्या समाजजीवनात शासन संस्थेच्या अस्तित्वाचे भान राहत नाही तोच समाज शासननिरपेक्ष समाज असतो.(मजुमदार धीरेंद्र,१९५५:२६)

**शासनमुक्त समाजाची भूमिका**

धीरेंद्रांनी अहिंसक अशा शासनमुक्त समाजाच्या अनिवार्यतेविषयी चिंतन केले आहे. वास्तविक पाहता शासनमुक्त व शासनहीन समाजाची कल्पना गांधीजींच्या अगोदर मार्क्सवाद्यांनी केली होती. मार्क्सच्या कल्पनेनुसार कम्युनिस्ट पक्षाचे लोक आपल्या तत्वज्ञानात याचे एक मूळ तत्त्व म्हणून प्रचार करतात आणि शासनविरहीत तसेच सत्ताविरहीत समाजाची घोषणा तीव्रतेने करतात. त्यामुळे जेंव्हा धीरेंद्र मजुमदार शासनविरहीत समाजाविषयी विचार मांडतात तेंव्हा बऱ्याच लोकांचा असा गैरसमज होतो की, गांधीवादी कार्यकर्ते मार्क्सवाद्यांचीच प्रक्रिया तर पुन्हा राबवत नाहीत ना? त्यामुळेच काही लोकांचा आणखी एक गैरसमज होत आहे की, कम्युनिझममधून हिंसा काढून टाकली की सर्वोदय निर्माण होतो.

धीरेंद्र मजुमदार या प्रश्नांना असे उत्तर देतात की, समाज तोपर्यंत शासनमुक्त होऊ शकत नाही, जोपर्यंत त्याला शासनाची गरज वाटते. शेवटी मनुष्याला जोपर्यंत एखादया गोष्टींची आवश्यकता वाटत असते तोपर्यंत त्याच्या उपयोगापासून स्वत:ला मुक्त करण्याचा प्रयत्न करू शकत नाही. या मुलभूत सिध्दांतांच्या दृष्टीने पाहिले तर कम्युनिस्टांच्या विचारांतील दोष दिसून येतो. ते आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी एक हाती सत्तेचा वापर करणे अनिवार्य असल्याचे मानतात. तरी सुध्दा त्यांच्या मते, समाजाला कोणत्यातरी निर्णयाप्रती शासनाची अनिवार्य आवश्यकता असते. समाजाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी जर शासनाची आवश्यकता असेल तर समाजाच्या सुनियमित व्यवस्थेसाठी देखील त्याची आवश्यकता आणखी जास्त असेल. तेंव्हा वास्तविक पाहता शासन विरहीत समाजव्यवस्था तेव्हाच शक्य आहे जेव्हा स्वतंत्र तसेच

स्वावलंबी लोकशक्ती सहकाराच्या माध्यमातून सामाजिक व्यवस्था स्थापन करून समाजातून नियंत्रणालाच काढून टाकेल. थोडक्यात, नियंत्रित समाजाच्या ठिकाणी 'सहकार' समाजाची स्थापना झाली पाहिजे.(मजुमदार धीरेंद्र,२००१:९४)

**वैज्ञानिक भ्रम :**

धीरेंद्रांच्या मते, कम्युनिस्ट ही गोष्ट साध्य करण्यासाठी शासनविरहीत समाजाच्या निर्मितीसाठी दिवसेंदिवस शासनालाच व्यापक आणि बळकट करत चाललेले आहेत. लोकांच्या हातात जेंव्हा शासन जाईल तेंव्हा त्याद्वारे शासनाचाच शेवट होईल. कम्युनिस्ट याला वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणतात, कदाचित ते यासाठी असे मानत असावेत की, विज्ञानानुसार एखादया गोष्टीचा जसजसा अधिकाधिक वापर होत जातो तसतशी शेवटी ती गोष्टच संपून जाते. मात्र ते एक गोष्ट विसरतात की, ही गोष्ट एका आदर्श स्थितीत घडते आणि आदर्शाची अंतिम स्थिती ही दार्शनिक स्वरूपाची अनंतातील अंतिम अवस्था असते. थोडक्यात, आपण जर शेवटी सर्व समाज शासनमुक्त होईल अशा अपेक्षेने शासनाला उत्तरोत्तर अधिकाधिक मजबुत करीत गेलो तर ही अपेक्षा कधीच पूर्ण होणार नाही. तसेच ती कल्पना ही वास्तव नसून एक स्वप्न ठरेल. (मजुमदार धीरेंद्र,१९५५:२५—२६)

**शासनमुक्त समाज निर्मितीसाठी साध्य आणि साधन याचा विवेक :**

महात्मा गांधीजी साध्य आणि साधन यावर जोर देतात याचे हेच मुख्य कारण आहे की, जेंव्हा खोलात जाऊन विचार करतो तेंव्हा एक गोष्ट लक्षात येते आणि ती म्हणजे विरोधी साधनांद्वारे प्राप्त केलेली प्रगती ही अशक्य आहे. म्हणूनच शासनमुक्तीच्या प्राप्तीकरता शासनविरहीत स्वतंत्र अशा लोकशक्तीच्या संघटनेद्वारे शासनाच्या आवश्यकतेचा नाश हीच सर्वोदयाची साधना आहे. विनोबाजींनी देशासमोरील भूमीहीनांची समस्या सोडविण्यासाठी कायदेशीर मार्गाऐवजी स्वतंत्र जनशक्तीच्या किंवा मन परिवर्तनाच्या आधारावर जे प्रयत्न केले त्यापाठीमागे हेच खरे कारण होते. त्यांचे असे म्हणणे होते की, त्यांनी वापरलेले हे साधन म्हणजे हिंसात्मक शक्तीच्या विरोधी, दंडशक्तीपेक्षा वेगळे असे लोकशक्तीचे साधन आहे.(मिश्रा एम.के.,२०११:१०७—११२)

धीरेंद्र मजुमदार असे स्पष्ट करतात की, गांधीजींच्या साधनशुचितेचा सिध्दांत समजावून घ्यायला हवा. त्यांनी नेहमी असे सांगितले आहे की, ज्या प्रकारचे साध्य असेल, साधन देखील त्याला अनुरूप असेच असले पाहिजे. खरे पाहता क्रांतीच्या इतिहासात साधनशुचिता ही महात्मा गांधींनी दिलेली फार मोठी देणगी आहे. जर साध्य शासनविरहीत अथवा दंडविरहीत समाजाची निर्मिती असे असेल तर त्याच्या प्राप्तीसाठी जे कोणते साधन वापरावयाचे असेल त्या साधनालाही शासनविरहीत तसेच दंडविरहीत असावे लागेल. विनोबा सर्वोदयासाठी स्वतंत्र लोकशक्तीच्या वापराचा जो आग्रह धरतात त्यामागील मुख्य कारण हेच आहे.(टिळेकर इंदू,१९७८:६३—६८) लोक शक्तीचे संघटन करताना त्यांना साध्य व साधनशुचितेबद्दल पूर्णपणे प्रबोधन केले पाहिजे.

**राज्य व्यवस्थेचे सत्य :**

धीरेंद्र मजुमदार समाजात शासनसंस्थेचा अविष्कार सांगतानाच राज्य व्यवस्थेचे सत्य रूप सांगतात. ते असे म्हणतात की, जगातील सर्व शासन—संस्थांचे स्वरूप जर पाहिले तर एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते की, या सर्वाचे स्वरूप हे ‘सर्वाधिकारी’(Totalitarian) असे आहे. सर्वाधिकारी राज्याचा अर्थच असा होतो की, जनतेच्या जीवनाशी संबंधित प्रत्येक पैलूवर राज्यसंस्थेचा ताबा असणे किंवा प्रस्थापित करणे, तसेच समाजाच्या प्रत्येक समस्येचे निराकरण राज्य संस्थेने स्वतः प्रत्यक्ष करणे होय. याकरिता देशात एक अशी फार मोठी फौज उभी करावी लागेल की, जी केवळ व्यवस्था पाहण्याचे काम करेल आणि समाजातील त्यांची स्थिती अनुत्पादक उपभोगत्यासारखी असेल. समाजात ज्या प्रमाणात अनुत्पादक—उपभोक्त्यांच्या प्रमाणात वाढ होत जाईल. त्याच प्रमाणात उत्पादकांना आपल्या उत्पादनांच्या उपभोगापासून वंचित रहावे लागेल अर्थात त्याचे शोषण होत राहील.(मजुमदार धीरेंद्र,१९५४ अ:३२) धीरेंद्रा यामधूनच राज्यव्यवस्थेचे सत्य सांगतात व सर्वाधिकारी राज्यसंस्थेला विरोध करतात.

**संसदीय लोकशाही राज्यव्यवस्था :**

धीरेंद्रांनी संसदीय व्यवस्थेचा विचार करून ही व्यवस्थासुध्दा एकाधिकारशाहीकडे जाते अशा प्रकारचे निरीक्षण नोंदविले आहे. धीरेंद्रांच्या मते, वरवर पाहता असे वाटणार नाही, मात्र जर खोलवर जाऊन पाहिले तर आपल्याला हे सहज लक्षात येते की, आजकाल संसदीय लोकशाही शासनसंस्था या देखील एकाधिकारशाही होत चालल्या आहेत. संसदीय लोकशाही राज्यसंस्थेचा इतिहासच तिला एकाधिकार शाहीकडे घेऊन जात आहे. मानवाने काही कारणास्तव राज्यसंस्थांना संपवून टाकण्याचा प्रयत्न केला, मात्र जनतेच्या नियंत्रणाचे जे कार्य राजाच्या हाती होते त्याकरिता एखादया मध्यवर्ती यंत्रणेची आवश्यकता होती. त्यासाठी त्यांनी पार्लमेंटरी राज्यव्यवस्था निर्मिती केली. थोडक्यात जनतेने राज्यसंस्थेचा पूर्वीचा साचा तसाच ठेवत राजाच्या ठिकाणी आपले प्रतिनिधी नेमले. त्यामुळे साहजिकच राजाच्या तुलनेत आपण नियुक्त केलेल्या प्रतिनिधिंकडून जनतेला जास्त अपेक्षा होत्या. त्यांची अपेक्षा अशी होती की, राजा समाजाच्या जेवढया भागाची काळजी घेत होता. त्यापेक्षा लोकप्रतिनिधी हा आपला माणूस असल्याने त्याने त्यापेक्षा जास्त भागाची जबाबदारी घ्यायला हवी.(मजुमदार धीरेंद्र,१९५४अ:३२) असे विश्लेषण धीरेंद्र करतात.

संसदीय लोकशाहीमध्ये जर लोकांनी राज्याकडून जास्त अपेक्षा व्यक्त केल्या तर ही व्यवस्थासुध्दा जनतेचे जास्तीत जास्त कल्याण करण्याच्या नावाखाली आपल्या हातामध्ये जास्त अधिकार प्राप्त करून घेते व पुढे ही अवस्था एकाधिकारशाहीकडे वाटचाल करते. वास्तविक पाहता लोकशाहीच्या नावाने सध्या जगभरात चालू असलेल्या राज्यसंस्था या ‘कल्याणकारी राज्य’(Welfare State) घोषणेच्या आडून हुकूमशाहीकडेच वाटचाल करत आहेत. (मजुमदार धीरेंद्र,१९५०:११–१२) असे प्रतिपादन धीरेंद्र मजुमदार करतात.

**प्रत्यक्ष लोकशाहीचा आग्रह :**

धीरेंद्र मजुमदार या व्यावहारिक प्रश्नांसंबंधी विचार मांडतात की, अगोदर राज्यावरचे नियंत्रण हे प्रत्यक्ष जनतेचे असले पाहिजे. थोडक्यात शासन संस्थेच्या

विघटनासाठी सर्वप्रथम ही गोष्ट आवश्यक आहे की, आज जगात ज्या वैधानिक स्वरूपातील लोकशाही राज्यव्यवस्था कार्यरत आहेत, त्यांच्या जागी प्रत्यक्ष लोकशाहीची स्थापना व्हायला हवी.(मजुमदार धीरेंद्र,१९५४:३७)

धीरेंद्र मजुमदार पुढे असे म्हणतात की, आपणाला हे लक्षात घ्यायला हवे की, वैधानिक लोकशाही आणि प्रत्यक्ष लोकशाही यात नेमके काय अंतर आहे. याबाबतचे एक स्पष्ट सूत्र गांधीजींनी आपल्याला सांगितलेले आहे. ते असे म्हणतात की, व्यक्तिगत मतदानाच्या आधारावर निवडणुकीद्वारे काही लोकांना जो अधिकार प्राप्त होतो त्याला वैधानिक लोकशाही असे म्हणतात. मात्र गांधीजींनी असे सांगितले आहे की, केवळ एवढयानेच खरीखुरी लोकशाही जन्माला येत नाही. फक्त काही विशिष्ट लोकांनाच अधिकार प्राप्त झाल्याने स्वराज्य निर्माण होत नाही. तर अधिकाराचा दुरूपयोग झाल्यानंतर त्याविरूध्द आवाज उठवण्याची ताकद ज्यावेळी प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी निर्माण होते. तेव्हा खऱ्या अर्थाने स्वराज्य स्थापन झाले असे म्हणता येईल. थोडक्यात प्रत्यक्ष लोकशाहीच्या स्थापनेसाठी ही गोष्ट फार महत्त्वाची आहे (मजुमदार धीरेंद्र,१९५४:३९).

**भांडवलशाही आणि जनता :**

आज जगभरातील लोकांचा जीव हा भांडवलाशाहीच्या आधीन झालेला आहे, कारण जीवनावश्यक अशा सर्वच वस्तू व सेवांचे उत्पादन हे भांडवलशाही केंद्रीकृत अर्थरचनेच्या दबावाखाली पसरलेले आहे. आता जर सर्व लोकांचे जीवनमान जर भांडवलशाहीच्या मुठीत असेल तर याचा अर्थ असा होतो की, लोकांचे प्राण देखील भांडवलदारांच्याच ताब्यात आहेत.

अशा परिस्थितीत जर जनतेचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करायचे असेल तर धीरेंद्रांच्या मतानुसार, त्यासाठी प्रथम श्रमिक—क्रांतीद्वारे समाजव्यवस्थेत परिवर्तन करण्याची गरज आहे. म्हणजेच आज जी भांडवलशाही अर्थव्यवस्था चालू आहे. त्याऐवजी श्रमप्रधान अर्थव्यवस्था स्थापन केली पाहिजे. यासाठी भांडवल आणि उत्पादन तंत्रांची मालकी भांडवलदारांकडून श्रमिकांकडे हस्तांतरित केली गेली पाहिजे. म्हणूनच गांधीजी चरख्याला अहिंसेचे प्रतीक

मानत असत, कारण हिंसेपासून मुक्त व्हायचे असेल तर शासनमुक्ती आवश्यक आहे. तसेच शासन—मुक्ती करण्यासाठी भांडवलदारापासून सुटका करून घेणे अनिवार्य आहे आणि यासाठी 'चरखा' शासनमुक्तीचे साधन आहे. (मजुमदार धीरेंद्र, कृष्णदास गांधी १९५०:२८—३२)

**भांडवलवाद आणि मार्क्सवाद :**

धीरेंद्राच्या म्हणण्यानुसार जे लोक मार्क्सचे अनुयायी आहेत त्यांनी या गोष्टीवर विचार करावयाला हवा की, कार्ल मार्क्स यांनी एक तत्व सर्व समाजासमोर ठेवले ते असे की, आजच्या समाजाचे चित्र हे उत्पादनाच्या प्रक्रियेवर ठरेल आणि उत्पादनाची प्रक्रिया ही उत्पादनाच्या साधनांच्या स्वरूपावर ठरेल. मात्र मार्क्सच्या अनुयायांनी काही तरी नवीन निर्माण करण्याच्या वेडापायी बरोबर याच्या उलट गोष्टी केल्या व भांडवलशाहीतील गोष्टी त्यांनी जशाच्या तशा वापरल्या त्यामुळे त्यांची धडपड देखील त्याच मूळ ठिकाणी येऊन थांबली. त्यांनी उत्पादनाची प्रक्रिया आणि साधने यामध्ये कोणतेच परिवर्तन केले नाही. जे काही परिवर्तन केले ते फक्त उत्पादनाच्या उद्दिष्टांमध्येच केले. भांडवलवादी उत्पादन नफ्याच्या प्रेरणेने करत होते तिथे मार्क्सवादी उत्पादन सामाजिक गरजेकरिता करू लागले इतकाच यातील फरक होय.

विनोबा याच कारणास्तव भूदान चळवळीला अहिंसात्मक क्रांतीचा पाया म्हणून संबोधतात. भूदान चळवळीच्या माध्यमातून श्रमिक क्रांतीच्या बरोबरीनेच शासनविरहीत समाजरचनेच्या राजकीय क्रांतीच्या दिशेने जावे लागेल. विनोबांनी सांगितलेल्या शासनविरहित समाज रचनेच्या निर्मितीच्या दृष्टीकोनातून धीरेंद्र मजुमदार काही कार्यक्रम राबवू पाहत होते. त्यामध्ये भूमीप्राप्ती, भूमीवितरण किंवा त्यासंबंधीचे केंद्रीकरणावरील बहिष्कार, साधनसंपत्तीचा दान यज्ञ, ग्रामोद्योगांची स्थापना, कृषी विकास इत्यादी कार्यक्रमांसाठी गावागावांमध्ये ग्रामीण जनतेचे संघटन उभे केले पाहिजे. (देशपांडे निर्मल,१९५०:१७—२३)

अशाप्रकारे भूदान चळवळप्रणीत, ग्रामोद्योगप्रधान, अंहिंसात्मक क्रांतिद्वारे आर्थिक तसेच राजकीय क्रांतीच्या मार्गाने शासन—विरहीत समाजाच्या दिशेने ठामपणे पाऊल उचलले पाहिजे.

**राज्यव्यवस्थेचे स्वरूप व रचना :**

धीरेंद्रांनी राज्यव्यवस्थेच्या स्वरूपाबद्दल चिंतन करून राज्यव्यवस्थेची रचना सांगितली आहे. ते प्रतिनिधीत्वाबाबतही महत्वाचा विचार मांडतात. धीरेंद्र मजुमदार यांनी असे सांगितले की, आमच्यासाठी शासनविरहीत समाजाचे व्यावहारिक स्वरूप 'शासन—निरपेक्ष समाज' असे आहे. त्यामुळे शासन निरपेक्ष समाजामध्ये शासनाचे अस्तित्व हे एक मर्यादित स्वरूपात असतेच. त्याचे स्वरूप नेमके कसे असले पाहिजे याचा विचार सुध्दा धीरेंद्र मजुमदार करतात आणि ते असे म्हणतात की, यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या राज्यकारभाराची रचना बदलावी लागेल. आजकाल राजकारणाचे स्वरूप हे राष्ट्रीय केंद्रापासून वाढत वाढत ती ग्राम केंद्रापर्यंत जाते. याउलट आपल्या कर्तृत्वाची प्रेरणा ही मूलगामी अशा ग्रामीण जनतेच्या हातात सोपवायला हवी आणि त्यांना सहाय्यभूत अथवा पूरक ठरतील अशा प्रेरणा वरती—वरती म्हणजे केंद्रीय राष्ट्र पातळीकडे दिल्या पाहिजेत. थोडक्यात समाजव्यवस्था ही नियंत्रणात्मक नसावी तर ती सहकारी तत्वावर चालणारी हवी. अशा परिस्थितीत संविधान सभेच्या बैठका या दिल्लीमध्ये होणार नाहीत तर अशा बैठका या गावा—गावांत होतील आणि गावकरी निर्णय घेतील की, व्यवस्थापन आणि उत्पादनाची किती व कोणती जबाबदारी गावकरी सामुहिकरीत्या पार पाडतील. यापैकी काही विशिष्ट जबाबदाऱ्या गाव, तालुका, जिल्हा, राज्य व केंद्र स्तरावर क्रमशः टाकल्या जातील आणि त्याची अंमलबजावणी, देखरेख व पाठपुराव्यासाठी गावाच्यावतीने प्रतिनिधी पाठविण्याची व्यवस्था केली जावी असे मत धीरेंद्रांनी मांडले.(मजुमदार धीरेंद्र,१९५५:४०—४१)

धीरेंद्रांच्या मते ही ग्रामीण व्यवस्था प्रातिनिधीक असली तरी हे प्रतिनिधी गावांतून—जिल्हयाला जिल्हयातून—राज्यपातळीवर राज्यपातळीवरून केंद्रीय स्तरापर्यंत असेल. ग्रामपंचायतीवर समान प्रतिनीधित्व आवश्यक आहे, कारण शेवटी ग्रामपंचायत हीच नागरिकांना जबाबदार असते. पुढे जिल्हा समिती, पंचायतीचे विभाग, राज्यसभा, तसेच राष्ट्रीय सभा, राज्यसभेसाठी जबाबदार असते. याबाबत सिध्दांत असा आहे की, जी संस्था ज्या संस्थेप्रती जबाबदार

असेल त्या संस्थेत तिचा प्रतिनिधी असणे बंधनकारक आहे. आज जी प्रथा चालू आहे त्यानुसार पहिला प्रभावी निर्णय हा राष्ट्रीय पातळीवरील केंद्रीय व्यवस्थेद्वारे घेतला जातो. त्यामुळे केंद्रीय व्यवस्थेला मूळ नागरिकांचा प्रत्यक्ष प्रतिनिधी बनावेच लागते. त्यामुळे प्रत्यक्ष निवडणुकीची पध्दत ही क्रमप्राप्तच ठरते. थोडक्यात जुन्या आणि नव्या पध्दतीतील हा मुलभूत फरक समजावून घ्यायला हवा. (मजुमदार धीरेंद्र,१९५५:४१) असे प्रतिपादन धीरेंद्र मजुमदार करतात.

**सहकारयुक्त राजकारण :**

धीरेंद्रा विकेंद्रित राजकारणाचा पुरस्कार करतात व सहकार तत्वावरील व्यवस्थेला प्राधान्य देतात. या व्यवस्थेमध्ये भांडवलप्रधान व्यवस्थेऐवजी श्रमप्रधान व्यवस्थेला महत्व आहे व यामुळे हिंसक वृत्ती संपून सहकारवृत्ती वाढीला लागेल. यामध्ये सहकारी मानव समूहासाठी प्रत्येक प्रश्नावर सामूहिकरीत्या बहुमताने निर्णय घेणे केवळ शक्य नव्हे तर व्यावहारीक देखील ठरते. सहकाराच्या यशस्वीतेमागील हे एक मुळ कारण आहे. याठिकाणी संमती आणि सहमती या दोन शब्दांतील अंतर समजावून घेणे आवश्यक आहे. दोन व्यक्तींमध्ये 'संमती' आहे असे तेंव्हाच म्हटले जाते जेंव्हा एखादया गोष्टीबद्दल त्यांच्यात एकमत असेल, परंतु अशी देखील परिस्थिती असते की, जेंव्हा एकमत नसताना देखील एकमेकांसोबत चालण्याची वृत्ती असते अशा वेळी एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या मताला साथ देते यालाच 'सहमती' म्हणतात. या ठिकाणी एक कारण असे आहे की, आपण सर्वसंमतीने निर्णय असे न म्हणता सर्वसहमती म्हणजे बिनविरोध निर्णय असे म्हणतो.(मजुमदार धीरेंद्र,१९५५:४१) धीरेंद्राच्या म्हणण्यानुसार या व्यवस्थेलाच आपण व्यावहारिक 'शासनविरहीत समाज' म्हणून संबोधतो.

**पक्ष—विरहीत समाजाचे स्वरूप:**

पक्षाधारित राजकारणाचा पक्षप्रमुख हा आपला एकतंत्री सल्ला इतरांवर लादतो हे स्वाभाविकच आहे आणि आजकाल सर्वत्र तेच चित्र पाहायला मिळत आहे. धीरेंद्राच्या मते, खऱ्या अर्थाने लोकतंत्र स्थापन करायचे असेल तर

आपल्याला पक्षवाद सोडून जनवादाचा स्वीकार करायला हवा. पक्षांच्या बेटांवरीलमहानायकाची आवश्यकता राहणार नाही, (मजुमदार धीरेंद्र,१९५४:३०—३२) अशी धीरेंद्राची याबाबत भूमिका आहे. यामधून हळूहळू पक्षप्रमुखाचे वर्चस्व कमी होऊन पक्षामधील सदस्यांना महत्व येईल ही बाब पक्षांतर्गत लोकशाहीसाठी अत्यंत आवश्यक व महत्वाची आहे.

**समाजाचे आर्थिक स्वरूप :**

शासनविरहीत समाजव्यवस्थेत ज्याप्रमाणे सर्वसाधारण शासनाचे अस्तित्व राहतेच त्याचप्रमाणे भांडवल निरेपक्ष उत्पादन पध्द्तीत भांडवलाचे अस्तित्व राहतेच. धीरेंद्राच्या मते, ज्याप्रमाणे राजकीय रचना ही खालपासून वरपर्यंत बारीक होत होत जाते व शेवटी एका बिंदूसमान होते. अगदी त्याचप्रमाणे अर्थनैतिक रचना देखील कौटुंबिक स्वावलंबनापासून सुरू होऊन क्रमाक्रमाने विकसित होत जाईल आणि शेवटी भांडवलाचा आधार अत्यंत अल्प असा होईल अशा व्यवस्थेमध्ये उद्योगांची रचना ही तीन स्तरांमध्ये असते. गृहउद्योग, ग्रामउद्योग, राष्ट्रउद्योग ही गोष्ट जवळ जवळ गृहितच धरली पाहिजे की, भारतीय आर्थिक रचनेचा मूळ आधार हा कृषी हाच आहे. या ठिकाणी गृहउद्योग हा फावल्या वेळेमध्ये तर शेती अथवा, शेती संलग्न असा व्यवसाय हा पूर्णवेळ केला जाईल.(मजुमदार धीरेंद्र,१९५४ ब :३३)

धीरेंद्रा पुढे असे म्हणतात की, लोकशाहीच्या संरक्षणासाठी मानवाच्या मौलिक गरजांची पूर्तता स्वतंत्रपणे गृह उद्योगांच्या कक्षेमध्ये केली जावी, जर असे काही उद्योग असतील की, ज्यांची प्रक्रिया जी कुटुंबांच्या उद्योगांच्या आवाक्याबाहेर असतील त्यांचा समावेश ग्राम उद्योगांमध्ये केला जाईल. या दृष्टिकोनातून या तिन्ही उद्योगांसाठी गावाची सामुहिक शक्ती अपुरी पडते आणि ज्या उत्पादनाची समाजाच्या दृष्टिने अत्यावश्यक असणाऱ्या गरजांच्या निर्मितीची जबाबदारी राष्ट्रीय उद्योगांवर सोपवली जावी. राष्ट्रीय उद्योग, हे प्रामुख्याने दोन प्रकारचे असतात. एक म्हणजे ज्यांची आवश्यकता आहे, पण जे गावांच्या आवाक्याबाहेरील आहेत आणि दुसरे असे उद्योग की,ज्यासाठी लागणारी भौगोलिक देणगी किंवा प्राकृतिक उपलब्धता केंद्रित असेल.(मजुमदार धीरेंद्र,

१९५४ अ:२३—२४) या ठिकाणी धीरेंद्रा आर्थिक व्यवस्थेचा पाया हा कुटुंब, गृहउद्योग, ग्रामउद्योग मानतात. यामुळे भांडवलाचा संचय भांडवलदाराकडे न होता प्रत्येक कुटुंबामध्ये भांडवलाची विभागणी होईल.

**यंत्राची मर्यादा :**

यंत्राची मर्यादा व भूमिका याबद्दलही धीरेंद्रा आपले मत मांडतात.धीरेंद्राचे म्हणजे असे आहे की, ज्या यंत्रांना चालविण्यासाठी केंद्रीय शक्तीची गरज पडेल ते सर्वोदय समाजाला गृहीत धरता येणार नाहीत. केंद्राद्‌वारे उत्पादन केलेली वीज, तेल, कोळसा इत्यादी शक्तिची काही उदाहरणे आहेत. अशी अनेक यंत्रे असू शकतात की, ज्यांना चालविण्यासाठी मानवीशक्ती, प्राणीशक्ती सारख्या जैविक शक्तींची गरज असेल मात्र ज्याच्या वापराने समाजात बेकारीत वाढ होईल अशी यंत्रशक्ती सर्वोदय समाजात गृहीत धरता येत नाही.

एखादे यंत्र राजकीय लोकशाहीच्या संरचनेत समर्थपणे यशस्वी होत असले तरी भारत, चीन, जपान सारख्या देशांमध्ये ते बेकारी निर्माण करू शकते. परंतु अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, कॅनडा सारख्या देशांत ते प्रत्येक व्यक्तीला काम द्यायला सक्षम ठरेल, ज्याप्रमाणे वीज उत्पादनतंत्र आज केंद्रीय शक्तीवर अवलंबून आहे परंतु काही काळानंतर विकेंद्रित लोकशक्तीच्या बळावर तो आपले स्वतंत्र उत्पादन देखील करू शकेल. आज भारतासारख्या दाट लोकसंख्या असलेल्या देशात जिथे यंत्र बेकारीत भर घालत आहेत. तिथेच जेंव्हा कच्च्या मालाच्या उत्पादनात वाढझाल्यावर आणि उत्पादन प्रक्रियेमध्ये विकास झाल्यानंतर प्रत्येक व्यक्तीला रोजगार द्यायला सक्षम ठरेल. (मजुमदार धीरेंद्र,१९५५:४६—४७)थोडक्यात यंत्राचा वापर मर्यादीत स्वरूपात करणे आवश्यक आहे.

**जमिनीची व्यवस्था व जमीनीवरील मालकी :**

धीरेंद्रांच्या मते, संसाधनावरील मालकी ही समाजाची राहिली पाहिजे. शासनरहित समाजाची निर्मिती याचा अर्थ अव्यवस्थित समाज असा नाही तर पूर्णपणे सुव्यवस्थित समाज असा होय. साहाजिकच असा समाज हा नियंत्रित

स्वरूपाचा नसून तो सहकारी तत्वावर चालणारा असेल. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी जमिनीची व्यवस्था पुढीलप्रमाणे होणे गरजेचे आहे असे धीरेंद्र म्हणतात.

१. गावातील सर्व जमीन ही गाव समाजाची मालमत्ता असली पाहिजे.
२. ग्रामसमाज या जमिनीपैकी काही जमीन सामूहिक शेतीसाठी वेगळी ठेवेल. उरलेली जमीन ग्रामीण लोक त्याच्या कौटुंबिक तसेच व्यावसायिक विकासाकरता वापरतील.
३. सामूहिक शेती ही कुटुंबामधील श्रमदानानुसार केली जाईल आणि त्यातून मिळणाऱ्या उत्पादनाचा वापर गावाच्या सार्वजनिक सेवाकोषा करता केला जाईल. त्यातूनच श्रमप्रधान समाजव्यवस्था प्रस्थापित होईल त्याबरोबरच सामूहिक श्रमदानामुळे सहकारी वृत्ती अंगी बाणण्यास मदत होईल.
४. गावकऱ्यांच्या सामूहिक निर्णयानुसार वितरण व्यवस्थेसंदर्भात वेळोवेळी विचार–विनिमय करता येईल.(मजुमदार धीरेंद्र,१९५५:४७)

**उत्पादन आणि शिक्षण :**

धीरेंद्र उत्पादनाची प्रक्रिया ही शिक्षणाबरोबर जोडतात. शिक्षणामुळे लोक उत्पादन साधने, प्रक्रिया व वितरक हे सद्सदविवेक बुध्दीने करतील.

उत्पादनाशी संबंधित सर्व कार्यक्रम हे शिक्षणाच्या माध्यमातून राबवायचे असतील तर ग्राम–उद्योग व राष्ट्र–उद्योगांतील सर्व कार्यक्रम हे वेगवेगळया शैक्षणिक स्तरावर राबवावे लागतील. मग आज केंद्रीय उद्योगांच्या स्वरूपात जे मूलभूत उद्योग राष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहेत त्यांना विद्यापीठांमध्ये समाविष्ट करावे लागेल आणि जे संचालक, व्यवस्थापक, विशेषतज्ञ तसेच कामगार इत्यादी विविध स्वरूपात काम करणारे वर्ग दिसत आहेत त्यांच्याजागी त्या केंद्रातील उत्पादक–श्रमिक जनता आपल्याला पहायला मिळेल. त्यापैकी काही जण हे प्राध्यापक आणि विद्यार्थी देखील असणार आहेत. हे सर्व या व्यवस्थेत विद्यार्थीच असतील आणि ते सर्व मिळून उत्पादन प्रक्रियेच्या माध्यमातून ज्ञान–विज्ञान प्राप्त करतील. (मजुमदार धीरेंद्र,१९५४ अ:५०–५३) थोडक्यात शिक्षणामुळे मानव विचाराने समृध्द झाला की तो आपोआप आपल्याबरोबर

दुसऱ्याच्या जगण्याचा विचार करेल. त्याची मानसिक प्रवृत्ती ही एकाधिकारशाही, हिंसा, संचयवृत्ती या विरोधात काम करेल असे धीरेंद्रांना वाटते.

**शासनविरहित समाजाचे स्वरूप :**

शासन विरहित समाजरचना स्थापन करून सर्वांची उन्नती करणे हा धीरेंद्रांच्या विचारांचा गाभा आहे. शासनविरहित समाज कशाप्रकारे अस्तित्वात येईल याविषयी ते आपले विचार सूक्ष्मपणे मांडतात. धीरेंद्रांच्या मते, वास्तविक पाहता ही काही नवीन कल्पना नाही. ईसा चे पृथ्वी वरील स्वर्गीय राज्य, कार्ल मार्क्सची 'वर्गविरहीत समाज', प्रिंन्स क्रोपोटकीन यांचा 'अराज्यवाद' इत्यादी सर्व संकल्पना या एकाच वस्तूंची विविध रूपे आहेत. 'भूदानप्रणीत—ग्रामोद्योगप्रधान—अहिंसक—क्रांती' या विनोबांच्या छोटयाशा सूत्रात शासन विरहीत समाज रचनेच्या व्यावहारिक क्रांतिसाठीच्या मार्गाचे संपूर्ण दिशानिर्देशन केलेले आहे. (मजुमदार धीरेंद्र,१९५५:५२—५४)

धीरेंद्रांच्या मते, आपल्याला जर शोषणमुक्त समाजासाठी शोषितांची मदत करायची असेल तर सर्वप्रथम शोषण व्यवस्थेप्रती शोषितांची गरज संपली पाहिजे.(मजुमदार धीरेंद्र,१९५५:५४)

धीरेंद्रांच्या मते, शासनविरहीत किंवा शासननिरपेक्ष समाजात शासनाचे अवशेष हे थोडयाबहुत प्रमाणात राहणारच तसेच त्याची ताकद आणि स्थान गौण असेल, लोकशक्तीला मुख्य स्थान असेल. पण ही लोकशक्ती खऱ्या अर्थाने तेंव्हाच जिवंत असेल जेंव्हा तिला तितक्याच ताकदीचे सक्रीय नेतृत्व लाभेल. शासन विरहीत समाजामध्ये खालीलप्रमाणे व्यवस्था असेल.

१. लोकनेता २. लोकशक्ती आणि लोकमत ३. लोक प्रतिनीधी लोकनेता ही संस्थात्मक व्यवस्था लोकशक्तीची निर्मिती करेल.

थोडक्यात या क्रांतीकार्यातील फक्त 'संस्थात्मक' रचनेलाच संपुष्टात आणणार नसून ते स्वत: देखील कार्यमुक्त होऊन लोकशक्तीच्या क्षमतेवर

विश्वास ठेवून त्यात समाविष्ट होण्याचा प्रयत्न करतील. धीरेंद्राचा हा विचार दलाल मुक्ती करून सर्वांना श्रमाद्वारे सेवक वर्ग निर्माण करणे हा आहे.

**लोकशाही शासनासाठी रचनात्मक बदल :**

स्वतंत्र लोकशाहीच्या विकासासाठी ग्रामीण समाजाच्या संघटनेचा प्रयत्न करावा लागेल. जेंव्हा आर्थिक संरचनेच्या बाबतीत फार मोठया—मोठया क्षेत्रांमध्ये जेंव्हा अशा प्रकारची लोकशक्ती निर्माण होईल तेंव्हा पुढील योजनेद्वारे शासनाच्या विघटनाची प्रक्रिया चालू होईल. त्यावेळी ग्रामसमितीद्वारे चाललेली संघटना एकमेकांच्या सहकार्य आणि विचारांतून शासनाकडून अपेक्षित असणाऱ्या मदतीची यादी तयार करतील आणि यापैकी कोणकोणत्या गोष्टींची जबाबदारी ते स्वत: पार पाडू शकतील याचाही ते एकमताने निर्णय घेतील. धीरेंद्रांच्या मते, लोकशाहीसाठी रचनात्मक बदल करणे आवश्यक आहे.(मजुमदार धीरेंद्र,१९५५:५७)

संस्थेच्या कार्यकर्त्यांना संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर पडून प्रत्यक्ष लोकशक्तीच्या आधारे चळवळीचे संघटन करावे लागेल. संस्थांच्या मूळ स्वरूपातच अमूलाग्र परिवर्तन करण्यासाठी काही महत्त्वपूर्ण पाऊले उचलावी लागतील अशी धीरेंद्र मजुमदारंची धारणा होती.

**चतुर्भुज राक्षस आणि वर्गविहीन समाज व्यवस्था :**

'स्वराज्य' हे गांधीना अभिप्रेत क्रांतीकारी समाजव्यवस्थेचे नाव होते असे धीरेंद्रा म्हणत. कोणत्याही प्रकारच्या सरकारी नियंत्रणापासून सामाजिक जीवन उत्तरोत्तर अधिकाधिक मुक्त होत जाणे हाच स्वराज्याचा अर्थ आहे असेही ते मानीत. अहिंसक समाजाची निर्मिती हे याच अवस्थेचे दुसरे नाव होते. या समाजाच्या निर्मितीसाठी वेगळया स्वरूपाच्या संघटनेची आणि क्रांतितंत्राची गरज असेल हे गांधीनी जाणले होते. स्वतंत्र भारताने देखील केंद्रीय शासनतंत्राचा आणि व्यवस्थेचा अवलंब केला. त्याला देशातील भांडवलदार वर्गाला अनुकूल अशा अवजड उद्योगप्रधान, केंद्रित अर्थव्यवस्थेची जोड मिळाली. याचे परिणाम किती भयानक होवू शकतात त्याचे अत्यंत प्रत्ययकारी आणि विदारक असे

वर्णन धीरेंदानी खालील शब्दात केले आहे. ''ग्रामीण जनता जर आर्थिक आणि राजकीय दृष्टया आत्मनिर्भर झाली नाही तर आज जे स्वातंत्र्य मिळाले आहे ते त्या जनतेच्या मुक्तीचे साधन न राहता तिच्या शोषणाचे आणि यातनांचे कारण ठरेल. इंग्रज तर निघून गेले, पण त्यांनी आपली राज्यकारभाराची पध्दत येथेच ठेवून दिली आहे आणि त्यांचे दलाल या नात्याने गावागावतून नेतागिरी प्रस्थापित केली आहे. स्वदेशी भांडवलशाहीच्या व्दारे आलेली विदेशी भांडवलशाही, नोकरशाही आणि गावातून पसरलेले नेतागण यांच्या त्रिकुटाच्या साहयाने इंग्रज तर आमच्या सारख्या देशभक्तांना सुध्दा विकत घेईल. अशारीतीने देशात एका चार हात असलेल्या राक्षसाच्या जन्म होईल. त्याचा एक हात म्हणजे दोन तोंडे असलेली भांडवलशाही, दुसरा हात म्हणजे नोकरशाही, तिसरा दंड म्हणजे गावातील दलाल आणि चवथी भुजा म्हणजे विकत घेतलेले देशभक्त. हा चारहाती राक्षस आपल्या चारही हातांनी जनतेला अक्षरशः भरडून टाकल्याशिवाय राहणार नाही.''(मजुमदार धीरेंद्र,१९५४ अ:३४)धीरेंदांची ही भविष्यवाणी आज शब्दशः खरी ठरली आहे. या चतुर्भुज राक्षसाच्या मगरमिठीतून जनतेला मुक्त करणे हेच क्रांतिकारी पुरूषार्थासमोरचे आव्हान आहे.

**शोषणाचे प्रकार :**

धीरेंद्राच्या मतानुसार वर्ग—विषमतेचा हा प्रश्न काही स्वतंत्र स्वरूपाचा नाही. तर राजकीय व आर्थिक केंद्रीकरणातून निर्माण झालेला प्रश्न आहे. श्रमिकांकडून उत्पादनाची निर्मिती मोठया कष्टाने केली जाते आणि मालक लोक त्याचे नियंत्रण आणि व्यवस्थापन करण्याच्या युक्तीने त्याचा उपभोग घेतात आणि कामगार पोटावर हात ठेऊन आक्रोश करत राहतात(मजुमदार धीरेंद्र,१९५५:६२—६३) धीरेंद्र पुढे असे म्हणतात की, प्राचीन समाजात आणखी एका विकृतीचा जन्म झाला ती म्हणजे श्रमाऐवजी भांडवलाचा वापर केला गेला आणि त्यातूनच भांडवलाची निर्मिती, त्याचे संचालन व व्यवस्थापन, उत्पादनाची पध्दती आणि तंत्रे यावर नियंत्रण करण्याच्या उद्देशाने जो आणखी एक वर्ग तयार झाला त्याचीच पुढे एक विराट फौज निर्माण झाली. आज या दोन्ही

वर्गांच्या दबावाखाली श्रमिक वर्ग इतका दबला गेलेला आहे की, तो मरणे पसंत करतो. (मजुमदार धीरेंद्र,१९५५:६४) धीरेंद्र मजुमदार वर्गविषमतेचा ऐतिहासिक दाखला देतात आणि पुढे ते असे म्हणतात की, सध्याच्या परिस्थितीत शिक्षण पध्दतीतील दोषामुळे सुशिक्षित समाजातील लोकांकडून काही कारणास्तव कुठल्याच प्रकारचे उत्पादक काम न केले गेल्याने त्यापैकी जे काही लोक व्यवस्थापन तसेच वितरणाच्या क्षेत्रात काम करत नाहीत ते सुध्दा कोणत्या ना कोणत्या प्रकारे कामगारांच्याच खांदयावर बोजा बनून राहतात. थोडक्यात आजकालची शाळा आणि महाविद्यालये ही 'मालक' वर्गाची निर्मिती करणारे कारखाने झालेले आहेत. सर्व जगच वर्गीय—विषमतेच्या आगीत भस्मसात व्हायला तयार आहे. अशा वेळी आवश्यकता या गोष्टीची आहे की, तत्काळ आणि लगेचच एका महान अशा क्रांतिद्वारे पूर्णपणे एकवर्गीय समाज कायमस्वरूपी स्थापन झाला पाहिजे. (मजुमदार धीरेंद्र,१९५४ब:३९—४०) थोडक्यात, मालक वर्गाच्या अस्तानंतर श्रमिक वर्गांचाच एक 'अद्वैतवादी' समाज निर्माण होणे अभिप्रेत आहे.

**क्रांतीची व उच्चाटनाची प्रक्रिया :**

धीरेंद्रांनी वर्गविहीन समाजनिर्मितीसाठी अहिंसक क्रांतीचा पुरस्कार केला आहे. धीरेंद्रांनी क्रांतीच्या मुख्य दोन प्रक्रिया सांगितल्या आहेत. धीरेंद्रांच्या मते, यासाठी दोनच पध्दती असू शकतात. एक म्हणजे वर्ग—संघर्षाचा हिंसात्मक मार्ग आणि दुसरा म्हणजे वर्ग—परिवर्तनाचा अहिंसात्मक क्रांतीचा मार्ग, यापैकी एक उपाय विध्वसंक आहे तर दुसरा क्रांतीकारी आहे. पहिल्या मार्गाने गेलो तर श्रमिकांद्वारे मालक वर्गाचे उच्चाटन होईल आणि दुसऱ्या मार्गाने मालक हे श्रमिक बनून उत्पादन कार्याचा घटक होतील. आपण रशियामधील हा फसलेला प्रयोग पाहिलेला आहे. तिथे विध्वसंक मार्गाचा अवलंब करून देखील मालक वर्ग आपल्या स्थानावर असावा तसा आहे. श्रमिक वर्ग फक्त त्याचा दंड पकडू शकले त्यांची शरीरे मात्र तशीच राज्यसत्तेत घट्ट राहीली. भांडवलशाहीचा नाश तर झालाच नाही. पण तिथे इतकी जबरदस्त व्यवस्थापकीय राज्यव्यवस्था निर्माण झाली की, या व्यवस्थेच्या नावलौकिकामुळे 'मालक' वर्गाचे प्रस्थ

पहिल्यापेक्षा पुन्हा इतके वाढले की, श्रमिक वर्ग त्या दबावाखाली आणखी जास्त दडपला गेला. एक वेळी भांडवलदारांचा दंड पकडलेली जनता आता एका बलाढय संघटनेच्या मुठीत घट्ट पकडली गेली(मजुमदार धीरेंद्र,१९५४ ब:४१) असे धीरेंद्र मजुमदारांचे मत होते.

धीरेंद्राच्या मते, उच्चाटनाची प्रक्रिया ही हिंसात्मक प्रकारची असते. त्यामुळे या मार्गाच्या वापराने वर निर्देशित केल्याप्रमाणे फक्त तत्कालीन व्यावहारिक संकटच निर्माण होणार नाही तर मानवी समाजात एक कायमस्वरूपी प्रश्न निर्माण होईल. धीरेंद्रांच्या मते, हिंसेने हिंसेचा शेवट होऊ शकतो का? जे लोक असा विचार करतात ते विज्ञानाला विसरत आहेत. कारण विज्ञान असे सांगते की, प्रत्येक क्रियेची एक समान प्रतिक्रिया असते आणि या क्रिया—प्रतिक्रियांचा वार—प्रतिवार हा अनंत काळापर्यंत चालूच असतो. शेवटी हिंसेची जर क्रिया झाली तर त्याची प्रतिक्रिया ही प्रतिहिंसा हीच असणार आणि जर हिंसा—प्रतिहिंसेचा हा वार—प्रतिवार असाच अनादी काळापर्यंत सुरू राहीला तर मग कोणत्या काळात जगामध्ये हिंसा नष्ट होऊन त्याठिकाणी पूर्णपणे शांतीची प्रस्थापना होईल.(मजुमदार धीरेंद्र,१९५५:६२—६३) म्हणूनच गांधीजी आपल्या सर्वांना वर्ग—विरहीत अशा समाजरचनेसाठी अहिंसात्मक क्रांती करण्याची गरज वारंवार सांगत आले आहेत.

धीरेंद्रांच्या मते मनामधून 'मालक' असण्याची बीजे नष्ट केली पाहिजेत ही उच्चाटनाची प्रक्रिया श्रमिक वर्गाच्या भूमिकेत जाऊन सुरू केली पाहिजे. धीरेंद्रांचे स्वीय सहायक श्री. अमरनाथभाई हे त्यांच्या मुलाखतीमध्ये असे म्हणतात, ''हुजूर को मजूर बनाना है! इसका फर्क मिटाना है।'' याचा अर्थ अमरनाथभाई यांच्या मते, धीरेंद्रांना बुध्दिमत्तेवर आधारित काम करणारे व श्रमावर आधारीत काम करणारे यांच्यातील फरक संपवायचा होता त्यादृष्टीने ते सातत्याने प्रयत्न करीत होते.

**शिक्षण व्यवस्थेमधील क्रांती :**

धीरेंद्रा वर्ग परिवर्तनाच्या कार्यक्रमासाठी श्रमावर आधारित शिक्षण व्यवस्थेचा पुरस्कार करतात. गांधीजींच्या शिक्षण पध्दतीमधील श्रमप्रतिष्ठेला ते

जास्त महत्व देतात. सध्या शिक्षणासाठीचे जे अधिकारी किंवा कारकुन बनविणारे जे कारखाने आहेत. ते पहिल्यांदा बंद केले पाहिजेत आणि सर्व शिक्षण पध्दती ही उत्पादनप्रक्रियेच्या माध्यमातून शारीरिक श्रमावर चालणारी असली पाहिजे. (मजुमदार धीरेंद्र,१९५४ अ : ६० —६२)

मालक वर्गाने स्वत:च श्रमिक बनून नेतृत्व परिवर्तनाचा उद्‌देश साध्य करायला हवा. शोषणाच्या प्रक्रियेलाच असहकार पुकारण्याचे आंदोलन सुरू केले पाहिजे. अन्यथा वर्गहीन समाजाची कल्पना ही कोऱ्या कागदाप्रमाणेच राहून जाईल. (मजुमदार धीरेंद्र,१९५४ अ :६२) बुनियादी शिक्षण व्यवस्थेमुळे मनुष्य श्रमप्रतिष्ठेचा आदर करेल व परिवर्तन चळवळ जास्त जोरदारपणे सुरू होईल असे धीरेंद्रांना वाटते.

**भूदान आणि वर्ग परिवर्तन :**

संत विनोबांनी पुरस्कृत केलेल्या भू—दान यज्ञ वर्गपरिवर्तनाद्‌वारे ते ज्या लोकांनी जमिनीवर श्रम करून स्वत: उत्पादनकार्य केलेले आहे त्यांनाच त्याचा लाभ झाला पाहिजे. ही गोष्ट साध्य करू पाहतात. धीरेंद्रांच्या मते, या सिध्दांतानुसार त्यांचा असा देखील प्रयत्न आहे की, जमीनदार वर्गाने आपल्या जमीनीवर स्वत: श्रम करून उत्पादनकार्यात प्रत्यक्ष आणि सक्रीय सहभागी होऊन आपल्या श्रमिक वर्गात विलीन करून घ्यावे. भूमी दान यज्ञाचा मूळ उद्देशच हा आहे की, ज्याच्या मालकीची पुष्कळ जमीन आहे त्यांनी त्या जमिनीपैकी जेवढया भागावर ते स्वत: शारीरिक कष्ट करून उत्पादन घेऊ शकतील तेवढीच जमीन स्वत:कडे ठेवावी आणि उरलेली जमीन ही ज्यांच्याकडे जमिनच नाही पण ते प्रत्यक्ष त्या जमिनीवर कष्ट करून उत्पादन घेतात त्यांना दान करावी.(मजुमदार धीरेंद्र,१९५५:७१)

धीरेंद्रांचे असे मत आहे की, भांडवलशाहीचे हे संकट आता इतक्या परकोटीच्या टोकाला जाऊन पोहोचले आहे की, मालक वर्गाच्या दमनशाहीने श्रमिक आता मरू लागले आहेत आणि फार मोठया प्रमाणावर मालक वर्गाची संख्या वाढल्याने पोषण आणि मानसिक स्वास्थाच्या अभावाने मालक वर्ग कुपोषणाने मरू लागला आहे. मालक वर्गाने त्यांची ही दिशा, घृणा, द्वेष आणि

तिरस्काराने नाकरली तर ते देशाला, जगाला आणि त्यांच्याबरोबरच स्वत:ला देखील ज्वालामुखीच्या तोंडावर ढकलतील.(मजुमदार धीरेंद्र,१९५५:७१)

धीरेंद्रांना फक्त अशी आशाच नाही तर पुरेपुर खात्रीच आहे की, भारतीय तरूण आपली क्षमता आणि शौर्याच्या जोरावर या आव्हानाला असेच वाया न जाऊ देता संत विनोबाजीप्रणीत अहिंसक क्रांतीमध्ये हजारोंच्या संख्येने आपली आहुती देऊन आपल्या पिढीचा मान आणि बाणा यांचे रक्षण करतील.

**धीरेंदांचे क्रांतीविषयक विचार :**

क्रांतीबद्दल धीरेंद्रांनी सखोल चिंतन केले आहे. क्रांतीची व्याख्या अशी केली जाते की, समाजात रूढझालेल्या प्रथांना बदलण्यासाठी करावा लागणारा विद्रोह म्हणजे क्रांती होय. तर मानवातील आत्मदर्शन म्हणजे भक्ती होय. क्रांतीमध्ये भक्ती आणि क्रांती या दोन्हींचे मिश्रण असणे गरजेचे असते. कारण त्यामध्ये जर विद्रोहाची आकांक्षा नसेल तर ती समाजाला संघर्षासाठी तयार करू शकत नाही आणि जर त्यामध्ये भक्ती नसेल तर ती क्रांती स्वत: शोषक बनेल.

धीरेंद्रांच्या म्हणण्यानुसार, क्रांतीच्या गर्भातून विविध शक्तींचा जन्म होतो. त्यांनाच क्रांतीकाळातील तत्वे असे म्हणतात. या तत्वामध्ये क्रांतीचे संघटनात्मक तत्व, क्रांतीचे विघटनकारी तत्व, क्रांतीचे शोषणकारी तत्व यांचा समावेश होतो. (नरेंद्रभाई (संपा.), १९८१:५—६)

**क्रांतीकारींसाठी इशारा :**

धीरेंदा क्रांतीकारीसाठी पुढीलप्रमाणे इशारा देतात.

१. क्रांतीला आत्मबलीदान अपेक्षित असते.
२. क्रांतीमध्ये वेगवेगळया व्यक्तींना आणि स्वभावांना एकत्र यावे लागते मात्र त्यात वेगवेगळया आकांक्षाना स्थान नसते.
३. जेव्हा क्रांतीकारी क्रांतीच्या व्युहरचनेत स्वत:चे स्थान शोधत असतो तेव्हा त्यांचे प्रेरक तत्व नष्ट होते. त्याचे काम हे सामाजिक मान्यतेच्या फार पुढे असते. पाठीमागे वळून पाहणे हे त्याचे काम नसते.

४. अहिंसेच्या पोटामध्ये जेव्हा भिती निर्माण होते, तेव्हा अहिंसेच्या प्रक्रियेवरचा जनतेचा विश्वासच उडून जातो. तेंव्हा त्याला मजबुरीतून क्रांतीच्या हिंसात्मक रूपाचा स्वीकार करावा लागतो.

५. ज्या क्रांतीने नवीन अपत्य, नवीन संघटना निर्माण केली नाही ती नपुसंक आहे या जगात ती यशस्वी होऊ शकत नाही.(नरेंद्रभाई (संपा),१९८१:६)

**क्रांतीच्या विचाराचे बीजारोपण :**

क्रांती ही एखादी घटना नसते. तर ती नवोपक्रमाची प्रक्रिया असते. सर्वच क्रांतीकारक त्याची पुनरावृत्ती करताना अजिबात थकत नाहीत. धीरेंद्रांच्या मते, क्रांतीचा अर्थ आहे की, पारंपरिक पध्दती, संस्था आणि रूढी यांमध्ये अमुलाग्र परिवर्तन, थोडक्यात वैचारिक परिवर्तन, परिस्थितीमधील परिवर्तन आणि हदय परितर्वनाची प्रक्रिया आहे.

**युध्द आणि क्रांती :**

वास्तविक पाहता बऱ्याचदा युध्द, उठाव, विद्रोह इत्यादींनाच क्रांतीची संज्ञा दिली जाते. इतिहासात युध्द, उठाव, विद्रोह यांनाच क्रांती म्हणून संबोधण्यात आलेले आहे.धीरेंद्रांच्या मते, भारतात स्वातंत्र्यासाठी जे आंदोलन झाले ते क्रांती नव्हते, तर ते एक युध्द होते कारण त्याचे ध्येय इंग्रजांच्या हातातून सत्ता काढून घेणे हे होते. क्रांतीकरिता युध्द, उठाव, विद्रोह यापैकी केव्हा काय करायला हवे याची जाण क्रांतीकारकांना असणे गरजेचे आहे. फ्रान्समध्ये जे आंदोलन झाले ते वास्तवात राजसत्तेपासून होणाऱ्या अत्याचारापासून मुक्त होण्याकरता आणि तो सामंतशाही ताकदीपासून भांडवलशाही ताकदींकडे होणाऱ्या सत्तेच्या हस्तांतरणासाठीचा संघर्ष होता. तसेच त्यापाठीमागे राज्यसत्तेच्या जागी लोकशाहीच्या स्थापनेचाही विचार होता. (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:८)

राजनीतीच्या जागी लोकनीतीच्या स्थापनेविषयीच्या गांधी विचारांना साकार करण्याचे हे एक क्रांतीकारी आंदोलन आहे. (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:९)

क्रांतीच्या ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी मध्येच उठाव, विद्रोह, युध्द किंवा सत्याग्रह इ. काही करावे लागले तर त्याला क्रांती म्हणता येणार नाही. परंतु त्याची व्यूहरचना ही क्रांतीच्या विचारांशी समन्वय साधणारीच असली पाहिजे. जेणेकरून विद्रोह, उठाव, सत्याग्रह यामुळे जे यश मिळेल, त्यामुळे क्रांतीचाच विचार सशक्त बनेल.(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:९)

**क्रांतीची इच्छा जनतेमध्ये असणे आवश्यक :**

धीरेंद्रांच्या मते, क्रांतीच्या पध्दतीसाठी एक गोष्ट गरजेची असते की, क्रांतीची ईच्छा ही सर्वसामान्य माणसांच्या मनामध्ये असली पाहिजे, कारण त्यातून त्यांनाच मुक्ती मिळणार. बाहेरून येणाऱ्यांना नाही, बाहेरचे त्यांना प्रेरणा देवू शकतात, मात्र ते त्यांच्याकडून क्रांती घडवू शकत नाहीत. जोपर्यंत सामान्य लोक तयार होत नाहीत तोपर्यंत वाट पहावीच लागेल. याच वाट पाहण्याला बीज पेरल्यानंतर अंकुर फुटेपर्यंतच्या वेळेची उपमा दिलेली आहे. धीरेंद्रांच्या मतानुसार क्रांतीच्या बीजाचे अंकुरण होण्याची वाट पाहणे याचा अर्थ असा आहे की, जोपर्यंत सर्व लोकांमध्ये परिवर्तन या पर्यायाची ईच्छा उत्पन्न होत नाही तोपर्यंत वाट पाहिली पाहिजे.

**प्रतिक्रांतीकारी शक्ती :**

धीरेंद्रा प्रतिक्रांतीबाबतही आपले विचार व्यक्त करतात. क्रांतिकारी तत्वे कमकुवत होत जातात तेव्हा समाजात प्रतिक्रांतीकारी तत्वे आपल्याला मजबूत पायावर प्रतिष्ठित करतात. याच ठिकाणी अहिंसक क्रांतीकारीच्या जुन्या संस्कारांच्याही पुढे जाऊन नव्या क्रांतीचे नवे विचार, नवी पध्दती यांचा अमुलाग्र विचार व्हायला हवा. इतिहासातील प्रत्येक क्रांतीमध्ये असा एक टप्पा येतो की, जिथे दोन पक्षांची निर्मिती होते. त्यांना दक्षिणपंथी म्हणजे उजव्या विचारसरणीचे तसेच डाव्या विचारसरणीचे वामपंथी असे म्हणतात. बहुतेक करून दक्षिणपंथीयांमध्ये जास्त करून अलिकडची पहिलीच पिढी असते आणि नव्या पिढीतले क्रांतीकारी वामपंथी आहेत. तसेही काही तरूण युवा पिढीतील काही तरूण दक्षिण पंथीयांत सामील झाले होते आणि काही जुने वृध्द लोकही वामपंथात असतात. धीरेंद्रांच्या मते, सामान्यपणे दोघांचे विभाजन पुढीलप्रमाणे

होते. हिंसक क्रांतीच्या स्वाभाविक प्रक्रियेमध्ये दोन पक्ष तयार होतात. ते एकमेकांचा विरोध करतात. एवढेच नव्हे तर ते जवळ जवळ एकमेकांचे शत्रू बनतात. प्रतिक्रांतीकारी तत्वे याचाच फायदा घेऊन स्वत:ला प्रतिष्ठित करतात. अहिंसक क्रांतीचे पुजारी सर्वोदय विचार क्रांतीवाल्या मित्रांना या टप्प्यावर खूप सावध राहिले पाहिजे. क्रांतीकारकांच्या संपूर्ण शक्तीचा विकास होईल आणि प्रतिक्रांतीकारी शक्तींना त्यामध्ये घुसण्याची संधी मिळणार नाही.(नरेंद्रभाई (संपा.) १९८१:१२)

सर्वोदय वैचारिक क्रांतीनुसार हिंसेचा विरोध करण्याची मागणी खूप जोरात पुढे येऊ लागते आणि त्याकरीता एक गोष्ट आवश्यक असते ती म्हणजे ज्या मन:स्थितीमुळे हिंसात्मक उद्रेकांची लक्षणे दिसू लागली आहेत. अशा मनस्थितीला शांती तसेच एकात्मता तसेच सुशासनाकडे वळवून त्या नव्या हिंसा विरोधी लोकशक्तीद्वारे हिंसेचा मुकाबला केला पाहिजे. आवश्यकता पडल्यास राज्यसत्तेला बदलण्याची मागणी लोकशक्तीद्वारे करणे देखील योग्य मानले जावू शकते. (मजुमदार धीरेंद्र, २०११:१९९—२०२)क्रांतीच्या भविष्याच्या दृष्टिने हे पाऊल हेच प्रतिक्रांतीकारी शक्तींचा मुकाबला करू शकेल असे धीरेंद्रांचे मत होते.

क्रांती ही एक चढाई आहे आणि त्याचे स्वरूप सापासारखे आहे. ती नेहमी कात टाकत असते. जुनी कातडी जेव्हा आवळू लागते तेव्हा साप ती टाकून नवी कातडी परिधान करून वाढू लागतो. जेव्हा समाजामध्ये उलथापालथ घडून येते. तेव्हा धीरेंद्र मजुमदार यांच्या मतानुसार हे समजून घ्यायला हवे की, ही उलथापालथ अप्रत्यक्षपणे नवी कातडी परिधान करण्यासारखे आहे.

**क्रांती पर्यायाचा शोध :**

धीरेंद्रांच्या मते, अशा मनस्थितीमध्ये हे साहजिकच आहे की, जग कुठल्यातरी रचनात्मक पर्यायाचा शोध घेत आहे. या शोधाबाबत गांधीजींनी जे प्रयत्न केले आहेत त्याच्या आधारावर काही प्रमाणात पुढे जाता येईल. गांधी मंत्राच्या आधारावर ग्राम स्वराज्याचे जे चित्र प्रस्तुत केलेले आहे ती जगामधील एक मौलिक आणि महत्वपूर्ण, दूरगामी देणगी आहे असे आपण समजू शकतो.

गांधींचा पर्याय संपूर्ण जगाने स्वीकारलेला आहे असेही आपण म्हणू शकत नाही. कारण बहुतेक गांधीच्या विचारांचा क्रांतीकारी पैलूला जगाने समजावून घेतले नाही. गांधींना जगातल्या लोकांनी अनेक पैलूंमध्ये पाहिले आहे. धीरेंद्रांच्या मतानुसार सर्वसाधारणपणे गांधीची तीन रूपे आहेत.(नरेंद्रभाई (संपा.) १९८१:१६)

१. गांधी : महात्म्याच्या रूपात, २. गांधी : विद्रोहाच्या रूपात, ३. गांधी : क्रांतिकारकांच्या रूपात. गांधीजींच्या या तिन्ही रूपांमध्ये सर्वात जास्त महात्मा तसेच विद्रोही गांधीजींना सर्वजण ओळखतात. मात्र जगाने क्रांतीकारी गांधींना ओळखायचा प्रयत्नच केला नाही.

यामध्ये क्रांतीकारी गांधी म्हणाले होते की,'ग्रामस्वराज्याच्या परिकल्पनेमध्ये क्रांतीची शक्ती सुसंमतीची शक्ती आणि पध्दती सहकार यांची असेल' ग्रामस्वराज्यातून स्वावलंबी समाजाची निर्मीती होईल. (नरेंद्रभाई (संपा.) १९८१:१६)

**लोक क्रांती यात्रा :**

धीरेंद्रा लोकक्रांतीचा आग्रह धरतात. ग्रामस्वराज्याचा विचार आणि योजना यांनी त्या दिशेने मार्ग दाखवला जात आहे. धीरेंद्रांच्या मतानुसार या मार्गाच्या दिशेने लोक क्रांती यात्रा करावी लागणार आहे हाच विचार लोक क्रांतीचा पाया बनेल. धीरेंद्रांच्या मते, जगामध्ये लोक क्रांती करीता काही महत्वपूर्ण माहिती असणे गरजेचे आहे. क्रांती हिंसक असो वा अहिंसक त्यासाठी जन आंदोलनाची गरज असते. क्रांतीकारी समुदाय जे आंदोलन करतात ते क्रांती नाही. दंड शक्ती आणि हिंसेच्या विरोधातील एक लक्ष्य म्हणजे ग्रामस्वराज्य होय. तोच त्याचा मुळ पाया आहे. भूदान आणि ग्रामदान याद्वारे सरकारविरहित लोकशक्तीची कल्पना साकारता आली आहे. त्यामुळेच तो दंडशक्तीविरहित, लोक शक्तीचा कार्यक्रम आहे. जरी यामध्ये पूर्णपणे दंडशक्ती विरहित मार्ग निर्माण करू शकलेला नाही. तरीही तो त्याच दिशेने योग्य प्रयत्न होता. हिंसा शक्तीच्या विरोधी शक्तीच्या रूपामध्ये लोकशक्ती उभी करण्याचा मार्ग ग्रामस्वराज्य आंदोलनात मिळून एक निश्चित दिशा मिळेल.

लोकस्वराज्याच्या स्थापनेसाठी नागरिक शक्ती आणि सैन्य शक्तीचा संघर्ष अनिवार्य असतो. ज्यामुळे या संघर्षामध्ये नागरी शक्तीचे सैन्यशक्तीवर नेहमी प्रभुत्व पाहिजे.(नरेंद्रभाई (संपा.) १९८१:१६–१७) सैन्य शक्तीच्या सोबत संघर्षासाठी आपली सहकार शक्ती प्रशिक्षित लोकांनी एकत्रित करावी या प्रयत्नातून लोकआंदोलनाची पायाभरणी होईल असे धीरेंद्रांचे मत होते.

जगातील महान क्रांतीकारांनी फक्त राज्य परिवर्तनालाच क्रांती मानले नसून त्यांच्या दृष्टिने मूल्यात्मक परिवर्तन म्हणजे क्रांती होय. तरीसुध्दा क्रांतीच्या स्वरूपाबाबत खूप मतभेद दिसून येतात. पूर्वी सशस्त्र क्रांतीलाच क्रांती मानण्याचा परिपाठ होता. मात्र पुढे सशस्त्र क्रांतीला मानणाऱ्या क्रांतीकारकांनाच समजून चुकले की, जनमानसात नव्या मूल्यांसाठीची चेतना तसेच आकांक्षा निर्माण करणे सशस्त्र क्रांतीला शक्य नाही. कारण सशस्त्र क्रांतीनंतर जी नवी राज्यव्यवस्था निर्माण होते ती सुध्दा जुन्याच मूल्यांवर चालू राहते.

'लोक क्रांती पाथेय : क्रांती की अवधारणा'या ग्रंथाचे संपादक नरेंद्रभाई यांच्या मतानुसार, 'फ्रान्सची राज्यक्रांती आणि रशियाची बोल्शेविक क्रांती यांच्या अनुभवावरून प्रिन्स क्रोपोटकीन यांनी आपले क्रांतीविषयीचे स्वत:चे मत व्यक्त केले. त्यांनी आपल्या अनुभवावर आधारित जे वर्गीकरण दिले आहे ते खालीलप्रमाणे :

१) क्रांतीची भावना २) क्रांतीची आवश्यकता ३) क्रांती पूर्वीची स्थिती ४) क्रांतीचा उद्‌घोष ५) क्रांती यज्ञाची आहूती ६) दडपशाही आणि नवपरिवर्तनाचा काळ ७) क्रांती प्रक्रियाची दिशा (नरेंद्रभाई (संपा.) १९८१:१८–१९)

नरेंद्रभाईच्या म्हणण्यानुसार वरील वर्गीकरणामध्ये जे भाव व्यक्त केलेले आहेत. त्यातून क्रांतीचे जे स्वरूप समोर येते, तसेच धीरेंदांच्या विश्लेषणातून देखील समोर येते. दोन्ही विचारवंतांनी दोन वेगवेगळया आधारावर विचार केला आहे पण ते एकाच ठिकाणावर पोहोचले. धीरेंदांनी आपले विचार पुढील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट केले आहेत.

१) क्रांतीचे क्षेत्र २) क्रांतीची शक्ती ३) क्रांतीचे साधन ४) क्रांतीचा मार्ग

**क्रांतीचे क्षेत्र : सर्वाधिकारी राज्यवाद तसेच भांडवलशाही पासून मुक्ती**

लोकशाही शासन संस्थेच्या शक्तीद्वारेच लोकांना स्वातंत्र्य, समता आणि बंधुभावाच्या दिशेने पुढे जाण्याऐवजी जनतेचे जीवन अधिक विषमता, भेदभाव तसेच परावलंबन यांच्या जाळयात अडकविले. त्यामुळे धीरेंद्रांच्या मते, या युगातील क्रांतीचे क्षेत्र हे राज्य आणि सामंत नसून सर्वकष राज्यसत्ता आहे. आजची क्रांती ही सत्ता परिवर्तनासाठीची नाही किंवा त्याच्या रूपांतरणाची नाही, तर ती राज्यसंस्थेपासूनच्या मुक्तीची आहे. ही गोष्ट खरी आहे की हीच राज्यसंस्था मानवाच्या विकासाचे साधन आहे. पण आजच्या परिस्थितीत मानवाचा या व्यवस्थेत श्वास गुदमरत आहे. आणि यापुढे मानवाच्या विकासासाठी ही व्यवस्था समाप्त झाली पाहिजे असे धीरेंद्र विवेचन करतात आणि उदाहरण देऊन स्पष्ट करतात की, रेशीम कीडा स्वसंरक्षणासाठी स्वत:भोवती कोश विनतो. पण कालनुक्रमे तोच कोश त्याला नकोसा वाटतो. त्या घुसमटीपासून सुटका करून घेण्याकरता तो स्वत: बनविलेले जाळे तोडून बाहेर येतो. निसर्गाची ही एक चमत्कारीक लीला आहे. (मजुमदार धीरेंद्र १९८०:६) क्रांतीची प्रक्रिया देखील अशी आहे. अशाप्रकारे आजच्या क्रांतीमध्ये जो संघर्ष आहे तो सरकार आणि जनता यांच्यातील आहे. कारण क्रांतीचे क्षेत्र हे सर्वाधिकारी राज्यसत्ता आणि भांडवलवाद हे आहेत असे विवेचन धीरेंद्र करतात.

**क्रांतीची शक्ती किंवा ताकद : लोकसहमती आणि लोकविकास**

क्रांतीचे क्षेत्र हे राज्यसंस्थेपासून मुक्तता हे असून त्यासाठी होणारा संघर्ष हा जनता व सरकार यांच्यातील आहे. ही गोष्ट स्पष्ट झाल्यानंतर धीरेंद्रांच्या मते, एक गोष्ट समजावून घ्यायला हवी ती म्हणजे या नव्या संघर्षाची शक्ती कोणती असेल. पूर्वीच्या काळात क्रांतीची ताकद ही बंदुकीच्या किंवा हिंसेची ताकद होती. धीरेंद्र मजुमदार सांगतात की, आज परिस्थितीत एवढा आमुलाग्र बदल झाला आहे की, आता हिंसक शक्तीने जनक्रांती होऊ शकत नाही. कारण आजच्या जगात राज्यवाद आणि शेवटी भांडवलवाद मिळून लोकजीवनाच्या प्रत्येक भागाला ग्रासून एवढी मोठी जबरदस्त सर्वाधिकारी शक्ती

बनलेले आहेत. त्यांच्याजवळ हिंसेची साधने एवढी मोठी, विशाल आणि सर्वनाशी आहेत की, समाज जीवन हिंसेची सर्व ताकद एकत्र करून त्यांचा सामना करू म्हटले तरी त्यांना ते शक्य होणार नाही.(मजुमदार धीरेंद्र १९८०:७)

हिंसा शक्ती ही क्रांतीच्या शक्तीच्या रूपात निरूपयोगी ठरली आहे. त्यामुळे कोणत्या ना कोणत्या रूपात अहिंसा शक्ती विकसित केली पाहिजे. या शक्तीचे स्वरूप वेगळे असेल. ती संघर्ष नसून सहकार्य असेल, विरोध नसून अनुरोध असेल. या नव्या अहिंसक शक्तीद्वारे सर्वाधिकारी राज्यवाद आणि भांडवलवादावर प्रहार केला जाणार नाही. तर नवीन समाज रचनेची त्यातून निर्मिती होईल. त्यातूनच सत्याग्रह शक्तीचे नवे स्वरूप प्रकट होईल. ही शक्ती लोकसहभाग आणि लोकसहमतीतून प्रकट होईल. त्यातूनच क्रांतीसाठी नव्या शक्तीचा जन्म होईल हे धीरेंद्र या विश्लेषणावरून स्पष्ट करतात.

**क्रांतीचे साधन :ग्राम परिवार किंवा ग्रामसभा**

धीरेंद्र क्रांतीमध्ये तिसरी गोष्ट क्रांतीचे साधन हे सांगतात. आजपर्यंत क्रांतीचे साधन दलित वर्ग आहे अशी समजूत होती. दलित वर्ग अन्यायी, अत्याचारी, शोषण करण्याच्या वर्गाला नाश करून क्रांतीची स्थापना करेल असे मानण्यात येत होते. धीरेंद्रांच्या मते, मात्र आता क्रांतीची परिस्थिती आणि क्षेत्र पूर्णपणे बदलेले आहे. अन्याय, अत्याचार आणि शोषण करणारा असा कोणताही एक वर्ग आता राहिला नाही. केंद्रीत राज्यव्यवस्था आणि अर्थव्यवस्थेमुळे प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या तरी बिंदूवर अन्यायी, अत्याचारी आणि शोषणकारी असतेच तर कोणत्यातरी दुसऱ्या बिंदुवर ती यांच्यामुळे त्रासलेली असते. उदाहरण दाखल धीरेंद्र मजुमदार पुढे असे म्हणतात की, जेव्हा क्रांतीची परिस्थिती तसेच तीचे क्षेत्र बदलले आहे तेव्हा एकच व्यक्ती मुंबईतील कामगार म्हणून शोषित असतो आणि स्वत: गावात व्याज खाणारा सावकार म्हणून शोषक असतो. एकच व्यक्ती गावात जमीन मालक म्हणून शेतमजुराचा शोषक असते आणि बिर्ला कंपनीचा कामगार म्हणून कंपनीकडून शोषित असते.(मजुमदार धीरेंद्र १९८०:९) म्हणूनच या युगातील

क्रांतीचे साधन देखील बदललेले आहे. धीरेंद्रांच्या मते, आता क्रांतीचे ध्येय कुण्या एका वर्गाचे, जातीचे किंवा वर्णाचे, नाश करणे असणार नाही तर पूर्ण समाजाद्वारे समाजाला पीडीत करणाच्या पध्दती आणि संस्थांचा नाश होईल असे समाजायला हवे (मजुमदार धीरेंद्र १९८०: १०).

आज क्रांतीचे साधन हे संपूर्ण समाजाची चेतना सहकार शक्तीच असणार जी वर्तमान व्यवस्थेला संपूर्णपणे बदलण्यासाठी संघर्ष करेल. समाजाच्या चेतना, सहकार शक्तीचे स्वरूप ग्राम परिवारांच्या रूपात तसेच ग्रामसभेच्या रूपात प्रकट होईल. वास्तवात हीच ग्रामसभा ज्यामध्ये गावातील सर्व समुदायांचे समान प्रतिनिधीत्व असेल, हीच ग्रामसभा नवीन क्रांतीचे साधन बनेल आणि ती ग्रामसभा राज्यसंस्थेच्या पर्यायाच्या रूपात काम करेल.

**क्रांतीचा मार्ग आणि सौहार्दपूर्ण संबंधाचा पुनर्स्थापना सिध्दांत (रिअप्रोचमेंट थिअरी) :**

धीरेंद्रांच्या मते, चौथी गोष्ट क्रांतीचा मार्ग म्हणजे क्रांतीची पध्दती आहे. कारण क्रांतीचे क्षेत्र, शक्ती आणि साधने बदलल्यामुळे हे आवश्यक आहे की, त्यामुळे क्रांतीचा मार्ग देखील त्यांच्या अनुरूपच असतो. याच बिंदू वर गांधीजींनी साध्य आणि साधन यांच्यातील एकरूपतेला अनिवार्य मानले होते. त्यांनी असे म्हटले होते की, असे जर झाले नाही तर साध्यच मार्गभ्रष्ट होईल. ते सर्व दृष्टिनी खरे आहे खरोखरच जर मार्ग आणि पध्दती सरळ उद्दिष्टाच्या दिशेने नसेल तर क्रांतीच्या यात्रेची काय दूरावस्था होईल ही गोष्ट सहज समजून घेता येईल.ग्राम स्वराज्यासाठीची क्रांती म्हणजे अहिंसक क्रांतीची पध्दती कन्फ्रंटेशनची नाही तर ती रिप्रोचमेंटची आहे. मात्र आज सर्व जगाची भूमिका कन्फ्रटेंशनचीच आहे.

कार्ल मार्क्स हे इतिहासातील एकमेव व्यक्ती आहेत की ज्यांनी मानवी दृष्टीला सामाजिक न्यायाच्या बिंदूवर केंद्रीत केले होते. या भूमिकेत त्यांनी अन्यायी तसेच अन्यायामुळे पिचलेले, शोषक व शोषित, अत्याचारी आणि पीडित अशा रूपात मानवी समाजाला दोन वर्गामध्ये विभागले. त्यांनी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी वर्ग संघर्षाच्या पध्दतीचे प्रतिपादन केले.

धीरेंद्र असे सांगतात की, क्रांतीचा मार्ग हा वर्ग संघर्ष नसून संपूर्ण लोक चेतनाद्वारे रिअप्रोचमेंट हाच असणार आहे. त्यामुळे आपण असे म्हणून शकतो की, ग्राम स्वराज्याच्या क्रांतीचे साधन हे संपूर्ण ग्रामसभाच असणार आहे. ग्रामसभा म्हणजे ग्रामीण नागरिकांचा 'जागृत समूह' होय. हा जागृत समूह पूर्ण ग्रामस्वराज्य स्थापन करण्यासाठी आणि राज्यव्यवस्थेला नष्ट करण्याचे काम करेल. या समूहामध्ये परस्पर सहकार्य निर्माण करण्यासाठी रिअप्रोचमेंटचा सिंध्दांत उपयोगी ठरेल. रिअप्रोचमेंट थिअरीचे कोणतेही तयार केलेले शास्त्र आपल्याकडे नाही त्याचा शोध लावावा लागेल. त्याचा शोध लोकांमध्ये जाऊनच करता येईल (मजुमदार धीरेंद्र, १९८०:२२—२३) असे धीरेंद्र मजुमदार विवेचन करतात. धीरेंद्रांनी लोक गंगा यात्रेद्वारे या मार्गाच्या शोधाची सुरूवात केली होती (मजुमदार धीरेंद्र १९८०:२४).क्रांतीची पध्दती किंवा मार्ग हा सहकाराचा तसेच सम्मीलनाचा म्हणजे रिअप्रोचमेंटचा असेल.(नरेंद्रभाई (संपा. ),१९८१:४१) लोकशाही राज्यामध्ये क्रांती करण्यासाठी 'रिअप्राचमेंटचा' सिध्दांत धीरेंद्रा सांगतात.

धीरेंद्र मजुमदारांच्या मते, मालक व मजूर यांच्या भूमिकेतील 'रिअप्रोचमेंटची' जी क्रिया आहे त्यावर विचार केला पाहिजे. क्रांतीचे लक्ष म्हणजे समाजात विकारप्रेरित क्रियाना बदलून सहकार्य, सदभावना अशा संस्कृती प्रेरित भावनांचा विकास करून, त्या माध्यमातून स्वावलंबी, समतावादी, समाजाची स्थापना करावयाची आहे. या उदिष्टाची पूर्तता अहिंसक शक्तीने म्हणजेच शिक्षणाच्या सक्तीने होणे शक्य होईल. शिक्षण प्रक्रियेतूनच मालक आणि मजूर हे दोघेही त्यांच्या आतील विकारापासून मुक्त होऊ शकतील, परंतु मजुरांमध्ये हजारो वर्षापासून मालकांच्याकडून किंवा उच्च वर्गाकडून शोषण, दमन, उपेक्षा यासारख्या कृतींच्या विरोधी ज्या भावनांचे एकत्रीकरण झाले आहे. त्यामध्ये बदल केवळ शिक्षणाने होणे कठीण आहे. म्हणून रिअप्रोचमेंट च्या परीघामध्ये मालकांच्याकडून पहिली सुरूवात झाली पाहिजे. कारण जोपर्यंत क्रियामध्ये बदल होत नाही तोपर्यंत प्रतिक्रियांमध्येही बदल होणार नाही. याचा अर्थ असा नाही की, रिअप्रोचमेंटच्या प्रक्रियेत मजूर सहभागी होणार नाहीत.

(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:४३) अशा रितीने मालकांच्याकडून केली जाणारी पहिली क्रिया रिअप्रोचमेंटमधील सुरूवातीची क्रिया होईल आणि त्याला प्रतिसाद म्हणून संपूर्ण समाजामध्ये त्याचा फैलाव होईल.

धीरेंद्रांच्या मते, मालकाकडून रिअप्रोचमेंटची सुरूवात झाली तर प्रतिक्रिया म्हणून मजूरामध्ये ज्या भावनांचा साठा झाला आहे, त्याचे निराकरण लगेच होणार नाही म्हणून मालकांनी पहिल्यांदा सुरूवात करावी. मानवी भूमिकेतून गरीबानाही प्रतिष्ठा देणे समान पातळीवर आवश्यक आहे. त्याच्या अस्तित्वासाठी, तृप्तीसाठी हे आवश्यक मानले पाहिजे. रिअप्रोचमेंटच्या प्रक्रियेत हे घडते कारण भूमीवान स्वेच्छेने भूमी किंवा संपत्तीवान आपली संपत्ती स्वेच्छेने, गावाकडे देतो म्हणजेच सामाजीकरण (भूदान) करतो, तेव्हा भूमीहीन किंवा साधनहीन हा जमीन आणि संपत्तीचा हिस्सेदार बनून आर्थिक क्षेत्रात समान पातळीवर येतात. दोघेही बरोबरीने गावच्या ग्रामसभेचा सदस्य म्हणून एका पंक्तीत एका आसनावर बसू लागतो तेव्हा मजूर आर्थिक आणि सामाजिक दृष्टीने समान भूमिकेत राहील (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:४४) असे प्रतिपादन धीरेंद्र मजुमदार करतात.

**क्रांती निष्ठांसाठी सूचना :**

धीरेंद्र मजुमदार यांनी अहिंसक क्रांती करणाऱ्या निष्ठावंतासाठी पुढील प्रमाणे सूचना दिल्या आहेत.

१. कोणत्याही क्रांतीसाठी संस्थात्मक साधन उपयुक्त ठरलेले नाही.

२. क्रांती अहिंसक पध्दतीनेच साध्य होवू शकते.

३. गांधीजींनी स्वावलंबी समाजाच्या स्थापनेसाठी अहिंसा आणि लोकसहभाग या पध्दतीच्या रूपात यांची स्थापना करायला सांगितली होते. अहिंसा लोकअभिक्रमाच्या रूपात प्रकट होईल आणि लोकसंघटनाची रूपरेखा समुद्राच्या बदलाच्या (ओशनिक सर्कल) रूपात प्रकट होईल.

४. क्रांतीनिष्ठ लोकांचा एक समुदाय गरजेचा आहे. मात्र त्याचे स्वरूप संस्था किंवा संघटनेसारखे असू नये.

५. देशामध्ये स्वराज्य म्हणजे जनतेचे राज्य, कारण आमची जनता दोनशे वर्षे पंगू बनली आहे. त्यामुळे सर्व नेत्यांनी लोकसेवक लोकांना संघाच्या रूपात जनतेत पसरले पाहिजे. स्वराज्याचा अर्थ त्यांनीच लोकांना समजवावा. बाजार आणि सरकार यांच्या गुलामीतून लोकांना मुक्त करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा.

६. गावागावांमध्ये लोक समितींची निर्मिती केली जावी. जी सरकारच्या कामावर लक्ष ठेवेल, गरज पडल्यास त्याचा विरोध करेल आणि सामान्यपणे आपापल्या गावांमध्ये रचनात्मक कामांद्वारे ग्रामस्वराज्याची स्थापना करेल.

७. देशात दोन शक्तींचे संघटन करावे लागेल. १. ग्रामीण जनतेची शक्ती २. आचार्य शक्ती म्हणजे शिक्षक शक्ती, विद्वान आणि सज्जनांची शक्ती. देशाच्या संयोजन व विकासाकरता दोन्ही शक्तींची गरज असते. आजच्या परिस्थितीत तर आचार्य शक्ती हीच तारक, प्रेरक आणि पुरक आहे (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:४७—४८). महात्मा गांधीजीनी सत्याग्रहीसाठी नियमावली सांगितली होती तशा प्रकारे धीरेंद्रा क्रांतीनिष्ठासाठी नियमावली सांगतात.

**राजनीती आणि लोकनीती :**

धीरेंद्रांच्या मते, जगामध्ये प्राचीन काळापासून सांस्कृतिक प्रवृत्ती आणि पशू प्रवृत्ती अशा प्रवृत्ती प्रचलित आहे. या दोन प्रवृत्तीचा जगावर परिणाम दिसून येतो. याला मानवी स्वभाव कारणीभूत दिसून येतो. मुख्यत: मानवी स्वभावाचे दोन भाग दिसतात. एक म्हणजे संस्कृतीच्या दिशेने आणि दुसरा म्हणजे विकासाच्या दिशेने झालेली प्रगती होय. परंतु यातून अतिविकासामुळे विकृती निर्माण झाली आणि त्याचे पुढे रूपांतर मानवाच्या अवनीतीच्या पायरीत होताना दिसते. तत्कालीन कालखंडात राजाने या अवनीतीचा फायदा घेवून राजेशाही बळकट केली. त्यातूनच जनतेने राजाला ईश्वराचा अंश मानले आणि राजाला सर्व अधिकार दिले. अशा परिस्थितीत राजनीतीचा विकास झाला. यातून लोकांमध्ये जीवन संघर्ष निर्माण झाला. त्यातून प्रति द्वंव्दाची निर्मिती झाली. प्रतिद्वंद्वामुळे अनेक प्रकारच्या विकृत्या निर्माण झाल्या आणि त्या

संपविण्यासाठी राजनीती जटील बनत गेली आणि राजदंड लोकांच्या जनजीवनामध्ये अधिक दखल देऊ लागला. अशा रितीने समाजात दोन प्रकारची कर्मसूची निर्माण झाली. एक म्हणजे प्रगतीच्या आकांक्षाच्या कारणाने: सांस्कृतिक विकासाचे संघटन आणि दुसरे म्हणजे आत्मसंरक्षणाच्या कारणानेसांस्कृतिक विकासासाठी शैक्षणिक कार्यक्रम, विकृती संपविण्यासाठी राजनीतीचे संघटन हजारो वर्षापासून चालत आले आहे.(मजुमदार धीरेंद्र,१९५८:१—२) धीरेंद्रांनी राजनीती व लोकनीतीचा विचार विनोबांच्या विचारातून घेऊन त्याचा विकास करण्याचा प्रयत्न केला आहे.

धीरेंद्रांच्या मतानुसार रामायण महाभारतापासून आपण पाहतो की, नीती ठरविण्यासाठीची जबाबदारी ही हळूहळू राज्यशक्तीवर आली. त्यामुळे राज्याची शक्ती वाढली आणि या शक्तीचा काही वेळा दुरूपयोगही होऊ लागला. कालांतराने लोकप्रिय राजाही त्रासदायक राजा बनला. राजतंत्राचीसमाप्तीहोवूनलोकतंत्राच्या स्थापनेसाठी एक निश्चित कार्यक्रम आखला गेला.(मजुमदार धीरेंद्र,१९५८:३)

**लोकनीतीची प्रेरणा :**

धीरेंद्रांनी लोकनीतीचा उदय कशामुळे झाला याबद्दल विचार मांडले आहेत. धीरेंद्रांच्या मते, राजनीतीपासून लोकनीतीच्या दिशेने पावले उचलण्याची प्रेरणा दोन पध्दतीतून मिळाली. पहिले—राजाद्वारे शक्तीचा दुरूपयोग आणि दुसऱ्या—सांस्कृतिक विकासाच्या कारणाने आत्म—प्रत्ययाचे भान लोकनीतीच्या उदयाच्या या दोन पध्दती धीरेंद्र सांगतात. (भावे विनोबा, २००४ :६—७)

**बहुमताचे दुष्परिणाम :**

धीरेंद्रांच्या मते, राजतंत्र समाप्त करण्यासाठी आणि लोकतंत्र स्वीकारण्यासाठी लोकांनी बहुमत प्रथेला जन्म दिला. त्यांनी राज्य चालविण्यासाठी प्रजातंत्र निर्माण केले. ज्याला अधिक मते मिळतील तो संपूर्ण समाजाचे नियमन करील असा विचार आला. जनतेच्या दैनंदिन जीवनात राज्याचा हस्तक्षेप पहिल्यापेक्षा अधिक झाला. ही दखल वाढत वाढत आज

लोककल्याणकारी राज्याच्या नावाने संपूर्ण समाजाच्या अंग प्रत्यंगावर झाला. परिणामी लोकनीती कायद्याच्या पुस्तकातच पडून राहिली. वास्तविक क्षेत्रामध्ये राजनीती अत्युच्च शिखरावर पोहचली. (मजुमदार धीरेंद्र,१९५८:१—२) असे विवेचन धीरेंद्र मजुमदार यांनी केले. धीरेंद्रा लोकशाहीमधील बहुमताच्या दुष्परिणामावर चर्चा करतात व बहुमताच्या लोकशाहीने संपूर्ण मानवी जीवन व्यापून टाकले आहे असे निरीक्षण नोंदविले आहे.

**नोकरशाहीची पकड :**

धीरेंद्र नोकरशाहीवर टीका करतात. नोकरशाहीने मनुष्याला जखडून ठेवले आहे असे ते म्हणतात. राजनीती अच्युत शिखरावर पोहचल्यामुळे धीरेंद्रांच्या मते, याचा परिणाम असा झाला की, मनुष्याने ज्या लोकशाहीच्या कल्पनेने राजेशाहीला संपविले आणि त्याच्या बदल्यात संपूर्ण जगभर संसारात एक मजबूत नोकरशाही जनजीवनाच्या छातीवर बसली. आज जगभरातील राजकीय विचारवंत या परिस्थितीने घायाळ आणि दु:खी झाले. तत्कालीन जगात साम्यवाद, फॅसिस्टवाद, कल्याणकारी राज्य या नावाने जे काही चालू होते. ते सर्व सर्वाधिकाराची विभिन्न रूपे शाबीत होत होती आणि प्रत्येक राजकीय व्यवस्थेत दिवसेंदिवस नोकरशाहीची शक्ती वाढत होती. (मजुमदार धीरेंद्र,१९५८:२)प्रतिनिधीपेक्षाही नोकरशाही बलशाली आहे असे मत धीरेंद्र नोंदवितात.

**लोकनीती :**

विनोबांनी सविस्तरपणे विकसित केलेला लोकनीतीचा विचार हा गांधीजींची देणगीच आहे असे धीरेंद्र म्हणतात.

धीरेंदांच्या मते, लोकनीतीमध्ये जेव्हा बहुमत अल्पमताचा झगडा संपून जातो आणि सारे निर्णय संपूर्ण सहमताने घेतले जातील आणि ज्यामध्ये व्यवस्था आणि व्यवहार होतील ते कोणावर लादणारे नसतील यालाच शासनमुक्त व्यवस्था म्हटले आहे. असे मत धीरेंद्र मांडतात(मजुमदार धीरेंद्र,१९५८:२२—२५)

लोकनीतीच्या प्राप्तीसाठी विनोबा ग्रामस्वराज्याची स्थापना करू इच्छितात. त्याच्या रक्षणासाठी शांतीसेनेचे संघटन केले पाहिजे असे म्हणतात. राष्ट्रीय स्वराज्य हे जनतेसाठी माफक नाही कारण त्याने राजनीतीचे संघटन होईल. लोकनीतीचे नाही. ग्रामस्वराज्य ही कौटुंबिक समाजाच्या आधारावर विकसित होऊ शकेल (भावे विनोबा, २००४:३४)

ग्रामदान आणि ग्रामस्वराज्याच्या बरोबरीने शांतीसेनेचे संघटनही अनिवार्य आहे कारण स्वराज्याच्या स्थापनेबरोबरच त्याच्या व्यवस्थेचे रक्षण करण्याची आवश्यकता आहे. शांतीसेना सांस्कृतिक प्रक्रियेचे साकार स्वरूप आहे. म्हणून भारताला आणि जगाला विनोबा संचलित आंदोलनाचा गंभीर विचार केला पाहिजे असे धीरेंद्र मजुमदार आपल्या विस्तृत विवेचनात म्हणतात.

**समारोप :**

भारतीय समाजाची सर्वंकष गुंतागुंत लक्षात घेता शासनमुक्त समाज, मार्क्स प्रणीत वर्गमिमांसा व त्याअनुषंगाने येणारा वर्गसंघर्ष या दोन्ही गोष्टी भारताला कशा गैरलागू आहेत याचे अत्यंत मार्मिक असे विश्लेषण धीरेंद्रांनी केले आहे आणि त्याआधारे क्रांतीच्या नव्या तंत्राची अथवा साधनाची गरज पटवून दिली आहे. कोणत्याही सरकारचे अधिष्ठान दंडशक्ती हेच असते. दंडशक्ती समाजमान्य असली तरी ती हिंसेच्या विरोधी शक्ती नसते. त्यामुळेच सरकारमुक्त समाजजीवन हे खऱ्या अर्थाने पूर्णपणे हिंसामुक्त असे समाजजीवन ठरते.

धीरेंद्रांच्या मते आजच्या युगात क्रांतीचे क्षेत्र राजेशाही अथवा सामंतशाही नसून सर्वंकष राज्यवाद हे आहे. आजची क्रांती सत्तेच्या परिवर्तनाची अथवा सत्तेच्या रूपांतराची क्रांती नाही. राज्यसत्तेपासूनच मुक्त होणारी अशी ती क्रांती आहे व म्हणून आजचे क्षेत्र सर्वाधिकारी राज्यसत्ता आणि तिचे अधिष्ठान असणारी भांडवलशाही हे आहे. राज्यसत्ता आणि भांडवलशाही या दोहोंचेही उच्चाटन हा या क्रांतीचा हेतू आहे. परिणामी आजचा संघर्ष हा लोक आणि सरकार, नागरिकशक्ती आणि सैनिकशक्ती यातील संघर्ष आहे.

अहिंसक समाजाची निर्मिती हे साध्य असून अहिंसक लोकशक्ती ही आपली शक्ती आहे, ग्रामपरिवार, ग्रामसभा हे आपल्या क्रांतीचे साधन आहे असे धीरेंद्र म्हणतात. वर्गीय नातेसंबंध कमालीचे गुंतागुंतीचे झाले आहेत. समाजातील प्रत्येक व्यक्ती एकाचवेळी शोषकही आहे आणि शोषितही आहे अशा विद्यमान परिस्थितीमध्ये क्रांतीचा मार्ग वर्गसंघर्ष न राहता समग्र लोकचेतनेच्या जागृतीच्या माध्यमातून सम्मीलनाचाच भाग असू शकतो यालाच धीरेंद्र रिअप्रोचमेंट म्हणतात. या रिअप्रोचमेंटचे साधन ग्रामसभा राहील कारण तिच्याद्वारेच ग्रामसमूहाच्या चैतन्याच्या अविष्कार होईल. ही ग्रामसभा एका बाजूला स्वायत्त, स्वावलंबी आणि आत्मनिर्भर अशा ग्रामस्वराज्याच्या बांधणीचेकाम करील आणि दुसऱ्या बाजूला सर्वंकष राज्यवाद व केंद्रीत भांडवलशाही यांच्या निराकरणाचाही प्रयत्न करील. या सर्व प्रक्रियेत हृदयपरिवर्तनाला महत्वाचे स्थान राहील. कारण त्याखेरीज खरे मान्यता परिवर्तन आणि मूल्यपरिवर्तन घडून येणार नाही. म्हणूनच क्रांतीची प्रक्रिया ही एक उभयपक्षी प्रगतीची प्रक्रिया आहे. धीरेंद्रा राजनीती ऐवजी लोकनीतीचा विनोबांचा विचार पुढे नेतात. त्यांच्यामते, लोकनीतीमधूनच अहिंसक, दंडमुक्त, शासनमुक्त समाज निर्माण होऊ शकतो. धीरेंद्रा बहुमताच्या लोकशाहीवर व त्यामधील नोकरशाहीवर टीका करतात. आजच्या काळात मानवाच्या प्रगतीसाठी लोकनीतीचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे असे त्यांचे मत आहे. वर्गविरहीत तसेच शासननिरपेक्ष समाजव्यवस्थेसाठी धीरेंद्रा लोकनीतीचा विस्तार करतात व त्यामधून संपूर्ण मानवजातीचे कल्याणहोईल असे प्रतिपादन करतात.

आज भारताच्या दृष्टीने विचार करता प्रचंड प्रमाणात वाढलेल्या नोकरशाहीवर अंकुश ठेवून, ग्रामीण भागामध्ये जास्त प्रमाणात कल्याणकारी योजना राबविणे आवश्यक आहे. लोकनीती हीच कल्याणकारी आणि प्रभावी लोकशाहीसाठी अत्यंत महत्वाची आहे.

***********

# प्रकरण पाचवे
# धीरेंद्र मजुमदार यांचे रचनात्मक कार्य आणि गांधीविचारांचा केलेला विकास

**प्रस्तावना:**

धीरेंदा हे त्यांच्या रचनात्मक कार्यासाठीच प्रसिध्द आहेत. धीरेंद्रांचे जीवन हे ग्रामसेवेच्या साधनेने व्यापलेले होते. आंदोलन आणि रचनात्मक कार्य यांचा सुरेख मेळ त्यांच्या जीवनात त्यांनी घातला होता. स्वातंत्र्यप्राप्तीच्या संग्रामात त्यांनी केलेल्या रचनात्मक कार्यातील परिश्रम आणि कष्टप्रद जेलयात्रांना अनेक नेत्यांनी 'हाडतोड परिश्रम' असे नामकरण केले होते. खादी—शिक्षण, जमीनदारी—निर्मूलन, पंचायतींची स्थापना, ग्रामीण नेतृत्वाचा विकास, साक्षरता, प्रौढ आणि स्त्री शिक्षण, स्त्रीशक्ती—जागृती ही त्यांची संग्रामाची रचनात्मक माध्यमे होती. त्यांनी आपले संपूर्ण जीवन हे ग्रामसेवेच्या साधनेने व्यापून टाकले होते. यामध्ये अकबरपूर (उत्तरप्रदेश) क्षेत्रात समग्र ग्रामसेवेच्या साधनेला प्रारंभ झाला आणि तो जीवनाच्या शेवटपर्यंत चाललेल्या लोकगंगा यात्रा पर्यंत चालला होता. धीरेंद्रांनी समग्र ग्रामसेवा रणीवा, वर्गपरिवर्तनाचे साधन, खादीग्राम, सर्वजनाधार बलिया, लोक—संघटनेची प्रक्रिया ग्रामभारती बरनपुर आणि लोकगंगा यात्रा इ. प्रकारचे रचनात्मक कार्य केले आहे याचे विस्तृत विवेचन प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात आले आहे.

**रणीवा येथील ग्रामसेवा :**

रणीवा हे गाव उत्तरप्रदेश मधील फैजाबाद जिल्हयाच्या मध्यभागी असलेले अगदी लहानसे गाव होते. या गावात एकूण पन्नास घरे होती. या गावाला रस्ता नसल्याने बाहेरच्या जगाशी फारसा संबंध नव्हता. कॉंग्रेसबद्दलही येथील लोकांना काही माहीती नव्हती. धीरेंद्रांनी सहकाऱ्यांना असेच गाव निवडायला सांगितले होते की, 'जेथे कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक काम होत नसेल'. धीरेंद्रांनी दोन—तीन महिन्यांच्या वास्तव्यानंतर त्याच क्षेत्रात काम करण्याचे ठरविले आणिस्वावलंबनकार्याच्या प्रसारासाठी काही योजना

राबविण्याचे ठरविले. अशारितीने रणीवा येथे आश्रमामार्फत ग्रामसेवा केंद्र सुरू करण्याचे ठरले. येथूनच रणीवा येथील ‘समग्र ग्राम सेवेला’ म्हणजेच रचनात्मक कार्याला सुरूवात झाली. (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:१६)

‘गावात गावकऱ्यांसारखे राहणे हाच कार्यक्रम आहे. गावात गावकऱ्यांसारखे राहून आणि तिथल्या समस्यांबद्दल सजग राहून जर कार्य केले तर कार्यक्रम आपोआप समोर येईल’.(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:२१) असा विश्वास धीरेंद्रांना होता. त्यामुळे जे काम ज्या क्रमाने समोर येईल. त्याच क्रमाने करणे त्याक्षेत्रासाठी सर्वोत्तम ठरेल. असे धीरेंद्रांना वाटत होते. त्यातूनच ग्राम सफाईचा कार्यक्रम पुढे आला.

**ग्राम सफाई :**

रणीवामध्ये धीरेंद्रांचे आणि त्यांच्या सहकार्याचे राहणे ही गावकऱ्यांना अनेक गोष्टी शिकवत होते. जात्यावर दळणे, स्वयंपाक करणे, घराची डागडुजी करणे, भांडी घासणे, झाडाझाड करणे ही कामे प्रतिष्ठित घरातले, तेही पुरूष करू शकतात असा विचारच कधीही रणीवा गावातील लोकांच्या मनास शिवला नव्हता. हळूहळू या कामांबद्दलची घृणेची भावना, गावातील लोकांच्या मनातून कमी होऊ लागली. त्यातून गावातील लोक धीरेंद्रांना साथ देऊ लागले. त्याचा परिणाम असा झाला की, धीरेंद्रांचे प्रत्येक कुटुंबात स्थान निर्माण झाले. यातून जवळीकता निर्माण होऊन एकमेकांशी सल्लामसलत आणि सुख—दुःखाच्या गोष्टी सांगू लागले. यातून धीरेंद्रांनी होळीच्या निमित्ताने ग्रामसफाईचा कार्यक्रम हाती घेतला आणि धीरेंद्र सतत लोकांना साफ—सफाई बद्दल सांगत राहिले की, ‘सणासुदीच्या काळात घराच्या आत आणि बाहेर चांगल्याप्रकारे सफाई करणे हे धार्मिक अनुष्ठान असते’.(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:२१)

**आरोग्य सेवा :**

रणीवा गावात काही लोक, ज्यामध्ये विशेषतः स्त्रिया होत्या. खूप दिवसापासून त्या रोगग्रस्त होत्या. त्यामुळे धीरेंद्रांनी लोकांना होमिओपॅथीची औषधे देणेही सुरू केले. गावामध्ये प्रवेश करण्याआधी धीरेंद्रांनी होमिओपॅथीचा

अभ्यास केला होता. त्याचा उपयोग याकाळात झाला. याकाळातच धीरेंद्रांनी ग्रामीण जनतेच्या सेवा करू शकू म्हणून होमिओपॅथीची औषधे आणि पुस्तके मागविली. त्यानंतर जे कोणी गावात आजारी पडत, तेव्हा धीरेंद्र त्यांना होमिओपॅथीची औषधे देत होते.[७] लोक साधारण लहान मुलांच्या आजारात धीरेंद्रांना बोलवत असत. यातूनच गावातील स्त्रीयांमध्येही धीरेंद्रांचा काही प्रमाणात परिचय होऊ लागला आणि ते त्यांच्या कार्याला प्रतिष्ठा देऊ लागले. यातून धीरेंद्रांना असे दिसले की, 'गावातल्या लोकांना, विशेषतः म्हाताऱ्या स्त्रियांना, पुष्कळ इलाज माहीत असतात. ग्रामसवेकाने असे इलाज सावधपणे लिहून घेतले. त्याबाबत प्रयोग करून आजमावले, तर एक प्रकारची संपूर्ण चिकित्सा प्रणाली तयार होऊ शकते'.(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:२३) निसर्गोपचाराला याची जोड दिली पाहिजे अशी धीरेंद्रांची भावना होती.

**कापड विणकाम :**

चरखा हा स्वावलंबी कार्यक्रम हाती घेण्याचा विचार धीरेंद्र मजुमदारांनी केला. परंतु रणीवाच्या आसपास कापड विणकाम करणारा कारागीर नव्हता. धीरेंद्रांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गावकऱ्यांच्या प्रस्तावानुसार विणकामाच्या कार्यास सुरूवात केली. त्यामुळे गावातील सर्व लोकांना नवीन काही बघायला मिळाले आणि विणकामाच्या रूपाने गावाच्या आत उद्योगाच्या वातावरणाचीही निर्मिती झाली. सुतकताई आणि कापड विणणे या कार्यक्रमातून गावातील अनेक जाती, धर्मातील लोक एकत्रित येऊ लागले आणि गावातील पारंपरिक विचार आणि स्पृश्यअस्पृश्यतेचा विचार दूर होताना दिसत होता. बघता बघता गावागावात चरख्यांचा फार प्रचार होऊ लागला आणि दिवसेंदिवस चरख्यांची मागणी अधिक वाढू लागली.

**सुतार काम :**

रणीवामध्ये याकाळात धीरेंद्र ज्या घरात राहत होते ते घर सोडून त्यांना दुसऱ्या ठिकाणी जावे लागले. दुसऱ्या घरात आधी बैल गोठा होता. त्या गोठयाला दरवाजा तसेच खिडकी नव्हती. सुतारकीच्या पूर्व अनुभवामुळे धीरेंद्रांनी खिडकी आणि चौकटदरवाजा बनवून गोठयाची राहण्याजोगी दुरूस्ती केली. हे

गावकऱ्यांनी पाहिल्यावर त्यांना यामध्ये नावीन्य वाटले आणि ते हे काम पाहण्यासाठी येत असत. यामधून प्रेरणा घेउन गावकऱ्यांनी सुतार काम सुरू केले.

**साबण उद्योग :**

धीरेंद्र ज्याज्या गावात काम करीत होते. त्यावेळी त्यांची अशी धारणा दृढ होत गेली की, 'गावातील सफाईच्या कार्यक्रमात कपडयाच्या सफाईवर सगळयात आदी आणि सगळयात जास्त ध्यान द्यायला पाहिजे'.(मजुमदार धीरेंद्र,२००१:२६) यासाठी धीरेंद्र जेथे जेथे जात होते तेथे तेथे लोकांना कपडयावर विशेष लक्ष देण्याचा आग्रह धरत होते आणि कपडयांच्या संबंधातही चेतावणी देत असत. 'साबणासारखे काम जर गावातील गावात निर्माण झाले तसेच गावातील लोकांच्या दैनंदिन गरजेच्या सर्व वस्तू गावातच निर्माण होऊ शकतात आणि यातून गावातील पैसा गावातच राहतो. तसेच गावकऱ्यांचा पैसाही वाचतो'(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:२७) अशाप्रकारे धीरेंद्रांच्या प्रयोगामुळे गावकऱ्यांच्या धारणा, दृष्टिकोन आणि आत्मविश्वासाच्या भावनेत वाढ होत राहिली. उत्तरोत्तर लोकांमध्ये साबणाचा प्रयोग करणे आणि स्वच्छ राहण्यामध्ये अधिक आवड निर्माण झाली.

**शिक्षणाचा प्रयोग :**

धीरेंद्रांच्या मते, ग्रामीण–शिक्षणाच्या कार्यक्रमातून गावकऱ्यांमध्ये एक–दुसऱ्यांच्याप्रती घनिष्ठता उत्पन्न करणे सगळयात महत्वपूर्ण गोष्ट होती (मजुमदार धिरेंद्र,२००१:१८) प्रतिदिन एकत्र येऊन, एका स्थानावर बसल्यामुळे स्वाभाविक लोक एक–दुसऱ्यांच्या प्रति प्रेम करू लागतील' या कार्यक्रमातून प्रत्येक दिवशी रामायण पठणाचे कार्य सुरू झाले.(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:२८)

अशा प्रकारे रामायणाच्याद्वारा ग्रामीण शिक्षणाच्या कार्यक्रमाला प्रारंभ करण्याचा प्रयोग बहुतांशी सफल झालेला होता. रात्रशाळेचा प्रयोग धीरेंद्रांनी मोठया यशस्वीपणे सुरू केला. हळूहळू आसपासच्या २५ गावांमध्ये

रात्रपाठशाळा सुरू झाल्या. पुढे अनेक गावांमध्ये रचनात्मक कार्यक्रमाबरोबर रात्रशाळेचा प्रयोगही वाढत गेला.

**जीवन मजूरीचा सिध्दांत :**

जीवन मजुरी सिध्दांत हा उत्पादन खर्चावर आधारीत मालाची किंमत ठरविणे यासूत्रावर आधारित आहे. आजही प्रामुख्याने शेतमालाला योग्य किंमत मिळत नाही कारण शेतमालाच्या उत्पादन खर्चाचा विचार न करता त्यापेक्षा कमी किंमतीमध्ये शेतमालाची विक्री केली जाते त्यामुळे शेतीव्यवसाय तोटयामध्ये जात आहे व त्याचे विपरित परिणाम शेतकऱ्यावर होत आहेत. धीरेंद्र जीवन—मजुरीचा सिध्दांत स्वीकारतात कारण त्यांना शेतीवर आधारित शेतकरी व शेतमजूर यांचे जीवनमान सुव्यवस्थित स्थितीमध्ये आणायचे होते.

**आश्रमाची स्थापना :**

धीरेंद्रांनी रणीवां गावात जास्त वेळ घालवला, परंतु सर्वांत कमी संपर्क असलेल्या चतुरीपट्टी गावात सर्वांत जास्त चरखे चालू लागले आणि आश्रमाला लागून असलेल्या केवाडी गावात एकही चरखा चालू होऊ शकला नाही. सुरूवातीला धीरेंद्र आणि त्यांचे तीन सहकारी रणीवाला आले होते. एका वर्षाच्या काळात सहकाऱ्यांची संख्या वाढली आणि व्यापही वाढला म्हणून स्वतंत्र आश्रम बांधण्याचे ठरले. जवळच्या जंगलातला एक भाग धीरेंद्रांना पसंत पडला. जंगल साफ करण्याच्या आणि जागा समतल करण्याच्या कामात ते लागले आणि लोकही त्यांच्या मदतीला आले. यातूनच रणीवा आश्रमाची स्थापना झाली.आसपासच्या गावात तसेच प्रदेशात आश्रमाचा प्रभाव वाढू लागला, तशी सरकारी ब्रिटीश अधिकाऱ्यांची वक्रदृष्टीही आश्रमातील धीरेंद्र आणि सहकाऱ्यांकडे वळली. धीरेंद्रांच्या आणि आश्रमाच्या संपर्कातील लोकांना पोलिस धाक दाखवू लागले. परंतु दोन वर्षे प्रयत्न करूनही ब्रिटीश सरकारला दुसरा सरपंच करता आला नाही(मजुमदार धीरेंद्र, १९४८:२४)

धीरेंद्रांच्या मते, या सर्वांचा परिणाम असा झाला की, वर्षभरापूर्वी पोलिस शिपायाला पाहून ज्या लोकांना कापरे भरत असे, ते गाव सोडून पळून जात.

त्याच लोकांनी धैर्याने दमदार सामना केला आणि आश्रमाला ते मदत करीत राहिले. यातून एक लाभही झाला. लोकांचे साहस व प्रेम याची परीक्षा झाली. आमच्या सहकाऱ्यांचीही कसोटी झाली. करणभाई निर्दोष सुटले. धीरेंद्र लखैनोहून परतले. रचनात्मक कामाला पुन्हा वेग आला. रणीवा आश्रम केंद्राने एका संस्थेचे रूप घेतले.(मजुमदार धीरेंद्र, १९४८:२५—२६)

**स्त्री शिक्षण आणि स्त्री सुधार कार्यक्रम :**

स्त्रीशिक्षणाच्या कल्पनाही साकार कराव्या असे धीरेंद्रांच्या मनात आले. गावांत सगळीकडे पडदा पध्दती होती. प्रयत्न करून चौथी पास भगिनी मिळाली. त्यांना प्रमुख करून मुलींची शाळा सुरू केली. ५० स्त्रीसुधार केंद्रांत महिलांचे शिबिर घेण्याचे धीरेंद्रांनी ठरविले. धीरेंद्रांच्या योजनेने त्यांच्या मित्रांमध्ये खळबळ माजली. त्यांना यात धोका दिसला. मित्रांना समजावणे, त्यांच्या टीकेचे उत्तर देणे, खेडयातील लोकांना मुली सुनांना पाठवण्यासाठी राजी करणे, ही सगळी कामे त्यांना करावी लागली. ५० महिलांचे एक शिक्षण शिबिर शेवटी नोव्हेंबर, १९३९ मध्ये फैजाबादमध्ये सुरू झाले. यात अविवाहित मुलीही होत्या. प्रतिष्ठित घरांतील लोकांनी जुन्या रूढी तोडून, धीरेंद्रांच्या विश्वासावर मुली आणि सुनांना पाठवले.(मजुमदार धीरेंद्र, २००१:१३२) ही मोठी क्रांतीकारी गोष्ट होती.

चार महिन्यानंतर शिबिरातल्या स्त्रियांची मोठी संख्या पाहून लोक आश्चर्यचकितच झाले. धीरेंद्रांची बहीण सुचेता की ज्या सुचेता कृपलानी म्हणून प्रसिध्द झाल्या व उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्री झाल्या आणि एक भगिनी यांनी या कामाला वेळ दिला होता. त्याचा लाभ घेवून धीरेंद्रांनी खेडयांमध्ये या योजनेचा प्रचार करण्याचे ठरवले.

**जमुई (बिहार) येथील खादीग्राम प्रयोग :**

१८, एप्रिल १९५१ ला विनोबांना पहिले भूदान मिळाले. त्यानंतर काही दिवसांनी धीरेंद्रांना भेटण्यासाठी ते दिल्लीकडे निघाले आणि भूदानयात्रा सुरू झाली. धीरेंद्रांना त्यात क्रांतीचे दर्शन झाले. यातून त्यांना असे वाटले की, 'या

क्रांतीत भाग घेण्यासाठी आलेल्या तरूणांसाठी एखादे प्रशिक्षण केंद्र असावे’. (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:८२) धीरेंद्रांनी त्याची जबाबदारी स्वीकारली. केंद्रासाठी जागेचा व सहकाऱ्यांचा शोध सुरू झाला. बिहारमध्ये जमुई जवळची जंगलाने घेरलेली ओसाड जमीन धीरेंद्रांना पसंत पडली. भूदान आंदोलन आणि अहिंसक समाज रचनेसाठी समर्पित कार्यकर्ते तयार व्हावेत म्हणून २६ फेब्रुवारी, १९५२ रोजी ग्रामभारती खादीग्राम ही संस्था बिहारमध्ये जमुई क्षेत्रात धीरेंद्रांनी स्थापन केली.’ (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:८२) वैचारिक, सांस्कृतिक, क्रांतीकारी जीवनदर्शनाची अनुभूती देणारी अशी ही प्रयोगशाळा होती. या प्रयोगशाळेतून प्रेमभाई आणि रवींद्रभाई यांच्यासारखे पराक्रमी कार्यकर्ते निर्माण झाले, तसे असंख्य कार्यकर्तेही निर्माण झाले.

**स्वतंत्र लोकशक्ती :**

सन १९५४ मध्ये धीरेंद्र जेव्हा सर्वसेवा संघाचे अध्यक्ष झाले आणि देशामध्ये जीवनदानाचा प्रयोग सुरू झाला. भूदान, जीवनदान, ग्रामोदयोग, श्रमशिक्षण यामधून निर्माण होणारा समाज हा एक स्वतंत्र लोकशक्तीच्या स्वरूपात कामकाज करेल अशी धीरेंदांची धारणा होती. तेव्हापासून खादीग्राम या कार्यकर्त्यांच्या शिक्षणाचे एक मुख्य केंद्र बनले.

**परिवार भावनेचे चिंतन :**

खादीग्राममध्ये श्रम आणि समतेचा जो प्रयोग धीरेंद्र करीत होते. त्याचा क्रमबध्द विकास त्यांनी सांगितला आहे. हळूहळू नवीन लोक नवीन कार्यकर्ते येत गेले आणि चालू पध्दतीनुसार साम्ययोग परिवारात सहभागी होत गेले. या सहभागी होण्यामध्ये परिवारांशी पूर्वीचा कोणताच स्नेह संबंध नव्हता. त्यामुळे या परस्पर स्नेह संबधांच्या आधारानेच परिवार बनलेला होता. तो हळूहळू हलका होत गेला आणि शेवटी त्याचे स्वरूप हे संस्थात्मक रितीरिवाजाप्रमाणे झाले.

**ग्रामशाळा हाच सर्वोदयाचा मूळ आधार :**

ग्रामशाळेच्या या विचाराने धीरेंद्रांनी खादीग्राममध्ये सुरू असलेल्या प्रयोगांविषयी आणखी खोलात जावून विचार करण्याची प्रेरणा मिळाली. 'ग्रामशाळा हीच सर्वोदय आंदोलनाचा एकमात्र मूळ आधार होवू शकते'. (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:९९—१०४) धीरेंद्र या निष्कर्षापर्यंत येवून पोहोचले की, 'जर खादीग्राम मधील लोक आंदोलनाचे वाहक बनू इच्छित असतील तर ते खादीग्रामच्या चार भिंतींच्या आत राहून हे काम करू शकत नाहीत. त्यांना गावागावात जावे लागेल आणि जनतेत मिळून त्यांच्याआधारे किंवा त्यांच्याव्दारे आंदोलन चालविले पाहिजे. त्याचे रचनात्मक स्वरूप ग्रामशाळाच असेल'.'. (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:९९—१०४) थोडक्यात ग्रामशाळा हाच सर्वोदयाचा मूळ आधार आहे याची पक्की खात्री धीरेंद्रांना पटली होती व त्या दिशेने रचनात्मक कार्य पुढे नेत होते.

**बलिया येथील सर्वजनाधाराचा प्रयोग** :

धीरेंद्र मजुमदार यांनी ६ एप्रिल, १९६० साली सर्वजनाधाराच्या विचारावर जीवनाच्या नव्या अध्यायात पाऊल ठेवले. स्व.वैद्यनाथ चौधरी यांच्या प्रेरणेतून बिहारमधील बलिया (पूर्णिया) गाव सर्वजनाधार रचनात्मक प्रयोगासाठी धीरेंद्रांनी निवडले. याचवेळी धीरेंद्रांनी बलिया गावात येण्याचा उद्देश सांगितला आणि आशा प्रकट केली की, हे गाव प्रयोगक्षेत्र बनेल, तसेच ग्रामवासी सर्व बंधू—भगिनी या प्रयोगाचे साथीदार बनतील.

धीरेंद्रामार्फत घरात पोहचल्यानंतर बाकी कोणताही संदेश न देता फक्त चुली जोडण्याचाच संदेश दिला गेला.बलिया गावामध्ये जाण्यासाठी धीरेंद्रांनी गावासमोर काही अटी ठेवल्या होत्या. त्यातील मुख्य अट धीरेंद्र आणि त्यांचे साथीदार हे जनाआधारित होते व दुसरी गावातील सगळे लोक मिळून कोणतेही एक काम सामूहिक आणि सहकाऱ्यांनी करण्याचे ठरवावे.

गावकऱ्यांची बैठक झाली, त्यांनी त्यामध्ये तीन समित्यांचे गठण केले. १.शिक्षण समिती २.श्रमदान समिती ३.कृषी समिती. पहिल्या तीन चार दिवसात

मोकळा वेळ मिळेल तेव्हा शिक्षणाच्या बाबतीत धीरेंद्रांनी सांगितले की, आजकालचे शिक्षण हे समाधानकारक नाही. सारे गाव हे शिक्षणालय झाले पाहिजे. गावातील सारे कार्यक्रम हे शिक्षणाचे माध्यमे झाली पाहिजेत.

श्रमदान आणि सहकारी शेती या योजना तर धीरेंद्रांनी निश्चित रूपात त्यांच्यासमोर ठेवल्या होत्या तरीही त्यांनी शिक्षण समिती बनविली, हे पाहिल्यावर धीरेंद्रांना आनंद झाला. त्यामुळे धीरेंद्रांना असे समजले की, या समस्येची जाण या लोकांमध्ये आहे. तीन समित्या बनवून त्यांनी निश्चय केला की तीनही समित्यांचे सदस्य धीरेंद्रांना भेटतील आणि कार्यक्रमाबाबत चर्चा करतील. लोकांनी हे ठरविले की एक दिवस गावातील प्रत्येक जण त्या जमिनीवर जावून काम करेल. सहकाराच्या बाबतीत धीरेंद्र जो विचार मांडतात, तो वर्गसंघर्षाच्या पर्यायाचा शोध घेण्याचा प्रयत्न होता. बलियामध्ये जे काम चालू होते. ती सहकारी शेती नव्हती, परंतु 'सहकारी गाव' होते. मालक—मजूर रूपातील संघर्ष मिटविण्याच्या विचार सर्वांमध्ये सामावण्याचे ते एक पाऊल होते.

**निवडणुकीऐवजी सर्वसंमतीने निवड :**

बिहारमध्ये नव्या कायद्यानुसार ग्रामपंचायत आणि सरपंचाची निवडणूक चालू होती. बलिया भागातील पंचायतीमध्ये चार गावे सहभागी होती. एक उमेदवार बलिया गावाचा आणि एक कबीर गावाचा होता, धीरेंद्रांनी बलिया गावच्या लोकांना सांगितले की, तुम्ही लोकांनी सर्वांच्या संमतीने निवडणूक होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत'. गावकरी म्हणाले, 'काहीही होऊदे बलियातील सगळेजण एका बाजूला राहतील'. (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:११५) सर्वांच्या संमतीने निवडणूक होण्यासाठी धीरेंद्रांनी चर्चा सुरू केली.

धीरेंद्रांनी आधुनिक राजनीतीच्या वाईटपणामुळे गावा—गावाचे कसे तुकडे होत आहेत आणि कशा पध्दतीने दुसरी माणसे त्याला लुटतात हे सांगितले. काही लोकांनी सांगितले की, 'तुम्ही जे सांगाल त्याला आम्ही मत देवू. धीरेंद्रांनी सांगितले की, मी येथे निवडणूक करण्यासाठी आलो नाही तर फक्त विचार सांगण्यासाठी आलोय. आता मी तर येथून चाललोय. आपल्यापैकी

कोणाला ज्याला शिव्या द्यायच्या त्याला द्या, खूप झगडा करा परंतु सरपंचाचे नाव ठरवूनच येथून उठा'.(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:११६)

शेवटी लोकांनी धीरेंद्रांच्या गैरहजेरीत रात्री अकरा वाजेपर्यंत बऱ्याच वादविवादानंतर जुन्या सरपंचाचे नाव ठरविले. निवडणूक सर्व संमतीने संपन्न होऊन गावातील सर्व वर्गात उत्साह वाढला. हा उत्साह श्रमदान समितीच्या कामात दिसू लागला.

**सांस्कृतिक संबंधामध्ये परिवर्तन:**

समाजामध्ये जुन्या सांस्कृतिक परंपरांमुळे मालक आणि मजूर एकमेकांजवळ येण्यास संकोच करतात. या संकोचामुळे मजूर लोक स्वत:ला खालचे व वेगळे समजतात. हे संबंध वर्गभेदाचा एक दुसरा पैलू आहे. याच्या निराकरणासाठी प्रेमक्षेत्रामध्ये मालक मजूराचा संबंध हटवून दोघांनाही मालकाच्या रूपात सामूहिक शेतीमध्ये भागीदारी आहे. असा सिध्दांत पाहिजे. अशा प्रकारे नव्या सांस्कृतिक संबंधाची मुळापासून सुरूवात होईल. या प्रक्रियेमध्ये धीरेंद्रांनी दोन्ही गोष्टी एका वेळी आणण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये १.मालक—मजूर नात्याचे निराकरण, २.आर्थिक स्तरावर समानता आणण्याचा प्रयत्न करणे.

**नई तालीमची आवड :**

धीरेंद्रांच्या मते, गावागावामध्ये आपण बघतो की, सगळी मुले शाळेत जात नाहीत परंतु जे शाळेत आहेत त्यांच्याही मनात शिकण्याची आवड नाही, न शिकता, न अभ्यास करता मुलांना पास केले तर ते आणि त्यांचे आई वडील दोघेही खूष होतात. यातून असे सहज सिध्द होते की, तालीम प्राप्त करण्याची आवड नाही, फक्त प्रमाणपत्र प्राप्त करून नोकरीची आवड आहे'. (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:१२०) शेवटी नई तालीमचा व्यवस्थित कार्यक्रम सुरू करण्यापूर्वी, तालमीची आवड कशा तऱ्हेने वाढेल या दिशेने धीरेंद्रांचे चिंतन चालू होते व त्यांनी नई तालीमची आवड निर्माण केली.

**सर्वजनाधाराचे महत्व :**

धीरेंद्रांनी प्रत्येक कार्यक्रम हा सर्वजनाधारावर असला पाहिजे यावर भर दिला होता. धीरेंद्र मजुमदार याचा अर्थ असा सांगतात की, सर्वजणांना लोकसेवकांचे लक्ष काय आहे हे समजले पाहिजे. समाजासाठी त्यांची गरज आहे'.(चोळकर पराग (संपा.),२०००:१५) असे समजून जीवनाच्या नियमीत कार्यक्रमाच्या रूपाने सर्वोदय पात्र किंवा संपत्तीदान बाहेर काढले पाहिजे. वर्गणी गोळा करून संस्था चालविणे किंवा कार्यकर्त्यांची गुजराण करणे ही काही नवीन गोष्ट नाही. यातून काही नवीन क्रांती होणार नाही, ही प्रक्रिया प्राचीन आहे.

सर्वजनाधाराचे विचार समजण्यासाठी बलियामध्ये उपाशी राहण्यापर्यंत धीरेंद्रांना जावे लागले. तरीसुध्दा धीरेंद्रां सर्वजनाधारासाठी पाठपुरावा करीत राहिले.

**कार्यकर्त्याचा आर्थिक विचार :**

जे सहकारी जनाधाराच्या तत्वाला मानतात त्यांची मान्यता ही तिथेपर्यंत नाही जिथपर्यंत आपले सर्व काम जनाधारित असावे आणि त्या परिसरातील जनतेच्या आधारावर संयोजित करावे. धीरेंद्रा कार्यकर्त्यांचे आधार मुख्यत: पाच प्रकारचे असतील असे सांगतात ते खालीलप्रमाणे आहेत.

**१. केंद्रीय निधीचा आधार :**

केंद्रीय निधीचा अर्थ म्हणजे सरकारी कोष किंवा गैरसरकारी ट्रस्ट कार्पोरेशनचा फंड होय.

**२. संपत्तीदान (वर्गणी) :**

धीरेंद्र असे म्हणतात की, आंदोलनाच्या एका अंगाचे रूप म्हणून संपत्तीदानाचे काम तीव्रतेने चालणे जरूरीचे आहे.

**३. सर्वजनाधार :**

धीरेंद्रांनी सर्वजनाधार या विचारावर जास्त जोर दिला होता. धीरेंद्रांच्या मते, ही चेतना निर्माण करण्यासाठी विशेष पुरूषार्थ निर्माण करावा लागेल. म्हणजे लोकसेवकांची हिम्मत वाढेल आणि लोकशक्तीला अधिष्ठान मिळेल.

आजच्या बेहोश आणि उदासीन जनतेमध्ये जबाबदारीचा बोध निर्माण करण्यासाठी सर्वजनाधार आवश्यक आहे. नाही तर कोणत्याही कामासाठी जनतेत चेतना निर्माण होणार नाही.

**४. श्रमाधार :**

शरीर श्रमातून स्वावलंबी होऊन जनसेवा करणे अत्यंत कठीण आहे. श्रमाधारातून लोकसेवक स्वावलंबी होईल व तो जनतेच्या प्रेरणेचा स्त्रोत होईल. (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:१३०)

**५. आत्मविचार :**

क्रांतीसेवकाला नागरिकांमध्ये स्वत:ला प्रतिष्ठीत केले पाहिजे. जर कार्यकर्त्यांच्या रूपाने कोणता विशिष्ठ वर्ग उभा राहिला असेल तर समाज स्वावलंबी न होता विशिष्ट वर्गांवर आधारित होईल ते शांतीसेना किंवा सेवासेनाच्या रूपाने अहिंसक सेना निर्माण झाली पाहिजे'. हे समजूनसुध्दा धीरेंद्रांनी सेवासंघात जनाधाराच्या प्रस्तावानुसार शोध सुरू केला होता. त्यांची आस्था ही कार्यकर्त्यांसाठी स्वावलंबनाचीच राहिली होती.(नरेंद्रभाई(संपा. ),१९८१:१५)

**प्रौढामध्ये जागरूकता :**

धीरेंद्रांच्या मते, प्रौढ शिक्षणाचा मूळ उद्देश हा प्रौढांना चर्चेमध्ये सहभागी करून त्यांना बोलते करणे हाच होता. ज्याप्रमाणे लहान मुलांना क, ख, ग लिहण्यास शिकविले जाते तशाच प्रकारे प्रौढांनासुध्दा त्यांच्या हातामध्ये पेन देऊन लिहायला शिकविले जात होते. सुरूवातीला लिहीण्याऐवजी या प्रौढ व्यक्ती उभ्या आडव्या रेषा कागदावरती मारत असत त्यामुळे प्रौढांच्या हाताला धरून गुरूजी त्यांना लिहायला शिकवत होते'.(मजुमदार धीरेंद्र, २००१:४७२)

मुलांच्या त्यांच्या आवडीने त्यांना जसे पाहिजे तसे करण्यासाठी सोडले जाते त्या पध्दतीने प्रौढांना सोडले होते व प्रौढ शिक्षणावर जास्त भर दिला होता.

**ग्रामभारती :**

समकालीन शिक्षणप्रणाली संदर्भात भारतातील राजकीय पुढारी आणि जनता असंतुष्ट होते. तरीसुध्दा ही शिक्षणप्रणाली चालू राहिली. अशा परिस्थितीत नई तालीम शिक्षण व्यवस्थेच्या दिशेने प्राप्त परिस्थितीपासून प्रारंभ करण्याची आवश्यकता होती. आपण जनमत, शेती यासारख्या इतर साधनांच्याद्वारे प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम चालू ठेवला, परंतु त्यास आपण नई तालीमचे स्वरूप देवू शकलो नाही. यासाठी 'ग्रामभारती' संकल्पनेला 'ग्रामविद्यापीठाचे' स्वरूप देण्याची भूमिका धीरेंद्रांची होती. याचा अर्थ धीरेंद्रा गांवामध्ये विद्यापीठाची स्थापन करू इच्छित नव्हते, तर संपूर्ण गावालाच विद्यापीठामध्ये परिवर्तित करू इच्छित होते. धीरेंद्र मजुमदार यांच्या 'ग्रामभारती' संकल्पनेला लोकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला. १९६० ते १९६५ पर्यंत धीरेंद्रांनी ग्रामभारती संकल्पनेच्या माध्यमातून नव—नवे प्रयोग करून सहकार्य, सहजीवन, स्वाध्याय, श्रम व स्वावलंबी जीवन आणि भूमि—सेना अशी अनेक कार्ये हाती घेतली. नरेंद्रभाई व बिहार 'गांधी स्मारक निधी' मधील सहकार्यांबरोबर धीरेंद्र मजुमदारांनी ग्राम शिक्षणाचे प्रयोग सुरू केले. या शिक्षणाचे तीन वर्ग करून कृषी, पशुधन व नियंत्रित सामूहिक शेतीचे प्रयोग सुरू केले.

धीरेंद्र मजुमदारांच्या मते, गृहकार्य सुध्दा (घर—काम) ग्राम—भारती संकल्पनेच्या शिक्षणाचा कार्यक्रम आहे. (मजुमदार धीरेंद्र, १९६५: २३—२५) ग्रामभारती 'ग्रामस्वराज्य' क्रांतीच्या दिशेने जाण्याचे सातवे पाऊल आहे.

ग्रामभारती शिक्षण प्रयोगाच्या अनुभवामुळे धीरेंद्रांनी संपूर्ण कौटुंबिक शिक्षणाचा विचार लोकांसमोर ठेवला यासाठी पूर्ण कुटुंबालाच ग्रामभारतीचे विद्यार्थी म्हणून समावेश करण्याचा मानस लोकांसमोर ठेवला.

अशाप्रकारे धीरेंद्र मजुमदार यांनी 'ग्रामभारती' संकल्पनेच्या माध्यमातून राष्ट्रीय, सामूहिकसहजीवन, श्रम व स्वावलंबी जीवनाचे प्रयोग सुरू केले. मुलांना कौटुंबिक बंदिस्त जीवनातून मुक्त करून सामूहिक श्रमप्रतिष्ठा,

सहजीवन, सहकार, आर्थिक उत्पादनाचे धडे राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातून धीरेंद्र मजुमदार देऊ इच्छित होते.

**बरनपूर येथील ग्रामभारती प्रयोग :**

ग्रामस्वराज्याच्या संदर्भात श्रमाधारित स्वावलंबी जीवनाचे प्रयोग करता करता खेडेगावात सेवा, शिक्षण व संघटन यांच्याद्वारा ग्रामस्वराज्याचा पाया रचण्याचे प्रयत्न व्हावेत, म्हणून सन १९६० च्या एप्रिलमध्ये ग्रामदानी गाव बरनपूर, अलाहाबाद, उत्तरप्रदेश येथे ग्रामभारती या संस्थेची स्थापना केली. धीरेंद्र मजुमदार यांच्या 'ग्रामभारती' संकल्पनेला लोकांचा उत्सफूर्त पाठिंबा मिळाला. १९६० ते १९६५ पर्यंत धीरेंद्रांनी ग्रामभारती संकल्पनेच्या माध्यमातून नव नवे प्रयोग करून सहाकार्य, सहजीवन, स्वाध्याय, श्रमाधारीत व स्वावलंबीजीवन आणि भूमिसेना असे अनेक कार्य हाती घेतले.

बरनपूर गांवाचे संपूर्ण ग्रामदान झाल्यामुळे राजा विश्वनाथ प्रतापसिंह व सुरेशभाईनी ग्रामस्वराज्य संमेलनाचे आयोजन केले. या संमेलनात धीरेंद्र मजुमदारांना आमंत्रित करण्यात आले. बरनपूरास आदर्श ग्राम बनविण्यासाठी धीरेंद्रांनी नवनवे प्रयोग केले. शासकीय कर्मचाऱ्यांनी गावाच्या विकास कामात हस्तक्षेप न करण्याचा सल्ला धीरेंद्रांनी दिला. कारण गावाचा विकास जनसहभागाशिवाय शक्य नाही अशी धीरेंद्रांची भूमिका होती. जनसहभागाशिवाय शासकीय नोकरांना ग्रामविकास साधता येणार नाही. शासकीय योजनेने नाही तर, जनसहभाग व सहमतीने आदर्श गावांची उभारणी होऊ शकते अशी धीरेंद्रांची धारणा होती. अशा प्रकारे धीरेंद्र मजुमदार यांनी ग्रामभारतीचे प्रयोग उत्तर प्रदेशातील बरनपूर गावात नव्याने सुरू केले. सामूहिक शेतीचे यशस्वी प्रयोग केले. त्यामुळे लोकांमध्ये उत्साह वाढला.धीरेंद्रांनी जमीनीची सामूहिक मालकी, सामूहिक श्रम व सामूहिक विकासाची कल्पना भूदान चळवळीला जोडली.

**भूमीसेना :**

१९६२ ला बरनपूरमध्ये जिल्हा सर्वोदय मंडळाकडून शिबीर आयोजित केले होते. ग्रामभारती प्रचारकांनी लोकांना 'भूमीसेना' पक्षाची स्थापना करण्याचा सल्ला दिला. महिन्यातून एकदा या भूमीसेना पक्षांची सदस्यांनी एकत्रित येऊन प्रदेशातील समस्यांवर विचारविनिमय करण्याचे ठरविले. भूमीसेना संघटनेला मुक्त तंत्र व रूप देण्याचे निश्चित केले आणि संघटनेचा कोणीही रजिष्टर अथवा पदाधिकारी नसणार होते हे निश्चित केले होते. ११ डिसेंबर, १९६२ मध्ये मर्यादापूर गांवामध्ये बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीसाठी ३५ भूमीसेना सदस्यांनी सहभाग घेऊन त्या प्रदेशातील समस्यांवर चर्चा केली. कृषी विरोध आणि कृषी सुधारणा ही प्रदेशातील प्रमुख समस्या होती. पशुसंगोपनाचे लोकअभियान भूमीसेना सदस्यामार्फत सुरू झाले. कृषी—सुधारणा ही दुसरी समस्या होती. ग्रामभारती सहकाऱ्यांनी गावो—गावी शेती—सुधारणाविषयक जनजागृती करावी, कशी लोकांची भावना होती. यातून गणनेतृत्वाची कल्पना पुढे आली. त्यासाठी स्थानिक कुशल शेतकऱ्यांनाच मार्गदर्शक म्हणून नेमणूक करण्याचे ठरले. भूमीसेना दलाच्या बैठकीत स्थानिक नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाल्याने धीरेंद्रांना आनंद वाटला(चोळकर पराग (संपा.),२०००:१६)

अशाप्रकारे धीरेंद्र मजुमदार बरनपूरमध्ये आपल्या सहकाऱ्यांच्या बरोबर 'ग्रामभारती'च्या माध्यमातून स्वावलंबन जीवनाचे अहिंसक क्रांतीचे प्रयोग करीत होते. त्या प्रदेशातील लोकांमध्ये त्यांनी सकारात्मक व आश्वासक वातावरण निर्माण केले. लोकशिक्षणाच्या या प्रयोगामध्ये सुशिक्षित लोकांनी सहभाग घेतला. परिणामी बरनपूरमधील लोकांनी १० सप्टेंबर हा धीरेंद्र मजुमदारांचा जन्मदिवस 'श्रम जयंती' दिन म्हणून साजरा केला. श्रम जयंती दिनासाठी प्रदेशातील सुशिक्षित लोकांना निमंत्रित केले गेले. ज्या देशामध्ये श्रम अत्यंत अप्रष्ठित मानले जाते, त्या देशात श्रम—जयंतीचा दिवस साजरा करणे ही गोष्ट नवी दृष्टी ठरली. या कार्यक्रमात लोकांनी उत्साहाने सहभाग घेतला. हे केवळ धीरेंद्रांच्या श्रम व स्वावलंबी जीवनाच्या साधनेमुळे शक्य झाले.

बरनपूर क्षेत्रामध्ये विनोबांच्या आगमनासाठी १५ ग्रामदान घोषित झाले. बरनपूरमधून विनोबा गेल्यानंतर ६ आणखी ग्रामदान झाले अशा रीतीने बरनपूरला धरून २२ ग्रामदान झाले होते. ग्रामदानी गावांची एक सभा झाली त्या सभेमध्ये खालील कार्यक्रम ठरविले गेले.

१. ग्रामदान गावातील कोणीही व्यक्ती पोलिसांच्या दलालीचे काम करणार नाही.
२. सर्व नागरिकांना रोजगार देण्याचे आयोजन केले जाईल.
३. भूदानाच्या जमीन वितरणाबाबत झालेल्या भ्रष्टाचारावर विचारणा केली जाईल.
४. सरकारी विभागातील घाई, गडबड, धादंली दूर करण्यासाठी जनसंघटन केले जाईल.

भूमीसेना संघटनाचे क्षेत्र, दोन विकास खंडामध्ये पुढे नेले जाईल.(चोळकर पराग (संपा), २०००:१९)

अशा पध्दतीने लोक संघटनाच्या बाबतीत धीरेंद्र मजुमदार हे प्रयत्नशील राहिले आणि लोक संघटनांच्या माध्यमातून ग्रामदान गावातील व्यवस्था व्यवस्थितरित्या हाताळू लागले.

**लोक गंगा यात्रा :**

धीरेंद्रांच्या आयुष्यामध्ये लोक गंगा यात्रेला अत्यंत महत्व आहे. धीरेंद्रांनी १० सप्टेंबर, १९७१ रोजी आपल्या आयुष्याची एक्काहत्तरी पूर्ण करताच स्वत:शीच असा निर्वाणांचा निर्णय घेतला की, आता केवळ लोक गंगा यात्राच करावयाची आणि ती त्यांनी दि. २१ नोव्हेंबर, १९७८ साली देहमुक्त होईपर्यंत केली.(चोळकर पराग (संपा), २०००:१५ व १८४) धीरेंद्रांची या यात्रेतील विचारसरणी अशी होती की, गावोगावी जाऊन सरकारमुक्त गाव आणि पक्षमुक्त सरकार विषयक विचारांचा जागर करणे आणि त्यातून ग्रामस्वराज्य बळकट करणे. धीरेंद्रांने लोक–क्रांतीची प्रेरणा घेऊन बैलगाडीतून हा प्रवास करत खेडया–पाडयांच्या पायवाटा तुडवत, एका गावाहून दुसऱ्या गावाची पायपीट

करीत फिरत राहिले. तसेच या यात्रेत आलेल्या अनुभवावर विचारसुध्दा व्यक्त करीत राहिले.

धीरेंद्रांच्या मते, 'लोक गंगा यात्रेच्या उपासनेचे हेच वैशिष्टये आहे की, गंगा स्थिरच राहते, तर लोक गंगा मात्र हलती—डुलती आहे, म्हणूनच हिच्यात अनुभवांची विचित्रता फार जास्त आहे आणि विविधता पण काही कमी नाही.' (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:७—८) धीरेंद्रांच्या मते, 'लोक गंगा यात्रेचा निर्णय त्यांनी अत्यंत विचारपूर्वक, दिवसेंदिवसांच्या चिंतनातून घेतला. धीरेंद्रांसाठी तर हया वेगवेगळया संस्थाच गृहस्थाश्रम राहिल्या आहेत. साठ वर्षांचे वय झाल्यावर विचारपूर्वक धीरेंद्र मजुमदार संस्थांमधून मुक्त होऊन एका विशिष्ट प्रकारच्या स्वावलंबी लोकसेवकाचा मार्ग शोधू लागले, ज्याला ते वानप्रस्थ जीवन म्हणत आले होते.

या लोक गंगा यात्रेत धीरेंद्रांचा पहिला मुक्काम सुखासन या गावात होता. पहिल्या टप्प्यातील एक महिन्याच्या यात्रेदरम्यान धीरेंद्रांनी 'लोक दर्शन' आणि 'लोक उपासनेची' मोहीम सुरू केली. २३ एप्रिल १९७२ पासून धीरेंद्र यांनी बिहारमध्ये पुर्णिया जिल्हयाच्या रूपौली प्रखंडात लोक गंगा यात्रेला सुरूवात केली. धीरेंद्रांनी यात्रेच्या क्रमात एक नवा कार्यक्रम जोडला होता. तो म्हणजे ग्राम गुरूकुलासाठी दोन तासाचे प्रदर्शन हा कार्यक्रम होय. (नरेंद्रभाई (संपा. ),१९८१:९)

चार महिन्यात धीरेंद्र राजस्थान, गुजरात, मुंबई, वर्धा आणि उत्तर प्रदेशात जाऊन आले. या यात्रेतून धीरेंद्रांना एक गोष्ट पाहावयाला मिळाली की, सर्वोदय विचाराबद्दल जनतेत जिज्ञासा वाढली आहे. यानंतर धीरेंद्र ऑक्टोबरच्या शेवटी सहरसाला गेले आणि नोव्हेंबर पासून मुरलीगंज प्रखंडात आपल्या यात्रेस सुरूवात केली. याठिकाणी धीरेंद्रांनी कार्यकर्ता, कार्य आणि कार्यक्रम यावर अधिक भर दिला.(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:१०)

३ डिसेंबर, १९७३ रोजी सहरसा जिल्हयातील अंतर्गत बैठका, शिबिरे, संमेलनात धीरेंद्रांनी विचारांच्या माध्यमातून लोक गंगा यात्रा अव्याहत चालू

ठेवली. धीरेंद्र शोषित, दलित व मजूर मनुष्य समूहाला प्रतिष्ठा देऊन त्यांच्या उत्कर्षाचा प्रयत्न करीत होते. दि. १४ फेब्रुवारी १९७४ रोजी किसनगंज प्रखंडाची यात्रा पूर्ण केली. २५ फेब्रुवारी पासून राधोपुरची यात्रा चालू होती(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:१०)

आजमगढ जिल्हयाच्या मधुबन ब्लॉक मध्ये 'मधुबन' या ठिकाणी सर्व सेवा संघाची जमीन होती. त्या जमिनीला ठीक ठाक करून धीरेंद्रांनी तेथे राहू लागले. त्याचे नाव 'लोक गंगा धाम' असे ठेवले. या आजमगढ जिल्हयात धीरेंद्र यांनी भूदान, ग्रामदान, ग्रामस्वराज्य व सर्वोदय विचारांच्या प्रसारसाठी प्रयत्न करीत राहिले.(देवघरे रविंद्र (अनु.),२०१०:१८४)

यानंतर १५ जून १९७५ रोजी धीरेंद्रांनी यात्रेचे चौथे सत्र संपवून आणि श्री. गांधी आश्रम, फेफना, जि. बलिया येथे विश्रांतीसाठी पोहचले. शेवटी धीरेंद्रांची ही लोक गंगा यात्रा १९७१ पासून प्रारंभ होऊन मार्च १९७८ मध्ये पूर्ण झाली.(देवघरे रविंद्र (अनु.),२०१०:१८)

'लोक गंगा यात्रा' ही धीरेंद्र मजुमदार यांची स्वत:ची एक मौलिक देणगीच आहे. आपल्या मौलिक चिंतन आणि स्पष्ट दृष्टिकोनाने त्यांनी लोकजीवनाचे अगदी जवळून आणि सखोल निरीक्षण व अभ्यास केला होता. सामान्य जनतेला कशा प्रकारे तयार करावे जेणेकरून ते शासनमुक्त आणि शोषणमुक्त होतील, याची प्रक्रिया आणि पध्दती यांचे धीरेंद्रांनी लोक गंगा यात्रेमध्ये विस्तृत विवेचन केले आहे.

**स्वातंत्र्यानंतरची स्थिती :**

लोकशाहीतील लोकांच्याविषयी बोलायचे झाले तर धीरेंद्र असे म्हणतात की, 'आयुष्यभर ग्रामसेवा केल्याने त्यांना स्वत:ला लोकांची संपूर्ण ओळख झाली आहे'.(देवघरे रविंद्र (अनु.),२०१०:१८) त्यांच्या पाहण्यात हेच येत होते की, गेल्या पन्नास वर्षात भारतातील 'लोक' अगदी बदललेले आहे. देश स्वतंत्र झाला आणि त्यानंतर रस्ते, कालवे, पूल, वीज इत्यादी विकासाची अनेक कामे झाली. पण या विकासयोजनांच्या सोबतच लोकशाहीतील 'लोक'

चा कसलाच विकास झालेला नाही. (देवघरे रविंद्र (अनु.),२०१०:१८) धीरेंद्रांना असे वाटते की, ही जनता जणू काही पशूच्या मृत देहाप्रमाणे निपचित पडून आहे आणि असंख्य गिधाडे त्या भोवती जमून त्या पार्थिवाचे लचके तोडत मनसोक्त मेजवानी झोडताहेत'.(देवघरे रविंद्र (अनु.),२०१०:१९०) अशाप्रकारे शोषणाचे हे असे चौफेर चक्र चालले आहे. या शोषणाच्या रेटयात प्रत्येक माणूस भरडला जात आहे आणि तसेच दुसऱ्यांचे शोषण देखील करत आहे.

आज लोकसेवक देखील लोकांचे शोषण करतात. यावर धीरेंद्रांचे असे मत होते की, ''राज्यवाद व भांडवलशाहीच्या विस्तारामुळे जगभरात एक अत्यंत मजबूत आणि अभेद्य अशा सेवक वर्गाची सृष्टीची रचना झाली आहे. याच्या परिणामे 'सेवाकार्य' हे आता धर्म राहिले नसून केवळ एक प्रकारची 'धंदेबाजी' झाली आहे. याचा परिणाम असा झाला की, आज लोकसवेकांच्या शोषण आणि दमदाटीने जनता पिळली जात आहे.''(देवघरे रविंद्र(अनु.),२०१०:२०) असे विवेचन धीरेंद्र करतात जे आजच्या परिस्थितीत तंतोतंत लागू पडते.

पुढे देशातील सद्य:स्थितीचे विश्लेषण करताना धीरेंद्र असे म्हणतात की, ''देशात गरिबी, बेकारी, उपासमार, कुशिक्षण, सतत वाढती महागाई, नोकरशाहीचा आतंक, संविधानाच्या भावना व अपेक्षा आणि दिशादर्शक तत्वांची अवहेलना, राष्ट्रपती राजवट लादण्या विषयीच्या घटनात्मक तरतुदी अर्थात काही तरतुदींचे उल्लंघन, सत्तेचे वाढते केंद्रीकरण, व्यापक प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, लोकशाहीवर वाढती जोखीम इत्यादी बाबींनी सगळयाच पक्षातले नेते चिंतेत आहेत.''(मजुमदार धीरेंद्र,१९७३:४०)यावरून असे स्पष्ट होते की, आज देशात ना राजेशाही आहे ना लोकशाही आहे.

धीरेंद्रांच्या मते, ''देशातील ८० टक्के लोकसंख्या गावात राहते. परंतु आज गावांचे असे कुठल्याही प्रकारचे सचेतन असे अस्तित्व तर मुळीच नाही. (१९७३:४०—४१)

धीरेंद्रांनी एकाहून एक अशा प्रकारचे अदभुत प्रयोग केले. नई तालीमच्या क्षेत्रात धीरेंद्रांचे योगदान खरोखरी अमोल असेच आहे. धीरेंद्रांची लोक गंगा यात्रा हा एक विचार होता. ग्रामीण जनतेचे दु:ख, समस्या जवळून पाहून त्यावर उपाययोजना करण्याचे कार्य धीरेंद्रा करीत होते. लोक गंगा यात्रेमधील त्यांचे विचार व कार्य सर्वोदयाच्या उदयासाठी व वाढीसाठी अत्यंत महत्वाचे आहेत. आजच्या भांडवलशाही व्यवस्थेमधील होणाऱ्या प्रचंड शोषणाची व्याप्ती संपुष्टात आणण्यासाठी धीरेंदांचा कृतीशील सर्वोदय विचार आवश्यक आहे. हा विचार त्यांच्या लोक गंगा यात्रेमधून त्यांनी जनतेसमोर मांडला. थोडक्यात धीरेंदांनी कृती कार्यक्रम आखून रचनात्मक कार्यामधून स्वयंपूर्ण ग्रामीण भारताची उभारणी करण्याचा अत्यंत प्रामाणिक प्रयत्न केला.

**धीरेंद्र मजुमदार यांनी गांधी विचारांचा केलेला विकास**

महात्मा गांधींच्या विचारांचा वारसा उत्तर गांधीवादी विचारवंतानी प्रामुख्याने त्यामध्ये सर्वोदय परंपरा व लोकशाही समाजवादी या दोन परंपरामधून चालविला आहे. यामधील सर्वोदय विचारांमध्ये प्रामुख्याने विनोबा भावे, काकासाहेब कालेलकर, दादा धर्माधिकारी यांच्या बरोबर धीरेंद्र मजुमदार इत्यादी विचारवंत होते. तर लोकशाही समाजवादी परंपरेमध्ये आचार्य श.द. जावडेकर, आचार्य स. ज. भागवत इत्यादी विचारवंत होते. सदरच्या प्रकरणात धीरेंद्र मजुमदार यांनी गांधीवादाचा कशा प्रकारे विकास केला याची चर्चा करण्यात आली आहे.

महात्मा गांधीजींच्या उत्तर गांधीवादी शिष्यांमध्ये आचार्य विनोबा भावे यांचे स्थान अग्रगण्य आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील गांधीविचाराच्या विकासामध्ये आचार्य विनोबा भावे यांच्या योगदानाचा वाटा अधिक व्यापक आहे. विनोबांनी गांधी विचारातील प्रत्येक संकल्पनेचे आपल्या पध्दतीने व दृष्टीने जे विवरण केले आहे, ते अत्यंत मार्मिक, मूलगामी आणि तत्त्वगर्भ आहे.

गांधी—विनोबानंतर धीरेंद्र मजुमदार यांचे स्थान गांधी विचारांच्या विकासामध्ये प्राधान्याने येते. स्वातंत्र्योत्तर भारतातील गांधी विचारांच्या

विकासामध्ये धीरेंद्र मजुमदार यांच्या योगदानाचा वाटा अधिक व्यापक आहे. धीरेंद्रांनी गांधी विचारांच्या विविध पैलुंचे नुसते विवेचनच केले नाही तर त्यांनी प्रत्यक्ष प्रयोगातून गांधी विचारांचा कृतीशील विकास केला. एकीकडे गांधीजींची संघटन कुशलता, व्यवहार दक्षता व नेतृत्वगुण यांची विधायक कार्याच्या चळवळीला नितांत आवश्यकता होती. तर दुसरीकडे, महात्मा गांधीजींच्या विचारांमध्ये आणि रचनात्मक कार्यक्रमाच्या मांडणीमध्ये पुढचा टप्पा गाठण्याची गरज तत्कालीन काळात होती. ती पूर्ण करण्याचे काम धीरेंद्र मजुमदार यांनी केले आहे.

धीरेदांनी ग्रामोध्दार किंवा ग्रामसेवा यांच्यासंबंधी एक अतिशय मूलगामी चिंतन व्यक्त केले आहे. त्या अर्थाने ते गांधी विचाराचे भाष्यकार होते. गांधीच्या विचारात दडलेल्या ज्या सुप्त शक्ती आणि जी सर्जनशीलता होती, तिचा धीरेंद्रांनी अतिशय सुंदर शाब्दिक आविष्कार तर केलाच परंतु ती सगळीच्या सगळी तत्वे प्रत्यक्ष जीवनाला लागू करण्याचा स्वत:च्या व्यक्तिगत जीवनातून प्रयत्न केला. त्यामुळे धीरेंद्रांचे सगळे जीवन एका प्रयोगशील व्यक्तीचे जीवन आहे. गांधी विचारांची मूलगामीता आणि क्रांतीकारीता त्यांनी अतिशय मार्मिक पध्दतीने स्पष्ट केली आहे. विचारवंत, रचनाकार, क्रांतीकारक, समाजसेवक या तीनही नात्यांनी धीरेंद्रांनी महात्मा गांधी आणि विनोबांच्या विचारांचा विकास केला आहे.

**महात्मा गांधीच्या सत्याग्रह विचारांचा केलेला विकास:**

आधुनिक भारतात राजकीय प्रतिकाराची मांडणी प्रामुख्याने राष्ट्रवादाच्या पार्श्वभूमीवर वासाहतिक कालखंडामध्ये साम्राज्यवाद्यांशी संघर्ष करताना झाली. महात्मा गांधींनी राजकीय चळवळीस प्रामुख्याने दक्षिण अफ्रिकेतून प्रारंभ केला होता. १९०६—०७ साली दक्षिण अफ्रिकेत असताना गोऱ्यां लोकांनी भारतीयांना दिलेल्या वाईट वागणूकीच्या विरोधात ही चळवळ उभी केली होती. या लढयामधूनच त्यांचे 'राजकीय प्रतिकाराचे' प्रारूप विकसित झाले. पुढे या राजकीय प्रतिकाराला 'सत्याग्रह' असे नाव दिले. १९१०—११ साला पर्यंत गांधींजीनी 'नि:शस्त्र राजकीय प्रतिकार' आणि 'सत्याग्रह' या दोन्ही नावांचा

वापर केला. १९०९ मध्ये महात्मा गांधींनी 'हिंदस्वराज्य' पुस्तक लिहीले. भारतीयांनी तत्कालीन ब्रिटीश शासनाच्या अन्यायाविरूध्द कसा राजकीय प्रतिकार किंवा सत्याग्रह केला पाहिजे, या विचारांच्या संदर्भात 'हिंदस्वराज्य' या पुस्तकामध्ये विवेचन केले आहे.(चौसाळकर अशोक, २००८:९) गांधींजींचे सत्याग्रह सिध्दांताचे तत्वज्ञान हे त्यांच्या विशेषत: 'कर्मयोग' व 'अनासक्तीयोग' या तत्वज्ञानावर आधारीत आहे. महात्मा गांधी हे सत्याचे व अहिंसेचे पुरस्कर्ते होते. गांधींनी १९१७ मध्ये चंपारण्य येथे निळीचा सत्याग्रह केला तर १९१९ साली रौलेक्ट कायद्याविरूध्द केलेला सत्याग्रह महत्वाचा ठरला. कारण याद्वारे त्यांनी भारतात सत्याग्रहाचा मार्ग प्रत्यक्षात मांडला. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रामुख्याने त्यांनी असहकार चळवळ, सविनय कायदेभंगाची चळवळ, चलेजाव चळवळ या तीन महत्वाच्या चळवळी केल्या.महात्मा गांधींचा जो जागतिक विचारवंतात समावेश झाला तो त्यांनी मांडलेला सत्याग्रह सिध्दांतामुळेच होय. सत्याग्रह ही महात्मा गांधींच्या तत्वज्ञानातील महत्वाची संकल्पना आहे. या सत्याग्रहाच्या सिध्दांताचा महात्मा गांधींनी उत्तरोत्तर विकास केला.(तेंडुलकर डी.जी.,१९५३:४)

आचार्य विनोबा भावे यांनी महात्मा गांधींच्या सत्याग्रह या संकल्पनेचा जास्त ठोस स्वरूपात विकास करण्याचा प्रयत्न केला. धीरेंद्र हे महात्मा गांधी आणि विनोबांच्या सत्याग्रहाच्या विचारांचा विकास करतात आणि ते विचार प्रत्यक्ष कृतीशील प्रयोगात आणतात. धीरेंद्रांच्या मते, भारतात स्वातंत्र्यासाठी जे आंदोलन झाले ते क्रांती नव्हते, तर ते एक युध्द होते कारण त्याचे ध्येय इंग्रजांच्या हातातून सत्ता काढून घेणे हे होते. सन १९४२ च्या शेवटच्या लढाईला आम्ही क्रांती म्हटले होते. परंतु ती सुध्दा क्रांती नव्हती.

धीरेंद्रा फ्रान्स, रशिया या देशामध्ये क्रांती झाली नाही तर राजसत्तेच्या विरोधात विद्रोह आणि उठाव झाला आहे म्हणतात. कारण या विद्रोहमुळे राजसत्ता गेली आणि त्याठिकाणी भांडवलशाही व लष्करशाही आली. क्रांतीमध्ये अपेक्षित असणारे मुल्यपरिवर्तन झाले नाही. धीरेंद्रांच्या मते, ग्रामस्वराज्यासाठीचे आंदोलन हे एखाद्या स्थानिक तसेच तत्कालीन परिस्थितीला बदलण्यासाठीचा कार्यक्रम नाही. स्पष्ट स्वरूपात राजकारणाच्या ठिकाणी

समाजकारणाची स्थापना करण्यासाठी गांधीजींच्या विचारांना मूर्त रूप देण्यासाठीचे एक कायमस्वरूपी आंदोलन आहे.

धीरेंद्रांच्या मते, क्रांतीचे ध्येय हे ग्रामस्वराज्य किंवा लोकस्वराज्याची स्थापना करणे हे आहे आणि त्यासाठी राज्यसंस्थेला बदलण्याऐवजी तिच्यापासून मुक्ती मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यानंतर त्यासाठी लागणारी मुलभूत शक्ती ही ग्रामपरिवाराची असणार आहे. ग्रामपरिवाराची स्थापना परस्पर संघर्षाव्दारे होवू शकणार नाही. त्यासाठी एकमेकांविषयीची समजदारी वाढविली पाहिजे. गरज पडल्यास नैतिक दबाव सुध्दा टाकता येईल. ते लाथ मारून संपवून टाकण्याची प्रक्रिया तर निवडणारच नाहीत आणि ते स्थितीशीलतेचाही स्वीकार करणार नाहीत, हाच रिअप्रोचमेंट चा सिध्दांत आहे.(नरेंद्रभाई (संपा. ),१९८१:४३)

धीरेंद्र मजुमदार आज लोकशाहीमध्ये क्रांतीचे वैचारिक मुद्दे कोणते असतील हे स्पष्ट करताना चार मुद्दे मांडतात की, क्रांतीचे क्षेत्र हे सर्वव्यापी राज्यव्यवस्था आणि भांडवलवादापासून पूर्ण मुक्ती मिळवणे हे असते हा पहिला मुद्दा सांगतात. दुसरा मुद्दा क्रांतीची शक्ती ही लोकसहमती व लोकसहभाग असणार आहे. तिसरा मुद्दा क्रांतीचे साधन ग्राम भावनेने ओतप्रोत ग्रामपरिवार व ग्रामसभा असेल. शेवटी चौथा मुद्दा म्हणजे क्रांतीची पध्दती किंवा मार्ग हा सहकारी म्हणजे रिअप्रोचमेंटचा असेल.(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:४३)

धीरेंद्रांचा 'रिअप्रोचमेंटचा सिध्दांत म्हणजे सौहार्दपूर्ण संबंधाच्या पुनर्स्थापनेचा सिध्दांत आहे जो प्रेम, मनोमिलन व समजूतदारपणावर भर देतो.

महात्मा गांधीच्या सत्याग्रहाच्या विचारांचा विकास विनोबा भावे हे विरोधकाला योग्य चिंतन करण्यास मदत करा (असिस्ट द अपोझिट मॅन इन राइट थिकिंग) या रूपात करून सत्याग्रही होण्यासाठी सत्यग्राही झाले पाहिजे असे सांगतात. (नरेंद्रभाई (संपा.),१९८१:४४) तर धीरेंद्र मजुमदार गांधी विनोबांच्या पुढे जाऊन आपला विचार मांडतात आणि सत्ता परिवर्तनासाठी राजकीय प्रतिकाराचा उपयोग न करता वर्गसंघर्ष संपविण्यासाठी रिअप्रोचमेंटची

संकल्पना मांडतात. या रिअप्रोचमेंटच्या संकल्पनेतून गांधी विनोबांच्या सत्याग्रहाचा विकास धीरेंद्र करतात.

**ग्रामस्वराज्याच्या विचाराचा विकास आणि ग्रामोद्योगास चालना :**

महात्मा गांधींनी स्वातंत्र्य लढयाबरोबर आंदोलनातील सत्याग्रही लढयाबरोबर ग्रामीण स्वराज्याला रचनात्मक कार्याची जोड दिली. गांधीनी स्वातंत्र्य पूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात रचनात्मक कार्याच्या दृष्टीने 'खेडयाकडे चला' असा संदेश सर्व भारतीयांना दिला आणि ग्रामस्वराज्याच्या कल्पनेचा विचार मांडला. ग्रामस्वराज्याचा प्रयोग प्रत्यक्ष कृतीत गांधी आणि विनोबांनी आणला. धीरेंद्रांनी सुध्दा ग्रामीण स्वराज्याचा विचार मांडून प्रत्यक्षात कृतीतून म्हणजे रचनात्मक कार्यातून आयुष्यभर उतरविण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधीच्याप्रमाणे धीरेंद्रांनी विकासाच्या दृष्टीकोनातून खेडे हा घटक केंद्रबिंदू मानलेला आहे. भारतातील ग्रामीण पुनर्रचना आपल्याला कशा प्रकारे करता येईल, हाच ध्यास आयुष्यभर धीरेंद्रांनी बाळगला. ग्रामीण भागामध्ये राहणारी जी सर्वसामान्य जनता आहे तिला आपण या देशाचे खरे मालक आहोत असे वाटले पाहिजे. त्यांचा आपल्या जीवनावर आणि भविष्यावर अधिकार आणि ताबा असला पाहिजे आणि ते जीवन खऱ्या अर्थाने शोषणमुक्त आणि शक्य तितके शासननिरपेक्ष तसेच स्वावलंबी असले पाहिजे. या दृष्टीने धीरेंद्र मजुमदार यांनी आयुष्यभर प्रयोग केले. (चोळकर पराग (संपा.),२०००:७)

धीरेंद्रांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील गावांमध्ये शोषण निराकरणाचा कार्यक्रम आणि त्याविषयी विचार प्रसारित करण्यासाठी उत्तर प्रदेश आणि बिहारमधील रणीवा, जमुई, बलिया, बरनपूर येथे आणि लोक गंगा यात्रेच्या माध्यमातून हे त्यांनी आयुष्यभर प्रयोग केले. हाच गांधी विनोबांच्या ग्रामस्वराज्याच्या प्रयोगाचा त्यांनी केलेला विकास आहे.

**शिक्षण विषयक विचाराचा विकास :**

धीरेंद्रा वर्ग परिवर्तनाच्या कार्यक्रमासाठी श्रमावर आधारित शिक्षण व्यवस्थेचा पुरस्कार करीत होते. गांधीजींच्या शिक्षण पध्दतीमधील श्रमप्रतिष्ठेला ते जास्त महत्व देतात आणि त्याचा विकास करतात.

बुनियादी शिक्षण व्यवस्थेमुळे मनुष्य श्रमप्रतिष्ठेचा आदर करेल व परिवर्तन चळवळ जास्त जोरदारपणे सुरू होईल असे धीरेंद्रांना वाटते. कारण आजच्या प्रचलित शिक्षणव्यवस्थेची अप्रस्तुता, ग्रामीण जीवनाशी त्याचा अंगभूत संबंधविच्छेद आणि त्यातील विषमता वाढीला लावणारा आशय स्पष्टपणे दिसू लागतो. यातूनच धीरेंद्रांचे 'नई तालीम' विषयीचे नवे चिंतन निर्माण झाले. म्हणून समग्र ग्रामजीवन हेच शिक्षणाचे माध्यम कसे होईल, सगळे गावच पाठशाळा कसे होऊ शकेल याचा विचार होणे अगत्याचे आहे. यातूनच पायरी—पायरीने स्वावलंबी किंवा जनाधारित अनौपचारिक अशा नई तालीमचे नवे रूप साकारण्याचा प्रयत्न ते करीत होते. (मजुमदार धीरेंद्र ,२००१:४१)

नव्या शिक्षण व्यवस्थेत नवी मूल्ये आणि नव्या मूल्यांची निर्मिती व्यवस्थेकडून अपेक्षित असते. म्हणूनच धीरेंद्रांनी 'नई तालीम' च्या माध्यमातून गांधींना अभिप्रेत असलेली मूल्य मान्यता परिवर्तनाच्या शिक्षण पध्दतीचा विचार मांडला.

**ब्रह्मचर्य :**

महात्मा गांधींच्या मतानुसार ज्याने सत्याचे व्रत घेतले आहे आणि केवळ सत्याचीच अनन्य उपासना चालविली आहे, तो जर आपली बुध्दी अन्य कार्यात वेचील, तर त्यांने सत्याशी प्रतारणा केली असे होईल. सत्याचा पूजक इंद्रियांचा सेवक कसा बनेल यातून गांधींजी ब्रह्मचर्य व्रत्ताचे महत्व सांगतात. महात्मा गांधींनी ब्रह्मचर्य व्रताचा विचार मांडला आणि आयुष्याच्या मध्यापासून त्याचे पालन केले. परंतु विनोबा भावे यांनी खऱ्या अर्थाने आयुष्यभर ब्रह्मचर्य व्रताचे कृतीतून पालन करून या व्रताचा विकास केला. याबरोबरच गांधी—विनोबांचे रचनात्मक शिष्य धीरेंद्र मजुमदार यांनी आयुष्यभर ब्रह्मचर्य व्रताचे पालन करून

स्वत:ला ग्रामीण जीवनात गाढून घेऊन सामाजिक क्रांती केली. यातूनच धीरेंद्र मजुमदार यांनी ब्रह्मचर्य व्रताचा विकास केला.

ब्रह्मचर्य म्हणजे काया, वाचा, मना या सर्व इंद्रियांचा संयम होय. या संयमासाठी त्यागाची आवश्यकता आहे. त्यागाच्या क्षेत्राला जितकी सीमा नाही तशी ब्रह्मचर्याच्या महिम्यालाही सीमा नाही. अशी धीरेंद्र मजुमदार यांची धारणा होती.(पांढरीपांडे सु. श्री.,२००९:३)

या ब्रह्मचर्य व्रत्ताचा आणि गांधी विनोबाजींच्या विचार आणि कृतीतून जो विचार पुढे आला त्याचा विकास धीरेंद्र मजुमदार यांनी केला आहे.

**गांधी विनोबांच्या अहिंसक समाज रचनेच्या विचारांचा विकास :**

गांधी विनोबांनी जो अहिंसात्मक समाज व्यवस्थेचा आणि सर्वोदय समाजाचा विचार मांडला होता. त्याचा विकास धीरेंद्रानी आपल्या शोषणहीन आणि शासनमुक्त समाजाच्या रूपात ग्रामस्वरूपाच्या स्थापनेतून मांडला. धीरेंद्र गांधी—विनोबांच्या अहिंसक समाज रचनेच्या विचाराचा विकास असा करतात की, अहिंसक समाज म्हणजे हिंसारहित समाज म्हणून आपण समाजातून मुळात हिंसा कशी नष्ट होईल याचा विचार केला पाहिजे. पण हिंसा नावाची स्वतंत्र अशी वस्तू नाही, शोषणवृत्तीचा तो परिणाम आहे.

धीरेंद्र असे स्पष्ट करतात की अहिंसक समाजाचे समर्थक कधीही शोषणाला पाठिंबा देवू शकत नाहीत. ते तर शोषणाच्या प्रक्रियेलाच हिंसा समजतात. हिंसेचे स्थूल रूप कदाचित दिसणारही नाही, परंतु शोषण खुद्द एक भयंकर हिंसा आहे. धीरेंद्र हे समजूनच शोषणहीन आणि शासनमुक्त अशा समाजाच्या रूपात ग्रामस्वराज्याची स्थापना करणे हे त्यांचे ध्येय आहे. रचनागत शोषण हे सूक्ष्म शोषणाचे केवळ एक रूप आहे आणि या सूक्ष्म शोषणाची इतरही रूपे असू शकतात व असतात याचेही अतिशय तरल असे भान त्यांना होते. म्हणूनच आदर्श समाज हा केवळ शोषणहीन असून पुरेसे नाही. तो शासनमुक्त किंवा शासननिरपेक्ष असणेही तितकेच अनिवार्य आहे असे ते मानतात. (मजुमदार धीरेंद्र,१९५४:४६—४७)

याच विचारानुसार धीरेंद्र संपूर्ण जीवन रचनात्मक प्रयोगासाठी समर्पित करतात आणि त्याचा विकास करतात.

**साम्ययोग:**

महात्मा गांधींच्या अंत्योदयाच्या विचारांचा विकास आचार्य विनोबा भावे यांनी सर्वोदय आणि साम्ययोग या दोन पध्दतीत विकास केला. विनोंबाना साम्ययोग हा साम्यवादाला पर्याय वाटत होता. त्यांनी साम्ययोग व सर्वोदय या कल्पना त्यास पर्यायी वापरल्या आहेत. विनोबा ज्यावेळी आपले विचार मांडत होते, त्यावेळी भांडवलशाही व साम्यवादी या दोन विचारसरणीमध्ये संघर्ष चालू होता. या दोन्ही व्यवस्थेवर टीका करून विनोबांनी साम्ययोगाची संकल्पना विकसित केली आहे. धीरेंद्रांनी याच साम्ययोग विचारांचा विकास केला आहे. धीरेंद्रांचा एका बाजूला श्रमाचा अभ्यास चालू होता. दुसऱ्या बाजूला आपल्या सहकाऱ्यांबरोबर सतत वर्ग परिवर्तन विचारांची चर्चा चालू होती. हुजुराला मजूर बनवायचे आहे, ही दृष्टी धीरेंद्रांना चांगल्या प्रकारे मिळाली होती. स्वावलंबन आणि साम्याच्याविना श्रमसाधना जिवंत राहू शकत नाही.

खादीग्राम येथे वर्गनिराकरणाच्या प्रयोगाला धीरेंद्रांनी सुरूवात केली. कार्यकर्त्यांच्या शिक्षणाच्या दृष्टिकोनातून धीरेंद्र असे म्हणतात की, वर्गविरहीत समाजामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक कार्यकर्ता उत्पादन, व्यवस्था, तसेच शिक्षण अशा तिन्हीवर काम करेल. अशाप्रकारे गांधी विनोबा यांच्या सर्वोदय आणि साम्ययोग विचारांचा विकास धीरेंद्रांनी केला.(नरेंद्रभाई (संपा.),१९८१:१३४)

**कार्यकर्ता, कार्यक्रम आणि कार्यशैली याबाबतची भूमिका :**

कुठलाही निश्चित, आखलेला कार्यक्रम घेऊन कार्यकर्त्यांने गावात प्रवेश करू नये, गावाचाच एक ग्रामस्थ बनून सगळयांचा शेजारी व्हावे, ग्रामजीवनाशी समरस व्हावे आणि शक्य तितके दुसऱ्यासाठी जगावे अशी धीरेंदांची विचारसरणी होती. या जीवनशैलीतून आपोआप कार्यक्रम निर्माण होईल आणि त्या कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सहकार्य मिळण्याचा संभव

अधिक राहील अशी त्यांची धारणा होती. कार्यक्रमासाठी कार्यकर्त्याने आतूर होण्याची गरज नाही. कार्यक्रमाची निर्मिती ही एक स्वाभाविक प्रक्रिया व्हावयास हवी. गावाला आपले प्रेमक्षेत्र मानून त्याचा विस्तार आणि खोली वृध्दिंगत करणे आणि श्रमनिष्ठ जीवन व्यतीत करणे हेही परिवर्तनाचेच काम आहे. कार्यकर्ता, कार्यक्रम आणि कार्यशैली या तिन्ही घटकांच्या संदर्भात धीरेंद्रांची ही भूमिका जितकी नाविन्यपूर्ण होती तितकीच ती मौलिकही होती. समाजक्रांती हा कोणत्याही अर्थाने कार्यकर्त्यांचा व्यवसाय होऊ शकत नाही. ती एक स्वाभाविक प्रक्रिया असली पाहिजे, हे या विचारातील नवे वैशिष्टय होते. कार्यकर्ता हा ग्रामीण जीवनाशी समरस झाला पाहिजे, ग्रामस्थांचा जीवनसंघर्ष हा त्याचाही जीवनसंघर्ष असला पाहिजे आणि त्याचवेळी त्याच्या आगळयावेगळया जीवनशैलीतून, करूणार्द्र व्यवहारातून नव्या जाणिवांचा आणि रचनांचा हळूवार पदन्यास ध्वनित झाला पाहिजे ही त्यांची विचारसरणी मौलिक होती. क्रांतिकारी पुरूषार्थात समग्र ग्रामस्थांच्या म्हणजे जनतेच्या उत्स्फूर्त सहभागाची एक हमी त्यात दडलेली होती. (देवघरे रविंद्र (अनु.),२०१०:७६—८०)

अशा प्रकारे धीरेंद्रांनी कार्यकर्ता, कार्यक्रम व कार्यशैली याबाबतीत सविस्तर विवेचन केलेले आहे.

**स्वावलंबन आणि अस्पृश्यता निवारणासाठी चरख्याचा प्रयोग:**

१९३० च्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनास सुरूवात झाली. याकाळात खादीची मागणी इतकी वाढली की, खादी—उत्पत्ती कार्यातच धीरेंद्र बुडून गेले. त्यामध्ये चरख्याचा प्रयोग महत्वाचा होता. यातून चरखा हा स्वावलंबी कार्यक्रम हाती घेण्याचा विचार धीरेंद्र मजुमदारांनी केला. हळूहळू अनेक गावांमध्ये चरखे चालू लागले. गावातील लोक सुत कातणे आणि कापड विणणे ही दोन्ही कामे करू लागली आणि स्वावलंबी झाले. यातून सुतकताई आणि कापड विणणे या कार्यक्रमातून गावातील अनेक जाती, धर्मातील लोक एकत्रित येऊ लागले आणि गावातील पारंपरिक विचार आणि स्पृश्यअस्पृश्यतेचा विचार दूर होताना दिसत होता. बघता बघता गावागावात चरख्यांचा फार प्रचार

होऊ लागला आणि दिवसेंदिवस चरख्यांची मागणी अधिक वाढू लागली. तेव्हा तत्काळ बिहारमधील चरखा संघाकडून चरखे मागविण्यात आले. (नरेंद्रभाई (संपा.), १९८१:७८—७९) गांधी विनोबांच्या चरखा विचारांतील स्वावलंबी विचारांचा धीरेंद्रांनी प्रत्यक्ष प्रयोगाच्या माध्यमातून विकास केला आहे.

**राज्यविरहित समाज—अराज्यवादाची भूमिका :**

महात्मा गांधींनी राज्यविरहित समाज व त्याच्या पुढे अराज्यवादी समाजाच्या निर्मितीची अपेक्षा केली आहे. शासन विरहित समाजरचना स्थापन करून सर्वांची उन्नती करणे हा धीरेंद्रांच्या विचारांचा गाभा आहे. शासनविरहित समाज कशाप्रकारे अस्तित्वात येईल याविषयी धीरेंद्र आपले विचार सूक्ष्मपणे मांडतात. धीरेंद्रांच्या मतानुसार वास्तविक पाहता ही काही नवीन कल्पना नाही. ईसा चे पृथ्वी वरील स्वर्गीय राज्य, कार्ल मार्क्सची 'वर्गविरहीत समाज', प्रिन्स क्रोपोटकीन यांचा 'अराज्यवाद' इत्यादी सर्व संकल्पना या एकाच वस्तूंची विविध रूपे आहेत. 'भूदानप्रणीत—ग्रामोद्योगप्रधान—अहिंसक—क्रांती' या छोटयाशा सूत्रात शासन विरहीत समाज रचनेच्या व्यावहारिक क्रांतिसाठीच्या मार्गाचे संपूर्ण दिशानिर्देशन केलेले आहे असे धीरेंद्र म्हणतात. (मजुमदार धीरेंद्र,१९५४:५२—५४) महात्मा गांधीच्या राज्यविरहित समाज व अराज्यवाद तसेच विनोबांनी मांडलेल्या भूदानातून अहिंसक समाजाची निर्मिती या विचारांचा धीरेंद्र मजुमदार यांनी विकास केला आहे.

**समारोप :**

धीरेंद्रांनी गांधीवादी कार्याचा नवा अर्थ लावण्याचा आणि त्याचा विकास करण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधीच्या सत्याग्रह विचारांचा जो विनोबांनी विकास सम्यक् चिंतनात 'अहिंसक सहयोग' यामध्ये सांगतात, तर धीरेंद्र मजुमदार गांधी विनोबांच्या पुढे जाऊन आपला विचार मांडतात आणि सत्ता परिवर्तनासाठी राजकीय प्रतिकाराचा उपयोग न करता वर्गसंघर्ष संपविण्यासाठी रिअप्रोचमेंटची संकल्पना मांडतात. या रिअप्रोचमेंटच्या संकल्पनेतून गांधी विनोबांच्या सत्याग्रहाचा विकास धीरेंद्र करतात. महात्मा गांधी आणि विनोबांनी

स्वातंत्र्य लढयाबरोबर आंदोलनातील सत्याग्रही लढयाबरोबर ग्रामीण स्वराज्याला रचनात्मक कार्याची जोड दिली. धीरेंद्रांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील गावांमध्ये शोषण निराकरणाचे रचनात्मक प्रयोग केले. ब्रम्हचर्य, नई तालीम, शासनमुक्त व शोषणमुक्त समाज निर्मितीसाठी धीरेंदांनी कृतीशील कार्यक्रमाद्वारे गांधीवादी विचारांचा विकास केला आहे.

*************

# प्रकरण सहावे
# उपसंहार व निष्कर्ष

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी हे युगप्रवर्तक विचारवंत म्हणून ओळखले जातात. महात्मा गांधी यांनी आधुनिक भारताच्या सामाजिक व राजकीय जीवनात अनन्य साधारण असे कार्य केले आहे. महात्मा गांधींना संपूर्ण भारतात मोठया प्रमाणात अनुयायी मिळाले. विशेषत: महाराष्ट्रातून अनेक बुध्दिवादी विचारवंत व कार्यकर्ते त्यांना मिळाले. या अनुयायांनी महात्मा गांधीजींचे सिध्दांत आणि व्यवहार या दोन्हींही क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली आहे. गांधी विचारांचा नव्याने अन्वयार्थ लावण्याचे व त्याचा विकास करण्याची कामगिरी महाराष्ट्रातील तसेच भारतातील महात्मा गांधीजींच्या शिष्यांनी केली, त्यांनाच उत्तर गांधीवादी विचारवंत म्हणून ओळखले जाते. त्यांच्या विचाराच्या संदर्भात समकालीन समस्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न या अभ्यासामध्ये केला आहे.

सर्वोदय विचार परंपरेतील ज्येष्ठ विचारवंत आणि महात्मा गांधी व आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांना तत्कालीन समाजात रचनात्मक कार्यक्रमाद्वारे प्रत्यक्ष कृतीमध्ये आणणारे कृतीशील विचारवंत म्हणून धीरेंद्र मजुमदार यांना ओळखले जाते. धीरेंद्र मजुमदार यांच्यावर विशेषत: महात्मा गांधींजी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी गांधी—विनोबा विचारांचा आपल्या कृतीशील कार्यामधून आणि वैचारिक चिंतनातून विकास केला.

धीरेंद्र मजुमदार हे 'धीरेंदा' या नावाने सर्वोदय परिवारात प्रसिध्द होते. महात्मा गांधीजींच्या तत्वज्ञानाचे भाष्यकार म्हणून धीरेंद्रांचे कार्य महत्वाचे आहे. आपल्या पत्ररूपी विचारातून आणि 'नई तालीम' या मुखपत्रातून महात्मा गांधीजींच्या विचाराला बदलत्या परिस्थितीमध्ये जुन्या व नव्या पिढीला विचारांचा कृतीशील आयाम दिला. जुन्या व नव्या पिढीमध्ये समन्वय साधून, प्रबोधनामधून

आणि लोकशिक्षणातून त्यांनी १९२१ च्या असहकार चळवळीपासून त १९७८ पर्यंतच्या लोक—गंगा—यात्रा या कृतीशील कार्यक्रमापर्यंत समग्र ग्राम सेवा व रचनात्मक कार्य केले.धीरेंद्र मजुमदार हे केवळ ग्रामदान चळवळीतील कार्यकर्ते नव्हते, तर स्वतंत्र विचारवंत होते.

धीरेद्रांच्या मतानुसार, महात्मा गांधीजीचा विचार समजून घेऊन त्याप्रमाणे आचरण केले तर, गांधी विचारांचा विकास होईल व त्यामधून नव्या प्रकारची राजकीय व सामाजिक व्यवस्था स्थापन करता येईल. यामध्ये वर्गविहीन समाज, शासनविहीन समाज, लोकशाही, भूदान, अहिंसक क्रांती, स्वराज्य आणि नई तालीम या विषयावरील त्यांचे विचार अनेक बाबतीत गांधी विचारांना पुढे नेतात. गांधीवादाचा नवा अर्थ लावण्याचा व त्यानुसार रचनात्मक कार्यक्रमांतर्गत गांधी विचारांना प्रत्यक्ष समाजात विकसित करण्याचा प्रयत्न त्यांनी आयुष्यभर केला. राजकीय व्यवस्था ही विकेंद्रीकरणांवर आधारित असावी आणि या माध्यमातून ग्रामसभेला जास्तीत जास्त अधिकार मिळावेत असा प्रयत्न त्यांनी ग्रामदान चळवळीतून केला होता. त्यांनी 'लोक गंगा यात्रा' या कार्यक्रमांतर्गत गांधी विचारांचा प्रसार केला. धीरेंद्र मजुमदार यांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांचा एक चिकित्सक अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.

**अ) सारांश :**

शोध प्रबंधाच्या पहिल्या **'प्रस्तावना'** या प्रकरणात अभ्यासविषयक प्रस्तावना प्रस्तुत विषयावर आजपर्यंत झालेला पूर्व अभ्यासाचे अवलोकन केले आहे. यामध्ये धीरेंद्र मजुमदार यांच्या वर नरेंद्रभाई (संपा.), मिश्र बजरंग दत्त (संपा.), पराग चोळकर (संपा.), आचार्यराममुर्ती आणि सु.श्री. पांढरीपांडे यांनी लिहिलेल्या संपादित ग्रंथाचा, पुस्तिकेचा, मासिकांचा समावेश केलेला आहे. धीरेंद्रांनी खेडयांच्या शाश्वत विकासासाठी त्यांचे विचार महत्वाचे आहेत हे त्यांनी रचनात्मक कार्यामधून प्रत्यक्षपणे दाखविले असल्यामुळे सदरचा संशोधनाचा अभ्यास महत्वाचा आहे. संशोधन विषयाची व्याप्ती, संशोधनाची

उद्दिष्टे व गृहितके यांचाही समावेश यामध्ये आहे. शोध प्रबंधासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करून ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पध्दतीने अभ्यास केला आहे.

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये **धीरेंद्र मजुमदार यांचा जीवन परिचय,** त्यांच्यावर पडलेला प्रभाव आणि त्यांनी केलेले कार्य यांच्या उहापोह केलेला आहे. धीरेंद्र मजुमदार यांचा जन्म उत्तर प्रदेशमधील गोरखपूर येथे १० सप्टेंबर, १९०० मध्ये झाला. स्कॉटीश चर्च कॉलेजमधून त्यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी काशी येथील हिंदू विश्व विद्यालयामध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमासाठी १९२१ मध्ये प्रवेश घेतला, परंतु महात्मा गांधींच्या विचाराने प्रभावित होऊन असहकार चळवळीमध्ये इंजिनिअरिंग शिक्षणाचा त्याग करून सहभागी झाले. तसेच ते आजीवन ब्रह्मचारी राहिले व गांधीजींचा विचार आयुष्याच्या अखेरीपर्यंत कृतीमध्ये आणत राहिले.

उत्तरप्रदेशातील फैजाबाद जिल्हयातील रणीवा नावाच्या गावापासून त्यांच्या ग्रामसेवेचा आणि रचनात्मक कार्याला आरंभ झाला. धीरेंद्रांनी १९७१ मध्ये ‘लोक गंगा यात्रा’ या कार्यक्रमाला सुरूवात केली. यासाठी त्यांनी बैलगाडीतून आठ वर्ष खडतर प्रवास केला. त्यातच १९७८ मध्ये त्यांचा वाराणसी येथे मृत्यु झाला. या त्यांच्या त्यागमय जीवन प्रवासाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात धीरेंद्र मजुमदार यांच्यावर महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, ब्राहमो समाज, आचार्य कृपलानी यांचा पडलेल्या प्रभाव तसेच धीरेंद्रांनी केलेले कार्य याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात **‘धीरेंद्र मजुमदार यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार’** याविषयीचे विस्तृत विवेचन केले आहे. धीरेंदांनी आयुष्यभर समाजपरिवर्तनाचे आणि नवसमाज रचनेचे अत्यंत क्रांतिकारी प्रयोग केले. कार्यकर्ता, कार्यक्रम आणि कार्यशैली या तिन्ही घटकांच्या संदर्भात धीरेंद्राची भूमिका नावीन्यपूर्ण आहे. समाजक्रांती हा कोणत्याही अर्थाने कार्यकर्त्यांचा

व्यवसाय होवू शकत नाही. ती एक स्वाभाविक प्रक्रिया असली पाहिजे, हे या विचारातील नावीन्य होते, अहिंसक समाज म्हणजे हिंसारहित समाज रचनेची स्थापना झाली पाहिजे असे विचार धीरेंद्र मजुमदार मांडतात. धीरेंद्र मान्यता परिवर्तन, मूल्यपरिवर्तन, हदयपरिवर्तन आणि व्यवस्थापरिवर्तन हा अहिंसक समाजक्रांतीचा मार्ग मानून या संपूर्ण प्रक्रियेमध्ये शिक्षणाच्या प्रक्रियेला महत्व देतात.

आजच्या प्रचलित शिक्षण व्यवस्थेची अप्रस्तुतता, ग्रामीण जीवनाशी त्याचा अंगभूत संबंधविच्छेद आणि त्यातील विषमता वाढीस लावणारा आशय स्पष्टपणे धीरेंद्रांनी मांडलेला आहे. यातूनच धीरेंद्रांचे नई तालीम विषयीचे नवे चिंतन निर्माण झाले. शिक्षण व्यवस्था श्रमाधिष्टीत करण्याचा, संपूर्ण समाज हीच शिक्षणसंस्था व्हायला हवी आणि समाजाचा विचार, भारताच्या विशिष्ट संदर्भात, ग्रामीण समाजाचाच विचार असल्याने वस्तुत: सगळे गांव हेच विश्वविद्यालय कसे होईल याचा विचार त्यांनी अग्रक्रमाने मांडला.याचा सविस्तर ऊहापोह प्रस्तुत प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात करण्यात आला आहे.

**‘धीरेंद्र मजुमदार यांचे राजकीय विचार’** या प्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात धीरेंद्र मजुमदार यांनी मांडलेले शासनमुक्त समाज, दंडमुक्त समाज, वर्गविरहित समाज, क्रातीसंबंधीचे विचार, लोकनीती विषयक विचारांचा विस्तृत पध्दतीने अभ्यास करण्यात आला आहे. भारतीय समाजाची सर्वकष गुंतागुत लक्षात घेता शासनमुक्त समाज, मार्क्स प्रणीत वर्गमीमांसा व त्या अनुषंगाने येणारा वर्ग संघर्ष या दोन्ही गोष्टी भारताला लागू होत नाहीत याचे अत्यंत मार्मिक असे विश्लेषण धीरेंद्रांनी केले आहे.

या स्वराज्याची तसेच ग्रामस्वराज्याची निर्मिती, तिचे स्वरूप आणि तिची प्रक्रिया हाच धीरेंदांच्या चिंतनाचा आणि त्यांच्या रचनात्मक कार्याचा मुख्य विचार राहिला आहे.

क्रांतीचा मार्ग वर्गसंघर्ष न राहता समग्र लोकचेतनेच्या जागृतीच्या माध्यमातून सम्मीलनाचाच भाग असू शकतो. अहिंसक क्रांतीची प्रक्रिया ही मुकाबल्याची प्रक्रिया नसून ती रिअप्रोचमेंटची प्रक्रिया आहे. रिअप्रोचमेंट म्हणजे अन्याय, अनीती, आणि शोषण यांच्या निराकरणासाठी समाजामध्ये वेगवेगळया वर्गाकडून एक दुसऱ्यांबरोबर जे संघर्ष निर्माण होतात, ते संघर्ष संपवून त्या संघर्षालाच प्रेम, बंधुभाव, त्याग आणि सौहार्दपणे संबंधाची पुनर्स्थापना करणे म्हणजेच रिअप्रोचमेंट होय. त्यातून प्रेम आणि बंधुभाव यांच्यावर उभा असलेला शोषणमुक्त समाज निर्माण करून लोकनीतीची स्थापना करणे धीरेंद्रांना अपेक्षित आहे. धीरेंद्रांचे राजकीय विचाराबाबतचे चिंतन अत्यंत सूक्ष्म व सखोल आहे.

प्रबंधाच्या पाचव्या प्रकरणात **'धीरेंद्र मजुमदार यांचे रचनात्मक कार्य आणि गांधीविचारांचा केलेला विकास'** याबद्दल विस्तृतपणे आढावा घेतला आहे. धीरेंद्र मजुमदार हे गांधीवादी रचनात्मक कार्याचे सक्रीय कार्यकर्ते होते. आपण 'शास्त्री' नसून मिस्त्री आहोत असे ते म्हणत., अनेक कार्यकर्त्यांना, संस्थांना घडवणारे आणि रचनात्मक कार्य करणारे ते मिस्त्री तर होतेच त्याबरोबर ते शास्त्रीही होते. समग्र ग्रामसेवेचे रचनात्मक प्रयोग स्थळांमध्ये रणीवांमधील समग्र ग्रामसेवा प्रयोग, बरनपुरमधील श्रमभारती खादीग्राम, बरनपुर ग्रामभारती प्रयोग, बलियामधील सर्वजनाधार प्रयोग आणि लोक गंगा यात्रा ही धीरेंद्र मजुमदार यांच्या रचनात्मक कार्याची पाच क्षेत्र होती. ही त्यांची प्रयोगशील कार्याची नवोपक्रमाची जाज्वल उदाहरणे आहेत.

त्यांचे रचनात्मक कार्य उत्तरप्रदेशातील तसेच बिहारच्या रणीवा, सेवापुरी, खादीग्राम, बालिया, बरनपुर, मधुबानी इत्यादी जागोजागीच्या अनेक आश्रमांमधून अनेक रूपांमध्ये विखुरलेले आहे. धीरेंद्रांनी एकाहून एक अशा प्रकारचे अनेक नाविण्यपूर्ण रचनात्मक प्रयोग केले होते. या रचनात्मक कार्यातून भारतामध्ये ग्रामस्वराज्य प्रत्यक्षात अस्तित्वात आणण्याविषयीचे प्रयोग धीरेंद्रा करीत होते.

धीरेंद्रांनी गांधीवादी कार्याचा नवा अर्थ लावण्याचा आणि त्याचा विकास करण्याचा प्रयत्न केला. सत्ता परिवर्तनासाठी राजकीय प्रतिकाराचा उपयोग न करता वर्गसंघर्ष संपविण्यासाठी रिअप्रोचमेंटची संकल्पना मांडतात. या रिअप्रोचमेंटच्या संकल्पनेतून गांधी विनोबांच्या सत्याग्रहाचा विकास धीरेंद्र करतात. धीरेंद्रांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील गावांमध्ये शोषण निराकरणाचा रचनात्मक प्रयोग केले. हाच गांधी विनोंबांच्या ग्राम स्वराज्याच्या प्रयोगाचा त्यांनी विकास केला. धीरेदांनी ग्रामोध्दार किंवा ग्रामसेवा यांच्यासंबंधी एक अतिशय मूलगामी चिंतन केले आहे.

धीरेंद्रा वर्ग परिवर्तनाच्या कार्यक्रमासाठी श्रमावर आधारित शिक्षण व्यवस्थेचा पुरस्कार करत होते. गांधी—विनोबांचे रचनात्मक शिष्य धीरेंद्र मजुमदार यांनी आयुष्यभर ब्रह्मचर्य व्रताचे पालन करून स्वत:ला ग्रामीण जीवनात गाढून घेऊन सामाजिक क्रांती केली. यातूनच धीरेंद्र मजुमदार यांनी ब्रह्मचर्य व्रताचा विकास केला. गांधी विनोबांनी जो अहिंसात्मक समाज व्यवस्थेचा आणि सर्वोदय समाजाचा विचार मांडला होता. त्याचा विकास धीरेंद्रानी आपल्या शोषणरहित आणि शासनमुक्त समाजाच्या रूपात ग्रामस्वरूपाच्या स्थापनेतून मांडला. गांधी—विनोबा यांच्या सर्वोदय आणि साम्ययोग विचारांचा विकास धीरेंद्रांनी केला आहे. महात्मा गांधींनी आणि विनोबांनी रचनात्मक कार्य केले त्यासाठी धीरेंद्र मजुमदार सतत नवनवीन कार्यकर्ते, कार्यक्रम आणि कार्यशैली आपल्या रचनात्मक प्रयोगातून निर्माण करीत राहिले. महात्मा गांधींनी राज्यविरहित समाज व त्याचा पुढे अराज्यवादी समाजाची निर्मितीची अपेक्षा केली आहे. धीरेंद्रांनी हेच विचार वर्गविरहित व शासननिरपेक्ष समाजाच्या निर्मितीमध्ये मांडून अराज्यवादी विचारांचा विकास केला आहे.

**ब) निष्कर्ष :**

संशोधनाच्या शेवटच्या भागात निष्कर्षाची मांडणी केली आहे. प्रस्तुत संशोधन विषयाचे गृहीतकांचा पडताळा तसेच धीरेंद्रांच्या इतर विचारांविषयीही स्पष्टीकरण या निष्कर्षामधून होते.

१. धीरेंदा स्वत:ला 'शास्त्री' नाही तर 'मिस्त्री' म्हणवून घेत होते. धीरेंद्र मजुमदार हे गांधी—विनोबांच्या विचाराचे भाष्यकार तर होतेच, त्याहीपेक्षा अधिक, म्हणजे त्या विचाराच्या अनुषंगाने ग्रामीण समुहजीवनाला आकार देणारे, जीवनभर समर्पणभावनेने तसा प्रयत्न करणारे कृतीशील विचारवंत आहेत.

२. शासनमुक्त आणि शोषणरहित अशा अहिंसक समाजाची निर्मिती हे स्वराज्याचे खरे स्वरूप आहे असे धीरेंद्रांनी विचारातून दाखवून दिले. शोषणरहित आणि शासनमुक्त अशा समाजाच्या रूपात ग्रामस्वराज्याची स्थापना करणे हे ध्येय प्रत्यक्ष रचनात्मक कार्यातून धीरेंद्रांनी पूर्ण करण्याचा यशस्वी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

३. स्त्रीयांना शिक्षण देणे त्यांना ग्रामोद्योगातून स्वावलंबी बनविण्याची धीरेंद्रांची भूमिका महत्वाची आहे.

४. धीरेंद्रांनी श्रमावर आधारीत व श्रमाला प्रतिष्ठा देण्याऱ्या नई तालीमच्या या शिक्षणव्यवस्थेमध्ये सुतकताई, विणकाम, बागवानी काम, शेतीमधील कामे तसेच अनेक जीवन उपयोगी कामे शिकविण्याचा आग्रह केला आहे. ही कौशल्य विकासाची धीरेंद्रांची दृष्टी आज अत्यंत औचित्यपूर्ण आहे.

५. मार्क्सप्रणीत वर्गमीमांसा व त्याअनुषंगाने येणारा वर्गसंघर्ष या दोन्ही गोष्टी भारताला लागू होत नाहीत असे विश्लेषण धीरेंद्रांनी केले आणि त्याआधारे क्रांतीच्या नव्या तंत्राची तसेच साधनांची गरज पटवून दिली. धीरेंद्रांनी मार्क्सचा वर्गसंघर्ष नाकारला तसेच वर्गविरहित आणि राज्यविरहित समाजनिर्मितीसाठी 'कामगार' हे साधन आहे हे मार्क्सचे म्हणणे धीरेंद्रांना

मान्य नाही. मार्क्सची हिंसेवर आधारीत कामगारांची हुकूमशाही धीरेंद्र नाकारतात व सम्मीलनाचा, प्रेमाचा, सहकार्याचा रिअप्रोचमेंटचा म्हणजेच सौहार्दपूर्ण संबंधाचा पुनर्स्थापना सिध्दांत स्वीकारतात.

६. धीरेंदांच्या मते, देशाचे नेतृत्व ढोंगी राजकारणी यांच्याऐवजी विद्वानांनी, आचार्यांनी व सज्जनांनी केले पाहिजे. सद्यकालीन परिस्थितीमध्ये हा विचार महत्वाचा आहे. कारण सज्जनांच्या अलिप्ततेमुळे आणि मौनामुळे ढोंगी राजकारणी नेतृत्व मोठया प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे समाजाचे मोठया प्रमाणावर शोषण होऊन देशाची अधोगती होत आहे.

७. धीरेंद्र मजुमदार यांनी भूदान व ग्रामस्वराज्य या क्षेत्रामध्ये महत्वाचे काम केले.

८. कार्यकर्ता हा ग्रामीण जीवनाशी समरस झाला पाहिजे, ग्रामस्थांचा जीवनसंघर्ष हा त्याचाही जीवनसंघर्ष असला पाहिजे आणि त्याचवेळी त्याच्या आगळयावेगळया जीवनशैलीतून, दयाबुध्दी व्यवहारातून नव्या जाणीवांचा आणि रचनांचा हळूवार विकास झाला पाहिजे हा धीरेंद्रांचा विचार अत्यंत मूलगामी आहे. धीरेंद्रांनी आपली ही विचारसरणी रचनात्मक कार्यामधून प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला आहे.

९. धीरेंद्रांनी सत्याग्रह, ब्रह्मचर्य, शोषणमुक्त, अहिंसात्मक समाज व्यवस्थेची स्थापना, साम्ययोग, ग्रामोद्योग, नई तालीम, ग्रामस्वराज्य, शासननिरपेक्ष व राज्यविरहित समाजाविषयी विचार मांडून गांधीविचारांचा कृतीशील विकास केला आहे.

**धीरेंद्र मजुमदार यांच्या विचारांचे समकालीन औचित्य व महत्व :**

धीरेंदांच्या मते, जोपर्यंत भारतातील ग्रामीण जीवन खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर, स्वाश्रयी आणि यथाशक्य स्वावलंबी होणार नाही तोपर्यंत भारताचे राजकीय स्वातंत्र्य भारतातील ग्रामीण जनतेसाठी वरदान ठरण्याऐवजी फार मोठा अभिशापच ठरेल असेही धीरेंद्रांचे मत आहे. धीरेंद्रांच्या मते, ब्रिटीशांनी

देशामध्ये भांडवलदार व नोकरशाही यांचे संघटन केले आहे आणि त्यांचे दलाल म्हणून काम करणारी नेताशाही ही गावागावातून कायम करून ठेवली आहे. स्वदेशी भांडवलशाहीच्या माध्यमातून परकीय भांडवलशाही, नोकरशाही आणि गावागावातून पसरलेले त्यांचे हे दलाल यांचे त्रिकुट भारतातील देशभक्तांना विकत घेऊन टाकेल. नंतर देशात एका चार हातांच्या राक्षसाचा जन्म होईल. दोन तोंड असलेली भांडवलशाही हा त्याचा एक हात, दुसरा हात नोकरशाही, गावातील दलाल हा तिसरा हात आणि विकत घेतलेले देशभक्त हा चौथा हात असेल. हा चार हातांचा राक्षस म्हणजे चतुर्भुज राक्षस आपले हात चारही बाजूंना पसरवून जनतेला पिळून काढेल हे धीरेंद्रांनी स्वातंत्र्यपूर्व काळात काढलेले उद्‌गार आज वर्तमान काळात जसेच्या तसे लागू पडत आहेत हे नाकारता येत नाही.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळामध्ये गांधीवादी तसेच उत्तर गांधीवादी विचारांचे महत्व वाढत आहे. धीरेंद्रांच्या विचारा मधील चतुर्भुज राक्षसांमुळे समाजामध्ये सर्व प्रकारांचे प्रश्न निर्माण झाले आहेत. आज भांडवलशाहीमुळे समाजात श्रीमंत आणि गरीब अशी मोठी दरी निर्माण झालेली आहे. यामध्ये गरीबांचे मोठया प्रमाणात शोषण होत आहे. या शोषणामुळे गरीबामधील अस्वस्थतता वाढत असून हळूहळू समाजामध्ये या विरोधी उद्रेक होत आहेत. त्यामुळे धीरेंदानी सांगितलेला शोषणमुक्त समाज निर्मितीचा विचार महत्वाचा आहे. सामाजिक ऐक्याद्वारे समाजामध्ये शांतता व सलोखा निर्माण करणे गरजेचे आहे.

धीरेंदानी ग्रामस्वराज्यामधून ग्रामदान तसेच स्वयंपूर्ण खेडयाचा विचार मांडला. आज प्रचंड वेगाने शहरीकरण होत आहे. या शहरीकरणामध्ये कोणत्याही प्रकारचे नियोजन नाही. या शहरीकरणामुळे ग्रामीण भाग उध्वस्त होत चालला आहे. या पार्श्वभूमीवर धीरेंदानी सांगितलेला भूदान ते ग्रामदान हा विचार महत्वाचा आहे. गावामध्ये शांततेसाठी शांतीसेना स्थापन करणे तसेच

चुली—जोड प्रकल्पाद्वारे गावामधील जनतेमध्ये ऐक्य निर्माण करणे शक्य आहे. धीरेंदा जातीव्यवस्थेला विरोध करतात. ही जातीव्यवस्था संपुष्टात आणून सामाजिक समता निर्मितीसाठी धीरेंदाचा विचार आजही महत्वाचा आहे.

गांधीजीच्या सत्तेच्या विक्रेंद्रीकरणाच्या विचारांचा त्यांनी विकास केला. ७३व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीद्वारे हा विचार प्रत्यक्षात आलेला आहे. धीरेद्रांनी ग्रामसभेला जास्त महत्व दिले होते. आज राळेगणसिध्दी, हिवरेबाजार, मेंढा—लेखाइत्यादी आदर्श खेडी निर्माण झालेली आहेत. परंतु जागतिकीकरणाच्या काळात शिक्षण व्यवस्थेचे सुध्दा मोठया प्रमाणात खाजगीकरण व भांडवलीकरण झाले आहे. आजच्या शिक्षणपध्दतीमध्ये मूल्यांचा मोठया प्रमाणात ऱ्हास होत आहे. ही शिक्षण पध्दती विद्यार्थ्यांना पैसे मिळविण्याचे साधन किंवा यंत्र बनवत आहे. धीरेंद्रांनी अनुभवावर आधारित विज्ञानाबरोबरच कला आणि साहित्य यांचा चांगल्या प्रकारे संयोग असलेल्या शिक्षण पध्दतीचा विचार मांडला. आज शिक्षणामधून कौशल्य विकासाचा प्रयत्न सरकार करीत आहे. ही कौशल्य विकासाची धीरेंद्रांची दृष्टी आज अत्यंत महत्वपूर्ण आहे. धीरेंदाचा शिक्षण विचार श्रमाला प्रतिष्ठा देतो. आजच्या काळात श्रमाला दुय्यम ठरविणाऱ्या शिक्षणामुळे समाजात मोठया प्रमाणात बुध्दीजीवी आणि श्रमिक असे दोन गट निर्माण झालेले आहेत. यामुळे श्रम करणाऱ्या व्यक्तिला कोणतीही सामाजिक प्रतिष्ठा नाही. या पार्श्वभूमीवर धीरेंदाचा श्रमावर आधारित शिक्षण विचार महत्वाचा आहे. त्यांनी सांगितलेल्या स्त्री शिक्षणाच्या विचाराला महत्व प्राप्त झाले आहे. सुशिक्षित व शहाणी पिढी निर्माण होण्यासाठी बाळाच्या अगोदर आईला शिक्षण दिले पाहिजे हा त्यांचा शिक्षणविचार अत्यंत प्रासंगिक आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या प्रचंड भांडवलशाहीच्या वाढीमुळे देशा—देशांच्या स्पर्धेमध्ये मोठया प्रमाणत शस्त्रस्पर्धा वाढीला लागलेली आहे. या शस्त्रस्पर्धेमुळे सातत्याने कोणत्या ना कोणत्या देशामध्ये युध्द किंवा युध्दजन्य

परिस्थिती असते. या युध्दामध्ये प्रचंड प्रमाणामध्ये हिंसा होत आहे. लहान मुले व स्त्रिया यांचे सर्वात जास्त बळी यामध्ये जात आहेत. या हिंसक शक्तीच्यामुळे संपूर्ण मानवजात धोक्यात आलेली आहे. धीरेंद्रा यांनी गांधीजीचाच अहिंसा व शांततेचा मार्ग विकसित केला आहे व हाच मार्ग स्वीकारणे मानवाच्या हिताचे आहे. आज जगामध्ये शांततामय सहजीवन असणाऱ्या समाजाची पुनर्स्थापना करण्यासाठी धीरेंदाचे विचार महत्वाचे आहेत धीरेंदाचे विचार हे मानवतावादी, शोषणमुक्त समाजनिर्मितीसाठी महत्वाचे तसेच मनुष्याच्या जीवनामध्ये आनंद आणि समाधान निर्मितीसाठी आवश्यक आहेत धीरेंदांच्या कृतीशील विचारांची आज आपण फेरमांडणी करून जीवन समéध्द करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. धीरेंदांचे विचार हे निश्चितपणे कालातीत राहणारे आहेत. तसेच आजच्या भांडवलशाहीच्या व नोकरशाहीच्या शोषणामधून मुक्त होण्याच्या दृष्टीने मानवाला दिशा देणारे आहेत.

***********

# संदर्भ ग्रंथ सूची

## प्राथमिक साधने :


- मजुमदार धीरेंद्र,(१९५९),*ग्रामस्वराज्य क्यो और कैसे,* अ. वा. सहस्त्रबुध्दे, अखिल भारतीय सर्वसेवा संघ, वर्धा
- मजुमदार धीरेंद्र,(१९५०),*यह स्वराज कैसा?,* सर्वोदय साहित्य संघ, काशी, बनारस
- मजुमदार धीरेंद्र, (१९५०),*आजादि का खतरा,* अखिल भारतीय सर्वसेवा संघ, सेवाग्राम
- मजुमदार धीरेंद्र, (१९६८), *नवयुग की माँग,* सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र, (१९५३),*भुदान यज्ञ युगकी महान चुनौती,* सर्वोदय साहित्य संघ, वाराणसी,
- मजुमदार धीरेंद्र,(१९६२), *क्रांतिकी बुनयाद ग्राम—भारती,* अखिल भारतीय सर्वसेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणशी
- मजुमदार धीरेंद्र, (१९५८), *खादी ग्रामोद्योग विद्यालय व्याख्यानमाला—*३, राजनीतीक और लोकनीती, राजस्थानी खादी संघ, खादीबाग, चौमू .
- मजुमदार धीरेंद्र, (१९६५), *जमाने की चुनौती और ग्रामदान,* सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र, (१९४८)ए*जमाने की मांग,* अखिल भारत सर्व सेव संघ, सेवाग्राम
- मजुमदार धीरेंद्र, (१९४८), *स्वराज्य की समस्याएँ,* सर्वोदय साहित्य संघ, काशी
- मजुमदार धीरेंद्र, (१९५५), *शासन निरपेक्ष समाज,* अखिल भारत सर्व सेवा संघ प्रकाशन, वर्धा

- मजुमदार धीरेंद्र, (१९६८),*नव्या युगाचे मागणे ग्रामदान,* नेमीनाथ कत्ते (अनुवादक), महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, गोपुरी, वर्धा.
- मजुमदार धीरेंद्र, (१९५५), *शासन मुक्त समाज की ओर,* अखिल भारत सर्व सेवा संघ, वर्धा
- मजुमदार धीरेंद्र, (१९५५),*ग्रामराज,* अखिल भारत सर्व सेवा संघ, वर्धा
- मजुमदार धीरेंद्र, (१९७९), *क्रांति बनाम राहत,* सर्व सेवा संघ, राजघाट, वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र,(१९७९), *क्रांति बनाम स्वदेशीराज,* सर्व सेवा संघ, राजघाट, वाराणसी .
- मजुमदार धीरेंद्र,(१९७१),*ग्रामस्वराज्य क्यों?,* सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.
- मजुमदार धीरेंद्र,(१९८०),*क्रान्ति की बुनयाद,* (क्रांती का क्षेत्र शक्ती, साधन और मार्ग), सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र, (१९८०),*क्रान्ति का भविष्य,* सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र, (१९८०), *क्रान्ती यात्रा* (अन्तिम आदमी के उत्कर्ष के लिए), सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र, (१९७९), *उलझे प्रश्न,* सर्व सेवा संघ वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र, (१९७३),*लोक गंगा के तट से,* सर्व सेवा संघ वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र, (१९५४),*नई तालिम और समाज का नवनिर्माण,* अखिल भारतीय सर्व सेवा संघ, वर्धा.
- मजुमदार धीरेंद्र, (२०११), *नई तालीम का विश्व—रूप,* हिंदुस्तान तालीम संघ, वर्धा

- मजुमदार धीरेंद्र, (१९८२), *शिक्षा मे क्रान्ति,* सर्व सेवा संघ प्रकाशन वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र, (१९५४),*नयी तालीम,* उत्तर प्रदेशीय भूदान समिती प्रकाशन, राजघाट, वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र, (१९६२),*संघर्ष मुक्त क्रान्ति का वाहन समग्र नयी तालीम,* सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र, (१९५०), *कृष्णदास गांधी,* चरखा आंदोलन दृष्टी और योजना, अखिल चरखा संघ प्रकाशन, सेवाग्राम, वर्धा
- मजुमदार धीरेंद्र, (१९४६),*क्रांतिकारी चर्खा,* अखिल भारतीय चर्खासंघ शाखा, संयुक्तप्रात, वारणसी.
- मजुमदार धीरेंद्र, (१९५५),*नवी तालिम,* अखिल भारतीय सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी
- मजुमदार धीरेंद्र, (१९५९), बुनयादी शिक्षण पध्दती, अखिल भारतीय सर्व सेवा संघ, वर्धा
- मजुमदार धीरेंद्र, (—)*जमाने की चुनौती,* सर्व सेवा संघ, वर्धा.
- मजुमदार धीरेंद्र, (२००१), *समग्र ग्रामसेवा की ओर,* सर्व सेवा संघ—प्रकाशन, राजघाट, वाराणसी.
- देवघरे रविंद्र,सुरेखा कदम (अनु.) (२०१०),मजुमदार धीरेंद्र, *वर्गविहीन समाजाच्या दिशेने*— लोक गंगा यात्रा', गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
- मजुमदार धीरेंद्र, (१९७१) *बापू की खादी,* अखिल सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.
- मजुमदार धीरेंद्र, (१९६३),*देश के संकट में गांव की जिम्मेदारी,* सर्व सेवा संघ, वाराणसी.

- मजुमदार धीरेंद्र, (१९७१),*ग्राम स्वराज्य की और,* सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी.
- नरेंद्रभाई व इतर , (संपा.),(१९८१), मजुमदार धीरेंद्र, —'लोक — क्रांति — पाथेय', धीरेंन्द्र मजुमदार स्मृति—ग्रंथ, सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी, .
- मजुमदार धीरेंद्र, (१९७९),*क्रांती प्रयोग ओर चिंतन,* सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट वाराणशी.
- मजुमदार धीरेंद्र, (१९६२), *स्वराज्य की असली लढाई,* सर्वोदय साहित्य संघ, काशी .
- मजुमदार धीरेंद्र, (१९५४),*दंड निरपेक्ष समाज रचना,* सर्वोदय समाज के निर्माण की योजना, सर्व सेवा संघ, वर्धा
- मजुमदार धीरेंद्र, (१९५९),*सर्वोदय समाज की दिशाओ में,* सर्व सेवा संघ, राजघाट, वाराणसी, .
- मजुमदार धीरेंद्र, (१९५८), *मार्ग खोजन,* सर्व सेवा संघ, वाराणशी .
- मजुमदार धीरेंद्र, (१९५९), *क्रांती का लक्ष्य और दिशा,* सर्वोदय साहित्य संघ, काशी.
- मजुमदार धीरेंद्र,(१९४४),*युग की महान चुनौती, भूदान यक्ष,* सर्व सेवा संघ, वाराणसी.
- मिश्र बजरंग दत्त (संपा.), (२००७), *मजुमदार धीरेंद्र,स्मरणिका,* ग्राम स्वावलंबी विद्यालय, आचार्य नगर फैजाबाद की स्वर्ण जयंती पर प्रकाशित, प्रकाशक ग्राम स्वावलंबी विद्यालय, आचार्य नगर, फैजाबाद.

## दुय्यम साधने :

### मराठी :


- आचार्य राममुर्ती, (२०१४),'खेडयाचे बंड', गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर .
- चोळकर पराग (संपा.),(२०००),मजुमदार धीरेंद्र, 'धीरेंनदांची जीवन यात्रा त्यांच्याच शब्दांत', 'धीरेंद्र मजुमदार विशेषांक—साम्ययोग साधना', द्वारा विनोबा विचार केंद्र, धरमपेठ, नागपूर.
- भटकळ रामदास (२०१०),'मोहनमायाः गांधी आणि त्यांचा मित्र परिवार', मौज प्रकाशन, पुणे, ३ री आवृत्ती.
- भावे विनोबा, (१९६९),*तिसरी शक्ती,*परंधाम प्रकाशन. पवनार, वर्धा.
- भावे विनोबा, (१९७२),*आचार्य कुल,*परंधाम प्रकाशन. पवनार, वर्धा.
- भावे विनोबा, (१९८८),*साम्यसूत्रें,* परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा .
- भावे विनोबा,(१९८८),*अहिंसेचा शोध,* कालिंदी,(सं.), परंधाम प्रकाशन, पवनार.
- भावे विनोबा, (१९८९),*सर्वोदय—विचार आणि स्वराज्य—शास्त्र,*परंधामप्रकाशन, पवनार.
- भावे विनोबा, (१९९०)ख*साम्यवाद की साम्ययोग,*परंधामप्रकाशन, वर्धा.
- भावे विनोबा, (१९९९),*सत्याग्रह—विचार,* परंधाम प्रकाशन, पवनार,वर्धा.
- भावे विनोबा, (२०००),*सन्निधी, पवनार,* कालिंदी,(सं.), परंधाम प्रकाशन.
- भावे विनोबा, (२००३),*साम्य—सूत्र—विवरण,* परंधाम प्रकाशन, वर्धा.
- भावे विनोबा(२००३),*प्रेमपंथ अहिंसेचा,* कालिंदी,(सं.), परंधाम प्रकाशन.
- भावे विनोबा,(२००४),*लोकनीती,* परंधाम प्रकाशन, पवनार,वर्धा.
- धर्माधिकारी दादा, (१९७३),*क्रांतीचे पुढचे पाऊल,* परंधाम प्रकाशन.
- धर्माधिकारी दादा, (१९८०),*संपूर्ण क्रांती,* परंधाम प्रकाशन, पवनार,वर्धा .

- धर्माधिकारी दादा, (१९८९),*क्रांतीच्या संदर्भात,* परंधाम प्रकाशन, वर्धा .
- धर्माधिकारी दादा, (१९९०),*लोकनीती विचार,* परंधाम प्रकाशन, वर्धा .
- धर्माधिकारी दादा, (१९९२),*दादांच्या शब्दांत दादा,* भाग—१ व २, परंधाम
- धर्माधिकारी दादा, (१९९८),*सर्वोदय दर्शन,* परंधाम प्रकाशन, वर्धा.
- गांधी मो.क.,(१९५५),*गांधी विचार दर्शन,* खंड १ ते २२, संपादक, भाऊ धर्माधिकरी, महाराष्ट्र गांधी निधी प्रकाशन, पुणे .
- गांधी मो.क., (१९८०),*अनासक्ती योग,* नवजीवन,अहमदाबाद.
- गांधी मो.क., (१९९३),*सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा,* अनुवाद पटवर्धन सी.पु., म.रा. पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
- गांधी मो.क.,(२००६),*हिंदस्वराज्य,* नवजीवन प्रकाशन ट्रस्ट, अहमदाबाद.
- लोहिया राममनोहर, (१९८१),*मार्क्सवाद समाजवाद,* राममनोहर लोहिया स्मृति केंद्र, मुंबई.
- नारायण जयप्रकाश, (१९५४),*जीवनदान,* महाराष्ट्र सेवा संघ, पुणे.
- अडावदकर अनंत, (१९९५),*विनोबा, व्यक्ति आणि विचार,* जयश्री प्रकाशन, नागपूर.
- बापट भ ग.,(२००२),*विनोबा,* वर्धा राजहंस प्रकाशन, पुणे.
- बेडकिहाळ किशोर (सं),(२००९),*निवडक वसंत पळशीकर,*लोकवाङ्.मय गृह, मुंबई.
- बंग ठाकुरदास, (१९७२),*विनोबा,* गोपुरी, प्रकाशन, वर्धा.
- भावे सविता, (१९९५),*दानयोगी विनोबा,* वरदा प्रकाशन, पुणे.
- भावे शिवाजी, (१९८४.)*विनोबा जीवन दर्शन,* महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई,
- भावे शिवाजी, (१९८९),*विनोबा चरित्र,* परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा.

- चपळगावकर नरेंद्र, (१९९९),*कर्मयोगी संन्यासी*, मौज प्रकाशन, मुंबई .
- चौसाळकर अशोक, (सं.),(२००३),*महाराष्ट्रातील गांधीवादाचा विकास आणि अन्वयार्थ*, शिवाजी विद्यापीठ, कोल्हपूर.
- चौसाळकर अशोक,(२००८),*टिळक आणि आगरकरांचे राजकीय विचार*, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
- चौसाळकर अशोक, (२०१०),*मार्क्सवाद उत्तर मार्क्सवाद*, प्रतिमा, पुणे.
- चौसाळकर अशोक, (२०१०),*हिंदस्वराज्य आणि आत्मबळाची प्राप्ती*, महात्मा गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
- देशपांडे निर्मला, (सं.),(१९५८),*विनोबा, भूदान गंगा*, भाग १ते ९, परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा.
- देशपांडे निर्मला, (१९९८),*विनोबा*, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली .
- देशपांडे निर्मला, (१९५५),*विनोबाजींच्या सहवासांत*, ग्रामसेवा मंडळ प्रकाशन, वर्धा.
- देशपांडे राजेश्वरी,(२०१०),'आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर', गंधर्व—वेद प्रकाशन, पुणे,
- दिवाण वि. प्र.,(२००६),*विनोबांची तपोभूमी*, श्री.कोटेश्वर देव (ट्रस्ट), प्रकाशन, वाई.
- द्वादशीवार सुरेश, (२०१८),'गांधीजी आणि त्यांचे टीकाकार', साधना प्रकाशन, पुणे.
- धर्माधिकारी तारा, (२००२),*महाराष्ट्राचे शिल्पकार आचार्य दादा धर्माधिकारी*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
- धर्माधिकारी तारा (संपा.), (१९९९),'दादा धर्माधिकारी जीवन दर्शन', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., पुणे.
- घुमरे दि. भा.,(२००९),*चिरंतनाचे यात्री विनोबा*, लाखे प्रकाशन नागपूर.

- नारगोलकर वंसत, (१९७७),*अखेर जयप्रकाशजीच खरे ठरले!*, मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुबंई.
- नारगोलकर वसंत, (१९९०),*साम्ययोग : विनायकाचार्यांचा गीतार्थ*, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.
- नारगोलकर वसंत, (१९९५),*विनोबा आणि मृत्यू*, मॅजेस्टिक, मुंबई.
- पांढरीपांडे सु. श्री., (२००७),*स्वराज्य:दिशा आणि दर्शन*, प्रतिमा, पुणे.
- पळशीकर वसंत, (२००६),*हिंदस्वराज्य प्रस्तावना*, कोल्हापूर.
- पानसे रमेश, (२००७),'नई तालीम —गांधीप्रणीत शिक्षण विषयक प्रयोगांचा इतिहास',सर्व—सेवा—संघ प्रकशन, गांधी सेवा संघ, सेवाग्राम, वर्धा.
- पांढरीपांडे सु. श्री., (२००९),'धीरेंद्र मजुमदार जीवन आणि कार्य', गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
- राऊत गणेश, (२०१०)*आचार्य विनोबा भावे*, गंधर्ववेद प्रकाशन, पुणे.
- सुमंत यशवंत, (२०१६), 'महात्मा गांधींची विचारसृष्टी' काही अलक्षित पैलू, साधना प्रकाशन, पुणे.
- शाह कान्तिभाई (सं),(२००५),*गांधी जसे पाहिले—जाणले विनोबांनी*, परंधाम प्रकाशन, वर्धा, पवनार.
- शेवाळकर राम, (१९७८),*आमचे विनोबा*, मानसन्मान प्रकाशन, पुणे.
- शेवाळकर राम, (१९९६),*विनोबांचे धर्मकीर्तन*, समर्थ प्रकाशन, सातारा .
- शेवाळकर राम, (१९८७),*विनोबा सारस्वत*, साहित्य आकादेमी, दिल्ली.
- टंडन विश्वनाथ, (१९९७),*आचार्य विनोबा भावे*, अनु. अजंली नारगोलकर, भारत सरकार, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, नवी दिल्ली.

**हिंदी :**


- भावे विनोबा, (१९५३), *भूदान यज्ञ,* नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.
- भावे विनोबा, (१९५६) *भूदान गंगा, खंड १ते ९,* सर्व सेवा संघ, वाराणसी.
- भावे विनोबा, (१९८६), *सुलभ ग्रामदान,* सर्व सेवा संघ, राजघाट, वाराणसी.
- भावे विनोबा, (१९९२—२००१), *विनोबा साहित्य,* खंड १ ते २०, परंधाम प्रकाशन, वर्धा, पवनार.
- धर्माधिकारी दादा, (१९५४), *मानवीय क्रान्ति,* सस्ता साहित्य मण्डल, दिल्ली.
- धर्माधिकारी दादा, (१९८४), *अहिंसक क्रांन्ति की प्रक्रिया,* सर्व—सेवा—संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.
- धर्माधिकारी दादा, (१९९३), *संपूर्ण क्रांतीके आयाम,* सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.
- धर्माधिकारी दादा, (१९८८), *लोकनीती विचार,* सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.
- धर्माधिकारी दादा, (२००२—२००५), *समग्र सर्वोदय—दर्शन,* खण्ड—१ ते ४, , सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.
- धर्माधिकारी दादा, (१९९८), *गांधी की दृष्टी : अगला कदम,* सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.
- धर्माधिकारी, दादा, (१९९८) *सर्वोदय—दर्शन* (संशोधित— परिवर्ध्दित— संस्करण), सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.
- कालेलकर काका, (१९६५), *सत्याग्रह विचार और युध्दनीति,* सर्व—सेवा संघ,वारणसी.
- कालेलकर काका, (१९७०), *गांधीजी का जीवन दर्शन,* नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद.

- कालेलकर काका, (१९६५),*अहिंसा—जीवन संस्कृती की नयी दिशा,* साहित्य प्रकाशन, नवी दिल्ली.
- नारायण जयप्रकाश, (२००२),*समाजवाद से सर्वोदय की ओर,* सर्वसेवा संघ, वाराणसी.
- नारायण जयप्रकाश, (२००६),*संपूर्ण क्रांती,* सर्वसेवा संघ, वाराणसी.
- कृपलानी जे. बी,(१९७०),*सामाजिक क्रांति और भूदान,* सर्व सेवासंघ, वर्धा.
- तरूण भाई, (१९५४),*विनोबा एक जीवन दर्शन,* सर्व सेवा संघ, काशी.
- ठकार विमला, (१९५५),*भूदान दीपिका,* अ.भा. सर्व सेवा संघ, काशी, .

**English :**

- Bhattachary Ajit, (1978), *Jayprakash: A Political Biblography*, Vikas Publishing House, New Delhi, .
- Bondurant Jaon, V., (1988)*,Conquestof Violence: The Gandhian Philosophy of Conflict*, New Jersey, Princeton University Press Princeton.
- Dharampal (1971)*,Civil Disobedience in Indian Tradition*, Sarva Seva Sungh Prakashan., Varanasi.
- Diwakar R.R. & Mahendra, Agrawal, (1984)*,Vinoba: the Spiritual Revolutionary*, Gandhi Peace Foundation, New Delhi.
- Gandhi M. K., (1968)*, Selected Works of Mahatma Gandhi* (six Volumes), Nav Jeevan Trust, Ahmedabad.
- Gandhi M.K., (1969)*,Non-Violence in Peace and War* (two vols.), Nav Jeevan Trust, Ahmedabad.
- Groom Donald, (1969)*,With Vinoba*, Serva Seva Sangh., Varanasi.
- Grover V., (Ed.), (1995)*,Vinoba Bhave*, , Deep and Deep publications, Delhi.
- Majumdar Dhirendra, (1982)*,Bhoo-Dan Yojna – The Great Challenge of the Age*, Sarv Seva Sangh, Publication, Rajghat, Varanashi.
- Narayan Shriman, (1970)*,Vinoba-His Life and Work*, Popular Prak, Bombay.

- Pandya Jayant, (1998) ,*Gandhiji and his Disciples*, N. Delhi, NBT.
- Ram Suresh, (1962) , "Vinoba And this Mission" (Being an account of the rise and growth of Bhoodan Yojna movement) Akhil Bharat Sarva seva sangh, Rajghat, kasha, 3rd Edition.
- Romain Rolland, (2002) ,*Mahatma Gandhi*, (The man who became one with the universal being), Rupa. Co., Daryaganj, New Delhi (Translated by – Catherine D. Groth).
- Tendulkar D.G., (1953) ,*Mahatma*,vol-1-8, The life of Mohandas Karamchand Gandhi, Government of India. New Delhi.
- Tennyson Hallam, (1961) ,*Saint on the March* (Vinoba Bhave's Revolution of Life), victor Gollancz, London. Indian pub. Bombay, W.D., Willis.

**मासिकातील लेख :**

- पळशीकर वसंत, (१९९२),*''स्वदेशीनिष्ठ समुदाय: गांधींचा राज्यविषयक विचार''*,, नवभारत,, पृ. क्र. ६९—१००.
- पळशीकर, वसंत, (१९९४),*''विनोबा आणिसर्वोदय विचारांची मांडणी''*, साम्ययोग, नोव्हेबर,, पृ. क्र. १—७.

**मुलाखत :**

- शिंदे दत्ता, कोल्हापूर, दि. २८/१२/२०१४
- पांढरीपांडे सु. श्री., नागपूर, दि. १६/११/२०१५.
- अमरनाथभाई, सेवाग्रम, वर्धा दि. १९/११/२०१५.

**अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध :**

- Patil Bharati (2007) , 'Indian Theory of State and Politics : Critical Study (With Reference To Ideas of Gandhi, Vinoba and Jayprakash Narayan), (Unpublished Ph. D. Thesis) Department of Political Science, Shivaji University, Kolhapur.

- Pawar S. D., (1994), 'Social and Political Thought of Acharya Jawadekar', (Unpublished Ph. D. Thesis), Department of Political Science, Shivaji University, Kolhapur.
- राऊत गणेश दत्तात्रय,(२०११) 'भूदान चळवळ : एक चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ महाराष्ट्र', अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे .
- बंदारे मल्लिकार्जुन (२००९)'काकासाहेब कालेलकर यांचे सामाजिक आणि राजकीय विचार', अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
- लोखंडे निलकंठ, (२०१४)'उत्तर गांधीवादी अहिंसात्मक राजकीय प्रतिकाराचा सिंध्दांत', अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.


**नियतकालिके / विशेषांक :**

**मराठी :**


- *भूदान विशेषांक*, नवभारत, १९५५.
- *सर्वोदय*, विशेषांक, चित्रमयजगत, पुणे, १९५८.
- *सर्वोदय साधना*, शांताश्रम, मुंबई, १९७८.
- *आचार्य विनोबा भावे जन्मशताब्दी*, विशेषांक,तरूण भारत, नागपूर १९९५.
- *भूदान यज्ञ विशेषांक*, विनोबा जन्मशताब्दी समारोह विशेषांक,मैत्री, १९९५.
- *विनोबा भावे विशेषांक*,नवभारत, ऑक्टोबर, १९९६.
- *सर्वोदय आरोहण*, विशेषांक, साम्ययोग, नागपूर, १९९८.
- *साधना हीरकमहोत्सव वर्षारंभ*, विशेषांक,साधना, जुलै, २००७.


********